सोलापूर
# तरुण भारत
न मे कर्मफले स्पृहा
Solapur Tarun Bharat
छत्रपती संभाजीनगर, अहिल्यानगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड येथून वितरित
छत्रपती संभाजीनगर | रविवार, दि. ११ जानेवारी २०२६ | वर्ष – ३ रे | अंक २७५ | पाने : ८ | किंमत रु. ६/– | dainiktarunbharat.com, epaper.dainiktarunbharat.com




# फडणवीसांचा दादांना शायरीतून टोला

**पुणे :** मुंबईनंतर राज्याचं लक्ष पुण्यातील दोन्ही महापालिकांकडे लागलं असून उपमुख्यमंत्री अजित पवारांनी भाजपला लक्ष्य करत आपला भूमिका दाखवून दिली. त्यानंतर, भाजप नेत्यांनीही अजित पवारांना इशारा दिला आहे. मात्र, पिंपरी चिंचवडम महापालिका निवडणुकीतील प्रचारात येथील भाजप आमदार महेश लांडगे आणि अजित पवारांची राष्ट्रवादी यांच्यातील वाद काही केल्या कमी होताना दिसून येत नाही. महेश लांडगेंनी अजित पवारांचा एकेरी भाषेत उल्लेख करत, आम्ही काय बांगड्या भरल्या नाहीत, जन्मत:च लंगोट घालणारे आम्ही आहोत, असे म्हणत चॅलेंज दिले होते. आता, पिंपरीतील महेश लांडगे अन् अजित पवार यांच्यातील वादात मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी उडी घेतली आहे. तसेच, शेरो शायरीच्या माध्यमातून अजित



पवारांवर टीका करत महेश लांडगेंना सल्ला दिला.

देवेंद्र फडणवीस यांनी प्रचार सभेच्या निमित्ताने पिंपरीत नाव न घेता अजित पवारांवर टीका केली. आमचे महेश लांडगे जरा वैतागले होते, कारण निवडणुका आल्या की अनेकांना कंठ फुटतो. अनेकजण आरोप करत आहेत. मात्र मी सांगू इच्छितो की, असे म्हणत फडणवीसांनी शायरीतून टोला लगावला.

''परिंदे को मिलेगी मंजिल एकदिन, ये उनके फैले हुये पंख बोलते है! और वही लोग जो खामोश रहते है, अक्सर जमाने मे जिनके हुनर बोलते है !!''

आपलं काम बोलतंय, त्यामुळे हा वैताग आहे, हा त्रागा आहे, हा राग राग आहे. जरा समजून घ्या दादा, ते रागावले म्हणून तुम्ही रागावू नका. त्यांना सांगायला काम नाही. त्यांना अनेक प्रश्न विचारले जातात, त्यांच्याकडे उत्तरं ना–हीत. त्यामुळे त्यांना आरोप–प्रत्यारोपात ही निवडणूक गुंतवून ठेवायची आहे. पण, आपण विकासाच्या मुद्यावर बोलत रहायला हवं. म्हणजे, आरोप–प्रत्यारोप करत बसण्याची वेळ येणार नाही. महेश दादा तुम्ही टीका करु नका, फक्त आपण केलेल्या कामांची आठवण करुन द्या. म्हणजे, महेश दादा टीका करण्याची गरज पडणार नाही, असा सल्लाच फडणवीसांनी महेश लांडगेंना दिला.

दरम्यान, एसआरएच्या मुद्यावरूनही अजित पवार आणि महेश लांडगे यांच्यात वाकयुद्ध रंगले होते, त्यावरही फडणवीसांनी भूमिका मांडली. महेश लांडगे म्हणाले कोणीतरी एसआरएसाठी धमकी देतंय. पण, काळजी करु नका, इथं कायद्याचं राज्य चालेल, धमकीचे नाही. तर त्याला त्याची जागा दाखवायला आमचे पोलीस आहेत. मला त्यामध्ये बोलायची गरज नाही. मुळात एसआरएचा मुख्य म्हणजे मीच अध्यक्ष आहे. जनतेचं हित लक्षात घेता, आपण जी कारवाई करायची, ती १६ जानेवारी नंतर करू, असे म्हणत देवेंद्र फडणवीसांनी अजित पवारांना इशारा, तर महेश लांडगेंना पाठिंबा दिलाय.

## बदलापुरातील तुषार आपटेचा राजीनामा

**ठाणे :** बदलापूर लैंगिक अत्याचार प्रकरणातील आरोपी तुषार आपटे याने स्वीकृत नगरसेवकपदाचा राजीनामा दिला आहे. लैंगिक अत्याचार प्रकरणातील आरोपीला भारतीय जनता पक्षाने स्वीकृत नगरसेवक केल्याने राज्यभरातून टीकेची झोड उठली होती. लैंगिक अत्याचार प्रकरणातील आरोपीला नगरसेवक करणे हेच 'पार्टी विथ डिफरन्स' असल्याचा घणा–घात विरोधी पक्षाने केला होता. सगळीकडूनच टीका होत असल्याने तुषार आपटे याने आपल्या स्वीकृत नगरसेवकपदाचा राजीनामा दिला.






## एपीएमसी मार्केटजवळ आचारसंहिता पथकाने पकडली १६ लाखांची रोकड

**मुंबई :** नवी मुंबई महानगरपालिकेने शहरात प्रवेशाच्या तसेच मुख्य विविध ९ ठिकाणी दिवसाच्या तिन्ही सत्रांमध्ये २४ तासात २७ स्थिर संनिरीक्षण पथके स्थापन केलेली आहेत. या पथकांमार्फत वाहने व इतर बाबींवर काटेकोर लक्ष ठेवण्यात येत आहे. महापालिका आयुक्त तथा निवडणूक अधिकारी डॉ. कैलास शिंदे यांचे निर्देशानुसार, आचारसंहिता कक्षाचे मुख्य सनियंत्रण अधिकारी सुनील पवार यांचे मार्गदर्शनाखाली, दि. ९ जानेवारी रोजी, दुपारी १२.३० वा. दरम्यान एपीएमसी मार्केट जवळील चेक पोस्टवर आचार संहिता कक्षाचे नोडल अधिकारी उपआयुक्त डॉ. अमोल पालवे व परिवहन उपक्रमाचे मुख्य लेखा आणि वित्त अधिकारी तुषार दौंडकर तसेच प्रशासकीय अधिकारी संजीव पवार यांच्या नियंत्रणाखाली एकूण रू. १६,१६,०००/– इतक्या किंमतीची रोकड पकडण्यात आली आहे. याबाबत पुढील कार्यवाही सुरू आहे.

## थोडक्यात...

### जालन्यात ९८ लाखांची रोकड जप्त

**जालना :** जालना शहर महानगरपालिका निवडणूक २०२५ च्या अनुषंगाने शहरात आदर्श आचारसंहिता लागू आहे. प्रशासकीय यंत्रणा अत्यंत सतर्कतेने काम करत आहे. यादरम्यान, जालना शहरातील छत्रपती संभाजीनगर चौफुली टोलनाका येथील स्थितिक सर्वेक्षण पथकाने शुक्रवारी दुपारी कारवाई करत एका वाहनातून ९८ लाखांची रोख रक्कम जप्त केली.

### पुणे रेल्वेचा १० दिवसांचा 'मेगाब्लॉक'!

**पुणे :** पुणे आणि दौंड दरम्यान प्रवास करणाऱ्या प्रवाशांसाठी महत्त्वाची बातमी आहे. रेल्वेच्या तांत्रिक कामामुळे पुणे विभागातून सुटणाऱ्या आणि येणाऱ्या रेल्वे गाड्यांवर मोठा परिणाम होणार आहे. दौंड–मनमाड रेल्वे मार्गावरील दुहेरीकरणाच्या कामासाठी १५ जानेवारी ते २५ जानेवारी २०२६ दरम्यान रेल्वेने मेगाब्लॉक जाहीर केला आहे.

### खोट्या गुन्ह्यात अडकवण्याचा कट

**मुंबई :** राज्यात सध्या महानगर पालिका निवडणुकांचा प्रचार शिगेला पोहोचला आहे. सर्वच पक्षांकडून जोरदार मोर्चेबांधणी केली जात आहे. दरम्यान, महाराष्ट्राच्या राजकारणात खळबळ उडवून देणारी बातमी समोर आली आहे. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांना खोट्या गुन्ह्यात अडकवण्याचा एक मोठा कट समोर आला आहे. ज्यात महाविकास आघाडी सरकारच्या काळात तत्कालीन विरोधी पक्षनेते देवेंद्र फडणवीस आणि मविआ सरकारमधील मंत्री एकनाथ शिंदे यांना अडकवण्याचा कट शिजत होता.

## टेक ऑफनंतर अवघ्या १० मिनिटांत विमान क्रॅश!

**भुवनेश्वर :** भारतात मोठी विमान दुर्घटना घडली आहे. ओडिशामध्ये एक चार्टर्ड विमान कोसळले आहे. भुवनेश्वरहून उड्डाण करणाऱ्या एका चार्टर्ड विमानाने



लँडिंगच्या काही काळापूर्वीच आपत्कालीन लँडिंग केले. या विमान दुर्घटनेत ६ जण जखमी झाल्याची प्राथमिक माहिती समोर आली आहे. तपास यंत्रणा या विमान दुर्घटनेची कसून चौकशी करत आहेत.

१० जानेवारी रोजी ओडिशातील राउरकेला हवाई पट्ट्यावर एक मोठी दुर्घटना टळली. विमान कोसळले. या अपघातात दोन्ही वैमानिकांसह सहा जण जखमी झाले आहेत. तथापि, सर्व जखमी धोक्याबाहेर असल्याचे सांगण्यात येत आहे, ही दिलासादायक बाब आहे. मिळालेल्या माहितीनुसार इंडिया वन एअरने चालवलेले हे चार्टर्ड विमान भुवनेश्वर विमानतळावरून निघाले. विमान राउरकेला विमानतळावर उतरण्याच्या तयारीत असताना तांत्रिक बिघाडामुळे पायलटला आपत्कालीन क्रॅश लँडिंग करावे लागले. नऊ आसनी असलेले चार्ली–२०८ विमान दुर्घटनाग्रस्त झाले आहे.

या अपघातात ६ जण जखमी झाले आहेत. कॅप्टन नवीन कडंगा आणि सह–वैमानिक तरुण श्रीवास्तव अशी या विमानातील पायलटची नावे आहेत. जखमी प्रवाशांमध्ये सुशांत कुमार बिस्वाल, अनिता साहू, सुनील अग्रवाल आणि सबिता अग्रवाल यांचा समावेश आहे. सर्व जखमींना तातडीने जवळच्या रुग्णालयात दाखल करण्यात आले, जिथे त्यांच्यावर सध्या उपचार सुरू आहेत.

भुवनेश्वर विमानतळ संचालक प्रसन्ना प्रधान यांनी घटनेची पुष्टी केली, त्यांनी सांगितले की सर्व जखमी सुरक्षित आहेत आणि कोणीही गंभीर नाही. त्यांनी पुढे सांगितले की विमानाने आपत्कालीन लँडिंग केले, काही प्रवासी आणि कर्मचारी जखमी झाले, परंतु बचाव आणि मदत कार्य वेळेवर सुरू करण्यात आले.




## फ्रीजचा स्फोट होवून तिघांचा होरपळून मृत्यू

### गोरेगाव पश्चिममधील रात्री ३ च्या सुमारास घडली घटना

**मुंबई :** गोरेगाव (पश्चिम) येथील भगतसिंह नगर, राजाराम लेन, जनता स्टोअर्सजवळील झोपडपट्टीतील एका छोट्या घरात असलेल्या फ्रिजचा अचानक स्फोट झाला आणि शुक्रवारी–शनिवारी मध्यरात्री भीषण आग लागल्याची गंभीर घटना घडली. या आगीत दोन मुलांसह तिघांचा होरपळून मृत्यू झाला. मिळालेल्या माहितीनुसार, १० जानेवारी २०२६ रोजी पहाटे ३ वाजून ६ मिनिटांनी या आगीची माहिती मुंबई अग्निशमन दलाला देण्यात आली. स्थानिक नागरिकांनी सांगितले की, रात्री दीड वाजल्यानंतर घरा–तून मुलांच्या किंचाळण्याचे आवाज ऐकू येत होते. त्यानंतर नागरिकांनी दरवाजा तोडून आत अडकलेल्यांना वाचवण्याचा प्रयत्न केला, मात्र तो निष्फळ ठरला.

घरात असलेल्या फ्रिजचा अचानक स्फोट झाल्याने लागलेल्या आगीत वडील आणि त्यांच्या दोन मुलांचा होरपळून दुर्दैवी



मृत्यू झाला. या घटनेमुळे संपूर्ण परिसरात हळहळ व्यक्त केली जात आहे. मिळालेल्या माहितीनुसार, ही घटना रात्री ३ च्या सुमारास घडली. पावस्कर कुटुंब गाढ झोपेत असताना अचानक घरातील फ्रिजचा मोठा स्फोट झाला आणि काही क्षणांतच घराला आगीने वेढले. घराला प्लास्टिक शीट लावलेली असल्याने आगीचा भडका अधिकच उडाला. या आगीत संजोग पावस्कर (वडील) आणि त्यांची दोन मुले हर्षदा पावस्कर (१९ वर्षे) व कुशल पावस्कर (१२ वर्षे) यांचा मृत्यू झाला. आग लागल्यानंतर जीव वाचवण्यासाठी लहान मुलांनी धडपड केली. १२ वर्षांचा कुशल आग टाळण्यासाठी घरातील बाथरूममध्ये जाऊन लपला होता. मात्र, प्लास्टिक शीटमुळे आग वेगाने पसरली आणि धुराचे लोट वाढल्याने मुलांचा गुदमरून आणि होरपळून मृत्यू झाला.

या घटनेत सुदैवाची बाब म्हणजे मुलांची आई रात्रपाळीच्या कामावर गेली होती. त्या घरी नसल्यामुळे या भीषण आगीतून त्या बचावल्या आहेत.

CMYK

सोलापूर तरुण भारत, सोलापूर, येथून प्रकाशित केले.
विभागीय आवृत्ती : धाराशिव, लातूर, सातारा, छत्रपती संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.



# रस्ता दुरुस्तीसाठी सेवानिवृत्तांनी दिला उपोषणाचा इशारा

**तभा वृत्तसेवा,**

**शिरूर अनंतपाळ १० जानेवारी :** शिरूर अनंतपाळ -आरी मोड -कांबळगा - मुशीराबाद - बोरी चामेवाडी व बाभळगाव लातूर जाणाऱ्या रस्ताचे मजबुतीकरण करण्यात यावे, या मागणीसाठी शिरूर अनंतपाळ येथील सेवानिवृत अधिकारी व कर्मचाऱ्यांनी उपोषणाचा इशारा दिला आहे.

गेल्या सात-आठ वर्षांपासून सा.बां. विभाग व ग्रामीणच्या आमदारांना निवेदने देऊन रस्ता दुरुस्त करून रस्त्याचे मजबुती करण करण्यात यावे, यासाठी शेकडो निवेदने देऊन एक वेळा लातूर येथील सार्वजनिक बांधकाम विभागासमोर एकदिवसाचे धरणे आंदोलनही केले होते. त्यावेळी केवळ चामेवाडी ते मुशीराबाद पर्यंत रस्त्याची डागडूजी करण्यात आली. पण आज रोजी रस्त्यावर मोठमोठे खड्डेच खड्डे दिसून येत आहेत. त्यामुळे रस्तावरून वाहन घेऊन जाणे म्हणजे मरणाला आमंत्रण देण्यासारखे आहे . त्यामुळे कृषी



उत्पन्न बाजार समितीचे माजी सभापती तथा काँग्रेसचे ज्येष्ठ नेते एल. बी. आवाळे यांच्या नेतृत्वाखाली दि. ९ जानेवारी २६ रोजी कार्यकारी अभियंता सार्वजनिक बांधकाम विभाग, लातूर यांना निवेदन देऊन बाभळगाव-चामेवाडी-बोरी-मुशीराबाद कांबळगा-आरीमोड-शिरूर अनंतपाळ रस्त्याचे कायमस्वरुपी काम दि.१९ जानेवारी २०२६ पर्यंत सुरुवात नाही केल्यास आपल्या कार्यालयासमोर लाक्षणिक उपोषण करण्यात येणार असल्याचा इशारा दिला आहे .

बाभळगाव-चामेवाडी-बोरी मुशिराबाद-कांबळगा-आरीमोड-शिरूर अनंतपाळ रस्ता पुढे साकोळ, जवळगा, वलांडी, देवणी ते भालकी, बीदरकडे जातो. हा कर्नाटक राज्याला जोडणारा सर्वात जवळचा मार्ग आहे. या रस्त्यावर फार मोठ्या प्रमाणावर वाहतूक आहे. बाभळगाव सेलू, पडीले पेट्रोलपंप ते विलासराव देशमुख चौक बोरी पुढे मुशीराबाद, ता. लातूर हद्दीपर्यंत रस्त्याची अवस्था अत्यंत बिकट व खराब झालेली आहे. आदिच रस्ता खराब आणि त्यातच या रस्त्याच्या बाजुने गटारी नसल्यामुळे गावातील सांडपाणी व पावसाचे पाणी रस्त्यावर थांबते. त्यामुळे रस्त्याची अवस्था अत्यंत वाईट व दयनीय झालेली आहे. रस्त्याच्या दोन्ही बाजुने झाडेझुडपे मोठया प्रमाणात वाढलेली आहेत. मुशीराबाद गावात सिमेंट रस्त्याचे काम १०-१२ वर्षांपूर्वी अर्धवट केलेले आहे.

अर्धवट रस्ता सोडल्यामुळे त्या भागामध्ये सतत अपघात होतात. लातूर जिल्ह्यातील सर्व तालुके सिमेंट रस्त्याने जोडलेले आहेत. फक्त शिरूर अनंतपाळ तालुका सिमेंट रस्त्याने जोडलेला नाही, ही खेदाची बाब आहे. यासाठी सेवानिवृत्त अधिकारी व नागरीक शिरूर अनंतपाळचे एल.बी. आवाळे यांच्या नेतृत्वाखाली बी.एम. धुमाळे,

एस.एम. दरेकर, डी.एन. कोटलवार, एस.वाय. नाब्दे , माजी सैनिक आनंद कामगुंडा शिरूर अनंतपाळचे माजी सरपंच नामदेवराव जगताप यांच्या स्वाक्षरीचे निवेदन कार्यकारी अभियंता सार्वजनिक बांधकाम विभाग, लातूर, मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, सार्वजनिक बांधकाम मंत्री, महाराष्ट्र राज्य तथा पालकमंत्री शिवेंद्रराजे भोसले ,अधिक्षक अभियंता, सार्वजनिक बांधकाम मंडळ, लातूर, जिल्हाधिकारी जिल्हाधिकारी कार्यालय, पोलिस अधिक्षक कार्यालय, लातूर यांना देण्यात आले आहे.

# मुख्यमंत्री सुंदर माझी शाळा उपक्रमात महांडोळची शाळा प्रथम



**तभा वृत्तसेवा,**

**चाकूर, १० जानेवारी :** मुख्यमंत्री सुंदर माझी शाळा उपक्रमांतर्गत चाकूर तालुक्यातील शेळगाव केंद्रातील महांडोळ येथील जिल्हा परिषद शाळेने प्रथम क्रमांक पटकावला आहे. मुख्याध्यापिका जिजाबाई माने यांनी लोकसहभागातून या शाळेचा कायापालट केल्याने शाळेने सदर यश संपादन केले आहे.

मुख्यमंत्री माझी सुंदर शाळा टप्पा क्रमांक ३ मध्ये केंद्रस्तरीय मुल्यांकनासाठी एक पथक नेमण्यात आले होते. त्यामध्ये चापोली केंद्राचे केंद्रप्रमुख सुरेश केंद्रे ,चापोली येथील संजीवनी उच्च माध्यमिक महाविद्यालयाचे प्रा.महेंद्र वळसंगीकर,चाकूर येथील जि. प. शाळेचे अविनाश भोकरे आणि चापोली येथील स्वामी विवेकानंद विद्यालयाचे मुख्याध्यापक व्यंकट शिंदे यांनी अतिशय सखोल व पारदर्शक मुल्यांकन केले. अतिशय कमी वेळेत शेळगाव केंद्रातून जिल्हा परिषद प्राथमिक शाळा महांडोळ या शाळेत विविध भौतिक सुविधा, शैक्षणिक साहित्य, विद्यार्थी प्रिय वातावरण यामुळे महांडोळ जिल्हा परिषद शाळेचा प्रथम क्रमांक आला.

# महिला सक्षमीकरण समाजाच्या प्रगतीचा मार्ग : हभप शेळके सृष्टी

**त.भा. वृत्तसेवा,**

**निलंगा, १० जानेवारी :**



महाराष्ट्र महाविद्यालय निलंगा राष्ट्रीय सेवा योजना विभागाच्या वतीने मौजे लिंबाळा येथे विशेष वार्षिक श्रमसंगकार शिबिर चालू असून त्यात महाराष्ट्र महाविद्यालयाच्या बी कॉम प्रथम वर्षाची विद्यार्थिनी ह.भ.प. कु.सृष्टी शेळके यांचे महिला सक्षमीकरणावर व्याख्यान आयोजित करण्यात आले होते. यावेळी कीर्तनाच्या माध्यमातून बोलताना त्यांनी समाजाच्या सर्वांगीण विकासासाठी महिला सक्षमीकरण करणे अत्यंत गरजेचे असल्याचे सांगितले.

शिक्षण, आरोग्य, रोजगार आणि स्वावलंबनाच्या माध्यमातून महिलांना सक्षम बनवणे गरजेचे असल्याचे सांगितले. यासाठी शासन, नागरिकांनी पुढाकार घेऊन त्यांना संधी उपलब्ध करून दिल्यास महिलांचे आर्थिक व सामाजिक स्थान अधिक बळकट होईल असे प्रतिपादन केले. यावेळी गावातील ज्येष्ठ नागरिक, महिला, सरपंच, उपसरपंच राष्ट्रीय सेवा योजनेचे कार्यक्रम अधिकारी डॉ.व्ही पी.सांडूर, प्रा.एस. एस बदनाळे, प्रा.एस.एम.दिवे स्वयंसेवक विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# २६ जानेवारीपर्यंत मेनरोड परिसरातील समस्या सोडवा

**त.भा. वृत्तसेवा,**

**अहमदपूर, १० जानेवारी :** शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाच्या प्रभाग क्रमांक सहाच्या नूतन नगरसेविका सौ. कोमल दीपक हालसे यांनी आपल्या प्रभागातील मुख्य समस्या संदर्भात नगरीचे नगराध्यक्ष श्री स्वप्निल जी व्हते व मुख्य अधिकारी यांना निवेदन सादर केले.

यात त्यांनी व्यापाऱ्याच्या जिव्हाळ्याचा प्रश्र्न म्हणजे जुना आंबेडकर चौक येथे नगरपरिषदेचे जे कॉम्प्लेक्स आहे त्यातील सुलभ स्वच्छतालय सर्व सुविधांनी युक्त तात्काळ चालू करावे. ग्रामीण रुग्णालय अहमदपूर येथे मूळ गावातील लोकांना औषध उपचारा साठी ये जा करण्यासाठी जो जुना रस्ता होता तो अधिकाऱ्याच्या खोडसाळपणामुळे बंद करण्यात आलेला आहे. तो तात्काळ खुला व्हावा. तसेच नगरपरिषदेचे साफसफाई करणारे कर्मचारी यांचा

## नगरसेवक व व्यापाऱ्यांचे यांचे नगराध्यांना निवेदन

काही वर्षापासून पगार रखडलेला आहे ते तात्काळ मार्गी लावावे. उन्हाळ्याची चाहूल लक्षात घेता प्रभागातील सर्व बोर विहीर याची दुरुस्ती व सुधारणा करण्यात यावी. शहरातील जाज्वल्य देवस्थान शिप्र गणेश मंदिर येथे दर बुधवारी महापूजा व महाप्रसाद असतो या ठिकाणी हजारो सदभक्त दर्शनासाठी येत असतात तेथील साफसफाई आठवड्याच्या प्रत्येक गुरुवारी करण्यात यावे.

या सर्व विषयी निवेदन सादर करण्यात आले असून येणाऱ्या प्रजासत्ताक दिनापर्यंत सर्व प्रश्न




सोडवावेत अन्यथा नगर परिषदेच्या प्रांगणात प्रजासत्ताक दिनास उपोषणास बसणार आहे असे निवेदना द्वारे कळविले आहे.

यावेळी दीपक हालसे, नगरसेवक प्रतीक बालाजी रेड्डी, माजी नगरसेवक धनंजय जोशी, राष्ट्रवादी शरदचंद्रजी पवार पक्षाचे युवक शहराध्यक्ष समीर खान पठाण, डॉक्टर मधुसूदन चेरेकर, दिलीप शास्त्री, कुमार महाराज, चव्हाण, सुनील भुतडा, मनोज सोनी, विजय सोनी, निलेश बाहेती, बालाजी काळवदे, सौरभ फुलारी, इत्यादी सह नागरिक व व्यापारी यांच्या वतीने निवेदन देण्यात आले.

# करिअरची पायाभरणी योग्य वेळी करा : यादव

**त.भा. वृत्तसेवा,**

**जळकोट, १० जानेवारी :** पुढील दहा वर्षाचा विचार करून करिअरची सुरुवात करायला सुरुवात करा १२ वी नंतर करिअरच्या




अनेक संधी उपलब्ध आहेत. त्या आपण शोधाव्यात आणि करिअरची पायाभरणी योग्यवेळी करावी असे प्रतिपादन संभाजीराव केंद्रे कनिष्ठ महाविद्यालयाचे प्राचार्य जयदीप यादव यांनी केले.

येथील आकरावी आणि बारावी शाखेत शिकत असलेल्या विद्यार्थ्यासाठी १२ वी नंतर करिअरच्या संधी या विषयावर बोलत होते .

याप्रसंगी या कार्यक्रमाचे अध्यक्ष म्हणून प्राचार्य राहूल लटपटे होते. प्रा गौताळे एस.ए., प्रमुख पाहुणे म्हणून श्रीहरी वेदपाठक, (डी बी इन्स्ट्यूट ऑफ फॉर्मसी महाळंगा) ग्रंथपाल प्रा. डॉ. नामदेव राठोड आदी मान्यवर उपस्थित होते.

पुढे बोलताना प्राचार्य डॉ जयदीप यादव यांनी टेक्निकल, मेडीकल, पॅरॉमेडीकल, लाईफ सायन्स, बायोमेडीकल, बी टेक फॉरेन्सीक सायन्स , हायब्रीड कोर्स उपलब्ध आहेत. बेसिक सायन्स मध्ये संशोधन करणाऱ्या संस्थेमधून शिक्षण घेतलात तर चांगले आर्थिक पॅकेज मिळविता येते.

टेक्निकल कोर्ससला आज एन्टरन्स परिक्षा आहेत नीट सारख्या परिक्षा द्यावी लागेल. पॅरामेडिकल कोर्समध्ये नर्सिंग, लॅब टेक्निशियन म्हणून काम करता येईल. जॉब प्रोफाइल तयार करा. एम्स सारख्या संस्थेतून पदवी प्राप्त केल्यानंतर सरकारी नोकरी मिळू शकते .फूड इन्डस्टिज लाईफ सायन्स बायो केमेस्ट्रिरी, मायक्रोबायलाजीस्ट बनता येते असे म्हणाले.

यावेळी प्रा मुंडे. जी.आर., प्रा. श्रीमंगले. बी. एल, प्रा.कांबळे डी.बी, व शिक्षकेत्तर कर्मचारी केंद्रे. बी.एच, कांबळे. पी.एस, सोनहिवरे.डी.एम, दाडगे.आर. ए, श्रीमती गायकवाड.ए.व्ही आदी उपस्थित होते. या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्रा. कांबळे डी. बी. यांनी केले तर आभार श्रीमंगले बी. एल. र यांनी मानले.

# लेखी आश्वासनानंतर उपोषण घेतले मागे

**त.भा. वृत्तसेवा,**

**शिरुर अनंतपाळ, १० जानेवारी :** शिरूर अनंतपाळ येथील तहसील कार्यालयासमोर वंचित बहुजन आघाडीच्या तालुका शाखेच्या वतीने विविध मागण्यांसाठी बेमुदत उपोषण सुरू होते. अखेर चौथ्या दिवशी प्रशासनाच्या लेखी आश्वासनानंतर उपोषण मागे घेण्यात आले.

वंचित बहुजन आघाडीचे तालुकाध्यक्ष प्रवीण सूर्यवंशी यांच्या नेतृत्त्वात येथील तहसील कार्यालयासमोर सोमवारपासून बेमुदत उपोषण सुरू होते. तहसील कार्यालय तसेच पंचायत समितीत बायोमॅट्रिक प्रणाली सुरू करावी, भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या पुतळ्यासाठी तालुकास्तरावर जागा उपलब्ध करून द्यावी, आदी मागण्यांसाठी हे उपोषण सुरू होते.

# कासार शिरसी पोलीस ठाण्यात रेझींग डे

**त.भा. वृत्तसेवा,**

**कासार सिरसी, १० जानेवारी :** कासार शिरसी पोलीसांच्या वतीने संपूर्ण जिल्ह्यात रेझींग डे साजरा केला जात असुन पोलीस अधीक्षक अमोल तांबे यांच्या मार्गदर्शनाखाली येथील पोलीस ठाण्यात शुक्रवार दि. ९ जानेवारी रोजी रेझींग डे साजरा करण्यात आला.

यावेळी सहायक पोलिस निरीक्षक प्रविण राठोड विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करताना म्हणाले की, नागरीकांना व शालेय विद्यार्थ्यांना पोलीस प्रशासन कसे चालते व विविध हत्यारांची माहिती व्हावी यासाठी हा रेझींग डे साजरा करण्यात येतो. तर पोलीस उपनिरीक्षक अजय पाटील यांनी येथील मदर तेरेसा इंग्लिश स्कूलच्या विद्यार्थ्यांना विविध हत्यारांची माहिती दिली.



यात बोअर रायफल, पिस्टल, सेल्फ लोडेड बंदुक, लाठी व सुरक्षा कवच या विषयी सखोल माहिती दिली तर विद्यार्थ्यांनी उत्सुफुर्त पणे सहभाग नोंदवत प्रशासकीय कामकाजाची माहिती घेतली. या रेझींग डे निमित्त सपोनि प्रविण राठोड, सपोनि प्रताप गर्जे, पोलिस उपनिरीक्षक अजय पाटील, पोलीस बालाजी जाधव, नवनाथ इंदापुरे, सुनिल मुळे, केशव ढोणे, गणेश सोनटक्के, मुख्याध्यापक ज्ञानेश्वर मडोळे, शिक्षक अनिल जगताप, आकाश गायकवाड, संगिता गायकवाड, पल्लवी उमापुरे, वैष्णवी आकडे, कोमल पांचाळ, रंजना सुर्यवंशी, संध्या जाधव, विद्या बरकंबे, सविता अंतरेड्डी, संध्या गायकवाड, विद्यार्थी उपस्थित होते.

# अवकाश सफरीतून ‘यशवंत’च्या विद्यार्थ्यांनी घेतले ब्रह्मांडाचे ज्ञान

**त.भा. वृत्तसेवा,**

**अहमदपूर, १० जानेवारी :** यशवंत विद्यालय, अहमदपूर येथील विद्यार्थ्यांनी ‘फिरते तारांगण’ या अनोख्या उपक्रमातून ब्रह्मांडातील अदभूत रहस्यांचा रोमांचक अनुभव घेतला. कला व भूगोल विभागाच्या नाविन्यपूर्ण कल्पनेतून राबविण्यात आलेल्या या उपक्रमाने विद्यार्थ्यांच्या ज्ञानकक्षा भक्कमपणे रुंदावल्या.

हवा भरून उभे केलेल्या विशेष डोममध्ये बसून विद्यार्थी जणू आकाशगंगेतच प्रवेश करतात. चंद्र, सूर्य, तारे आपल्या अगदी जवळ असल्याचा भास निर्माण होतो. पृथ्वी पलीकडील ताऱ्यांचे विश्र्व डोळ्यासमोर जिवंत उभे राहते आणि अवकाश किती विशाल आहे याची प्रत्यक्ष अनुभूती विद्यार्थ्यांना मिळते. सामान्यतः अतिरंजीत वाटणारी ही कल्पना, यशवंत विद्यालयात मात्र साकार झाली.

हा उपक्रम भाग्यलक्ष्मी रोलिंग मिल प्रा. लि., जालना व पोलाद स्टील यांच्या संयुक्त विद्यमाने चव्हाणवाडी शाळेत आयोजित करण्यात आला. अंदाजे पाच ते आठ मीटर व्यासाचे डीजी स्टारचे हवा भरलेले तारांगण काही क्षणांत उभे राहत होते. मध्यभागी बसवलेल्या अत्याधुनिक फिश-आय लेन्स आणि उच्च दर्जाच्या रिझोल्युशन प्रोजेक्टरमुळे विद्यार्थ्यांना त्रिमितीय आकाश दर्शनाचा थक्क करणारा अनुभव मिळाला. एका वेळी ४५ ते ५० विद्यार्थी डोममध्ये बसू शकतात. हा उपक्रम सलग तीन दिवस राबविण्यात येत असून तब्बल ३५०० विद्यार्थी या फिरत्या तारांगणातून अवकाश सफरीचा आनंद घेणार आहेत.

यावेळी भूगोल शिक्षक विजय चव्हाण, राजाराम निलेवाड, अरुणकुमार चोचंडे, भिमराव कांबळे, मधुबाला आंधळे तसेच विज्ञान शिक्षक गिरीहरी गिरी, गौरव चवंडा, सांगवीकर मॅडम यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले. दृकश्राव्य माध्यमाच्या यशस्वी अंमलबजावणीसाठी कलाशिक्षक महादेव खळुरे यांचे विशेष योगदान राहिले.

या नाविन्यपूर्ण उपक्रमाचे माध्यमिक शिक्षणाधिकारी डॉ. दत्तात्रय मठपती, प्राथमिक शिक्षणाधिकारी तृप्ती अंधारे, गटशिक्षणाधिकारी बबनराव ढोकाडे, टागोर शिक्षण संस्थेचे अध्यक्ष डॉ. अशोक सांगवीकर, सचिव डी. बी. लोहारे गुरुजी, उपाध्यक्ष डॉ. भालचंद्र पैके, सहसचिव डॉ. सुनिता चवळे, प्राचार्य गजानन शिंदे, उपमुख्याध्यापक माधव वाघमारे, पर्यवेक्षक रामलिंग तत्तापुरे, शिवाजी सुर्यवंशी आदींनी कौतुक व अभिनंदन केले.

यशवंत विद्यालयातील ‘फिरते तारांगण’ हा उपक्रम विद्यार्थ्यांच्या कल्पनाशक्तीला पंख देणारा, विज्ञान-भूगोल शिक्षणाला नवी दिशा देणारा आणि ब्रह्मांडाकडे पाहण्याची दृष्टी बदलणारा ठरला आहे.

# अहमदपूरमध्ये शेतकरी प्रशिक्षण संपन्न

**त.भा. वृत्तसेवा,**

**अहमदपूर, १० जानेवारी :** महाराष्ट्र शासनाच्या कृषी विभागामार्फत, तालुका कृषी अधिकारी कार्यालय अहमदपूर यांच्या वतीने राष्ट्रीय अन्नसुरक्षा अभियान (कडधान्य) २०२५-२६ अंतर्गत पीक पद्धतीवर आधारित एकदिवसीय शेतकरी प्रशिक्षणाचे आयोजन सुनेगाव (शें.) येथे करण्यात आले होते. खरीप व रब्बी हंगामातील कडधान्य उत्पादकता वाढवण्यासाठी आधुनिक तंत्रज्ञानाची माहिती शेतकऱ्यांपर्यंत पोहोचवणे हा या कार्यक्रमाचा मुख्य उद्देश होता.

या कार्यक्रमाचे अध्यक्षस्थानी राम जायभाये हे होते . या कार्यक्रमात कृषी विभागाच्या विविध अधिकाऱ्यांनी शेतकऱ्यांना सखोल तांत्रिक मार्गदर्शन केले. यात दिलीप जाधव (मंडळ कृषी अधिकारी) यांनी तूर पिकाचे लागवड तंत्रज्ञान, एकात्मिक खत व्यवस्थापन आणि मर रोगावर उपाययोजना यावर माहिती दिली. तसेच 'महाविस्तार ए आय प'ची उपयुक्तता आणि 'प्रधानमंत्री सूक्ष्म अन्न प्रक्रिया योजना' यांसारख्या शासकीय योजनांचा लाभ घेण्याचे आवाहन केले.




# राजीव गांधी तंत्रनिकेतन महाविद्यालयात चर्चासत्र

**त.भा. वृत्तसेवा,**

**उदगीर, १० जानेवारी :** अखिल भारतीय विद्यार्थी परिषद ही देशातील अग्रगण्य विद्यार्थी संघटना असून गेल्या ७७ वर्षांपासून शैक्षणिक, सांस्कृतिक व सामाजिक क्षेत्रात सातत्याने कार्यरत आहे. विद्यार्थ्यांचा सर्वांगीण विकास साधावा या उद्देशाने अभाविपतर्फे विविध उपक्रम राबवले जात आहेत.

अभाविप दरवर्षी राज्यस्तरीयप्रकल्प प्रदर्शनाचे आयोजन करते. यावर्षी हा कार्यक्रम छत्रपती संभाजीनगर येथे आयोजित करण्यात आला असून, या माध्यमातून विद्यार्थ्यांना उद्योगपती,

## विद्यार्थ्यांना उद्योगविश्वाशी जोडणारा दिशादर्शक उपक्रम

शिक्षणतज्ज्ञ व समाजाशी जोडण्याचे महत्त्वपूर्ण कार्य केले जाणार आहे. तसेच शैक्षणिक क्षेत्र आणि उद्योगजगत यांमधील दरी कमी करण्याचा प्रयत्न या उपक्रमातून केला जात आहे.

या पार्श्वभूमीवर, राजीव गांधी तंत्रनिकेतन महाविद्यालय, उदगीर येथे अभाविपतर्फे आयोजन करण्यात आले. या कार्यक्रमासाठी उदगीर येथील नारायणा ॲग्रो ऑईल्सचे व्यवस्थापकीय संचालक सागर महाजन हे प्रमुख अतिथी म्हणून उपस्थित होते. त्यांनी विद्यार्थ्यांना उद्योग, नवोपक्रम, स्टार्टअप ,स्वप्न, संधी तसेच करिअर नियोजनाबाबत मोलाचे मार्गदर्शन केले.

या प्रसंगी अभाविप लातूर विभाग संघटन मंत्री महेश भवर यांनी अभाविपची भूमिका व उपक्रमाची सविस्तर मांडणी केली.

या कार्यक्रमास महाविद्यालयाचे प्राचार्य मा. जाधव उपस्थित होते त्यांनी अभाविपच्या या उपक्रमाचे कौतुक करत विद्यार्थ्यांसाठी अशा मार्गदर्शक कार्यक्रमांची गरज अधोरेखित केली.

अभाविपतर्फे राबविण्यात आलेला हा उपक्रम विद्यार्थ्यांना उद्योगाभिमुख शिक्षणाकडे वळवणारा आणि त्यांच्या भविष्यातील करिअरला नवी दिशा देणारा ठरेल, असा विश्वास व्यक्त करण्यात आला. यावेळी अभाविप उदगीर शहर मंत्री सुमित लाल उपस्थीत होते.

सोलापूर तरुण भारत

www.dainiktarunbharat.com, epaper.dainiktarunbharat.com

## थोडक्यात...

### भारतीय संस्कृती: अध्यात्म व इतिहास ग्रंथाचे प्रकाशन



**छत्रपती संभाजीनगर :** साताऱ्यातील ९९ व्या अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलनात लेखिका सुनिता कावसनकर यांच्या भारतीय संस्कृती : अध्यात्म व इतिहास या ग्रंथाचे दिमाखदार प्रकाशन पार पडले. 'युगंधरा पब्लिकेशन'तर्फे स्व-प्रकाशित झालेल्या या पुस्तकाचे अनावरण सुप्रसिद्ध साहित्यिक राजन लाखे व ज्येष्ठ लेखक विठ्ठल वाघ यांच्या हस्ते करण्यात आले. राजन लाखे यांनी ग्रंथाचे वर्णन संस्कृती, इतिहास व साहित्याचा प्रभावी संगम असे केले. लेखिका सुनिता कावसनकर यांनी भारतीय संस्कृती, अध्यात्म व इतिहासाच्या मूल्यसंवर्धनावर भर देत कृतज्ञता व्यक्त केली. शेकडो साहित्यप्रेमींच्या उपस्थितीत हा कार्यक्रम यशस्वीरीत्या पार पडला.

### केऱ्हाळा शाळेत विद्यार्थ्यांना फराळ वाटप




**सिल्लोड :** जिल्हा परिषदेच्या शाळांमधून विद्यार्थ्यांचा भौतिक विकास साधण्यासाठी. शासन पातळीवर विविध योजना राबवल्या जात असून. जिल्हा परिषदेच्या शाळा वाचवणे ही काळाची गरज आहे तरच ग्रामीण विद्यार्थी व मराठी भाषा वाचवू शकेल याकरिता अखिल भारतीय मराठी पत्रकार संघ कटिबद्ध आहे. अशी ग्वाही जिल्हा पत्रकार संघाचे उपाध्यक्ष संजय कुलकर्णी यांनी दर्पण दिनाच्या निमित्ताने विद्यार्थ्यांसमोर बोलताना दिली. उद्योजक पांडुरंग पाटील जिवरग यांच्या प्रमुख उपस्थितीत व मुख्याध्यापक रामचंद्र मोरे अध्यक्षतेखाली संपन्न झालेल्या कार्यक्रमास पत्रकार संघाचे जिल्हा उपाध्यक्ष संजय कुलकर्णी, तालुकाध्यक्ष सचिन चौबे, निलेश सोनटक्के, राजू वैष्णव, अनिल कुलकर्णी, जावेद सौदागर, गजानन मरकड, दत्ता ढोरमारे, कैलास पांढरे, अंकुश पवार, विलास देहाडे यांच्या हस्ते आचार्य बाळशास्त्री जांभेकर प्रतिमेचे पूजन करण्यात येऊन. पत्रकार दिनाचे महत्त्व विद्यार्थ्यांना विशद करण्यात आले.

### लासूर स्टेशन धन्वंतरी डॉक्टर्स असोसिएशन अध्यक्षपदी डॉ. विजय खरात

**लासूर स्टेशन :** लासूर स्टेशन येथील वैद्यकीय क्षेत्रातील प्रसिद्ध



व्यक्तिमत्त्व डॉ. विजय खरात यांची धन्वंतरी डॉक्टर्स असोसिएशनच्या अध्यक्षपदी एकमताने निवड करण्यात आली. बुधवारी झालेल्या बैठकीत ही निवड सर्वानुमते करण्यात आली. या वेळी डॉ. विकास संगेकर यांनी ठराव मांडला, तर डॉ. जीवन ताजी यांनी त्यास अनुमोदन दिले. मावळते अध्यक्ष डॉ. बन्सीलाल बंब यांनी नवनिर्वाचित अध्यक्ष डॉ. खरात यांच्या निवडीचे स्वागत करून त्यांना शुभेच्छा दिल्या. याच बैठकीत डॉ. अशोक ठोळे यांची कार्याध्यक्षपदी निवड करण्यात आली. या प्रसंगी डॉ. सुभाष शिहरे, डॉ. संतोष साबळे, डॉ. भगवान गायके, डॉ. किशोर जगताप, डॉ. गोपाल धूत, डॉ. निलेश मुंदडा, डॉ. सागर सोनवणे, डॉ. तुषार विसपुते, डॉ. अनिल ठोळे, डॉ. राजेंद्र ठोळे, डॉ. मुकुंद चंडिले, डॉ. संदीप पाटील, डॉ. अब्दुल शेख उपस्थित होते.

### विसापूर कारागृहातील 'बंदी' आता होणार 'मेकॅनिक'

**अहिल्यानगर :** शिक्षा भोगून बाहेर पडल्यानंतर सन्मानाने जगता यावे, यासाठी विसापूर खुल्या कारागृहातील बंद्यांच्या हाताला आता कौशल्याचे बळ मिळणार आहे. कारागृहातील बंद्यांसाठी दुचाकी व तीन चाकी वाहनांच्या दुरुस्तीचे (मेकॅनिक) प्रशिक्षण सुरू करण्यात आले असून, हे पाऊल त्यांच्या पुनर्वसनासाठी महत्त्वपूर्ण ठरणार आहे. जिल्हा कौशल्य विकास, रोजगार व उद्योजकता मार्गदर्शन केंद्र आणि जन शिक्षण संस्थान यांच्या संयुक्त विद्यमाने विसापूर जिल्हा खुले कारागृह येथे या उपक्रमाची सुरुवात झाली. या प्रशिक्षण वर्गाचे उद्घाटन सहाय्यक आयुक्त रविकुमार पंतम, जन शिक्षण संस्थानचे संचालक बाळासाहेब पवार व कारागृह अधीक्षक विजय सोळंके यांच्या उपस्थितीत झाले. जिल्हाधिकारी डॉ. पंकज आशिया यांच्या संकल्पनेतून हा उपक्रम राबविला जात आहे. या सूत्रसंचालन क्रांती सोनमाळी यांनी तर शफाकत सय्यद यांनी आभार मानले.

### नोवावॉच ही स्मार्टवॉच मालिका सादर केली आहे

**मुंबई :** एआई प्लसने आज नोवावॉच सादर केले, त्याची स्मार्टवॉच लाइनअप जी सुरक्षा, दैनंदिन आरोग्य आणि वैयक्तिक शैलीमध्ये ब्रँडच्या कनेक्टेड डिव्हाइस पोर्टफोलिओचा विस्तार करते. क्यू१ २०२६ मध्ये लॉन्च होणारे, नोवावॉच हे एआई प्लसच्या विश्वासाचे प्रतिबिंबित करते की घालण्यायोग्य तंत्रज्ञानाने फॅशन-फॉरवर्ड डिझाइनसह व्यावहारिक उपयुक्तता एकत्र केली पाहिजे. एआई प्लस नोवावॉच लाइनअपमध्ये एक्टिव, वेयरबड्स, किड्स जियो फेंसिंग घड्याळ आणि उद्योगात प्रथमच, फिरता कॅमेरा एलटीई घड्याळ यांचा समावेश आहे, प्रत्येक विशिष्ट वापराच्या बाबतीत डिझाइन केलेले आहे.

### आर्यन चेन्नई सिंगम्ससोबतच्या नव्या सुरुवातीचा आनंद घेत आहे

**रायगड :** १८ वर्षीय आर्यनसाठी, इंडियन स्ट्रीट प्रीमियर लीग (आयएसपीएल) म्हणजे केवळ स्पर्धात्मक टेनिस बॉल क्रिकेटपेक्षा काहीतरी अधिक आहे; हे एक असे व्यासपीठ आहे ज्याने त्याच्या वाढीला, लवचिकतेला आणि आत्मविश्र्वासाला आकार दिला आहे. लीगमध्ये त्याच्या दुसऱ्या हंगामासाठी सज्ज होत असताना, आर्यन चेन्नई सिंगम्ससोबत एका नवीन अध्यायाची सुरुवात करत आहे, या फ्रँचायझीसोबतचा हा त्याचा पहिलाच हंगाम आहे. आयएसपीएल सीझन ३ च्या आधी बोलताना आर्यन म्हणाला, चेन्नई सिंगम्सचा भाग बनून खूप छान वाटत आहे. ही एक नवीन टीम आणि नवीन हंगाम आहे, आणि मी खूप आनंदी आहे.

### अजिंठा घाटात ट्रक आग लागून जळून खाक

**फर्दापूर :** छत्रपती संभाजीनगर जळगाव महामार्गावर अजिंठा



घाटात एक ट्रक आग लागून जळून खाक झाली हा सुरत हुन छत्रपती संभाजीनगर च्या दिशेने जात होता परंतु हा रात्री अचानक आग लागून जळून खाक झाला असून यात हरभरा होता अशी माहिती मिळाली यात जिवीत हाणी काही झाली नसल्याने अजिंठा घाटात थोड्या प्रमाणात ट्राफीक जाम झाला असून पुढील माहिती अजून पर्यंत काही मिळाली नाही.

# ११ व्या अजिंठा वेरूळ आंतरराष्ट्रीय चित्रपट महोत्सवाचे २८ जानेवारी ते १ फेब्रुवारी २०२६ दरम्यान आयोजन

**तभा वृत्तसेवा,**

**छत्रपती संभाजीनगर, दि. १० :** मराठवाड्यातील चित्रपट संस्कृतीला जागतिक व्यासपीठावर नेणाऱ्या अकराव्या अजिंठा वेरूळ आंतरराष्ट्रीय चित्रपट महोत्सवाची अधिकृत घोषणा करण्यात आली असून हा महोत्सव बुधवार, दि. २८ जानेवारी ते रविवार, दि. १ फेब्रुवारी २०२६ या कालावधीत आयनॉक्स थिएटर, प्रोझोन मॉल येथे आयोजित करण्यात येणार आहे. नाथ ग्रुप, एमजीएम विद्यापीठ व यशवंतराव चव्हाण सेंटर प्रस्तुत, तर मराठवाडा आर्ट कल्चर व फिल्म फाउंडेशन आयोजित या महोत्सवाला केंद्र व राज्य शासनाचे सहकार्य लाभले आहे.

महोत्सवात राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय दर्जाच्या चित्रपटांचे प्रदर्शन, भारतीय सिनेमा स्पर्धा, फिप्रेस्की परीक्षण,




मास्टरक्लास, परिसंवाद व विशेष संवाद सत्रांचा समावेश आहे. भारतीय सिनेमा स्पर्धेचे ज्युरी अध्यक्ष ऑस्कर विजेते पद्मश्री रसूल पुकूट्टी असून सुवर्ण कैलास पुरस्कार व रोख एक लाख रुपये देण्यात येणार आहेत.

दि. २८ जानेवारी रोजी एमजीएमच्या रूक्मिणी सभागृहात उद्घाटन सोहळा होणार असून आशुतोष गोवारीकर, रसूल पुकूट्टी यांच्यासह अनेक मान्यवर उपस्थित राहणार आहेत. समारोप दि. १ फेब्रुवारी रोजी होणार आहे.

प्रतिनिधी नोंदणी सुरू असून सामान्य रसिकांसाठी ६०० व विद्यार्थ्यांसाठी ४०० रुपये शुल्क निश्चित करण्यात आले आहे.

अधिक माहितीसाठी www.aifilmfest.in या संकेतस्थळावर संपर्क साधण्याचे आवाहन महोत्सवाचे संस्थापक व संयोजन समितीचे अध्यक्ष नंदकिशोर कागलीवाल, प्रमुख मार्गदर्शक अंकुशराव कदम, मानद अध्यक्ष आशुतोष गोवारीकर, सतीश कागलीवाल, महोत्सवाचे संचालक सुनील सुकथनकर, कार्यकारी संचालक चंद्रकांत कुलकर्णी, कुलगुरू डॉ. विलास सपकाळ, डॉ. अपर्णा कक्कड, आकाश कागलीवाल, डॉ. आशिष गाडेकर, निमंत्रक नीलेश राऊत, महोत्सवाचे असोसिएट डायरेक्टर जयप्रद देसाई, ज्ञानेश झोटींग, डॉ. शिव कदम, डॉ. रेखा शेळके, प्रा. दासू वैद्य, डॉ. प्रेरणा दळवी, डॉ. आनंद निकाळजे, शिवशंकर फाळके, सुबोध जाधव, डॉ. कैलास अंभुरे, निखिल भालेराव, अमित पाटील, किशोर नरवडे, किशोर निकम, अजय भवलकर आदींनी केले आहे.

## अंत्यसंस्कार आटोपून परतताना काळाचा घाला

### ■ दुचाकी विद्युत खांबावर आदळली; २९ वर्षीय युवकाचा दुर्दैवी मृत्यू

**तभा वृत्तसेवा,**

**कन्नड, दि.१० :** एका नातेवाईकाच्या अंत्यसंस्कारासाठी गेलेला युवक घरी परतत असताना झालेल्या दुचाकी अपघातात मरण पावल्याची हृदयद्रावक घटना दि. ०९ रोजी दुपारी अडीच वाजेच्या सुमारास कन्नड तालुक्यात घडली. या घटनेने संपूर्ण परिसरात शोककळा पसरली आहे.

सौरभ उर्फ मयूर अनिल बाविस्कर (वय २९, रा. भिलपलटन गल्ली, कन्नड) असे मृत युवकाचे नाव आहे. सौरभ हा दि.०९ रोजी पिशोर येथे नातेवाईकाच्या अंत्यसंस्कारासाठी आपल्या दुचाकी क्रमांक एम.एच. २० डी.एम. ४३९१ वरून गेला होता. अंत्यसंस्कार आटोपून कन्नडकडे परत येत असताना गारगोटी फाट्याजवळ रस्त्याच्या कडेला असलेल्या विद्युत खांबाला त्याची दुचाकी धडकली.

या अपघातात सौरभ गंभीर जखमी झाला. घटनेनंतर स्थानिक नागरिकांनी तातडीने त्याला कन्नड ग्रामीण रुग्णालयात दाखल केले. मात्र, वैद्यकीय अधिकारी डॉ. सोहेल शेख यांनी तपासणी करून त्यास मृत घोषित केले.

अंत्यविधीवर गेलेल्या सौरभवरच अंत्यसंस्काराची वेळ यावी, अशी दुर्दैवी परिस्थिती ओढवल्याने बाविस्कर कुटुंबावर दुःखाचा डोंगर कोसळला आहे. सौरभच्या पश्र्चात पत्नी, दोन चिमुकल्या मुली व आई असा परिवार असून, तरुण वयात काळाने घाला घातल्याने हळहळ व्यक्त होत आहे.

## आ.सत्तार यांच्या हस्ते विकास कामांचे भूमिपूजन



**तभा.वृत्तसेवा**

**सोयगाव, दि.१० जानेवारी :** माजी मंत्री आ. अब्दुल सत्तार यांच्या पुढाकाराने जामठी ते सावळदबारा तसेच घाणेगाव -जयदेववाडी देऊळगाव (गुजरी) रस्त्याचे रुंदीकरण, मजबुतीकरण, काँक्रीटीकरणं व डांबरीकरण या कामासाठी जवळपास ११ कोटी रुपयांचा निधी शासनाने मंजूर केला. या कामासह जवळपास ४ कोटी रुपयांच्या विविध विकास कामांचा भूमिपूजन सोहळा आ. अब्दुल सत्तार यांच्या हस्ते संपन्न झाला.

सोयगाव तालुक्यातील सर्वांगीण विकासाच्या दृष्टीने पिंपळा, जामठी, ठाणा , फर्दापूर तांडा, फर्दापूर, डाभा, घाणेगाव, चारुतांडा, मोलखेडा, देव्हारी, टिटवी या गावांमध्ये पायाभूत मूलभूत विकास कामांसाठी मंजूर जवळपास ३ कोटी ७० लाख रुपयांच्या विविध विकास कामांचे भूमिपूजन आमदार अब्दुल सत्तार यांच्या हस्ते संपन्न झाले. या कामांमध्ये रस्ते विकास, विविध विकास कामांचे बांधकाम, सभामंडप तसेच इतर नागरी सुविधा विकासकामांचा समावेश आहे.

मतदारसंघातील नागरिकांच्या मूलभूत गरजांना प्राधान्य देऊन विकासकामे राबवली जात आहे. भूमिपूजन करण्यात आलेल्या कामांसाठी निधीची कमतरता भासू दिली जाणार नाही अशी ग्वाही आमदार अब्दुल सत्तार यांनी याप्रसंगी दिली. गुणवत्तापूर्ण आणि निर्धारित वेळेत कामे पूर्ण करण्यावर अधिकाऱ्यांनी भर द्यावा अशा सूचना त्यांनी अधिकाऱ्यांना दिल्या.

उपमुख्यमंत्री ना. एकनाथ शिंदे यांच्या नेतृत्वाखाली व आ. अब्दुल सत्तार यांच्या पुढाकाराने महाराष्ट्र शासनाने सोयगाव तालुक्यातील जामठी -पळसखेडा- टिटवी -सावळदबारा या रस्त्याच्या कामासाठी ८ कोटी ५० लाख तर घाणेगाव-जयदेववाडी सावळदबारा-देऊळगाव रस्त्यासाठी २ कोटी ७ लाख रुपयांचा निधी मंजूर केला. या कामाचे भूमिपूजन आ. अब्दुल सत्तार यांच्या हस्ते संपन्न झाले.

## जगद्गुरू गणधराचार्य कुंथुसागर गुरुदेव २७ वर्षांनंतर शहरात

**तभा वृत्तसेवा,**

**छत्रपती संभाजीनगर, दि. १० :** २७ वर्षांनंतर जगद्गुरू गणधराचार्य कुंथुसागर गुरुदेव यांचे छत्रपती संभाजीनगर शहरात भव्य आगमन झाले. या ऐतिहासिक प्रसंगी गुरू-शिष्य मिलनाचे भावनिक दृश्य पाहून हजारो भाविकांचे डोळे पाणावले.

खंडेलवाल दिगंबर जैन पंचायत, पार्श्र्वनाथ मंदिर राजाबाजार अंतर्गत सर्व मंदिरांच्या संयुक्त विद्यमाने हा सोहळा मोठ्या उत्साहात पार पडला. सकाळी ७.३० वाजता बीड बायपास देवळाई चौक येथून भव्य शोभायात्रा काढण्यात आली. जियो और जिने दो अशा घोषणांनी परिसर दुमदुमून गेला.

या वेळी गणधराचार्य जगद्गुरू कुंथुसागर महाराज, राष्ट्रसंत गुणधरनंदीजी महाराज, क्रांतिकारी आचार्य गुप्तीनंदी गुरुदेव, आचार्य सूर्यसागरजी गुरुदेव, राष्ट्रसंत प्रणामसागर गुरुदेव, उपाध्याय विरंजनसागरजी महाराज यांची गळाभेट होताच भाविक भावविवश झाले. सौभाग्यमती माताजी संघ उपस्थित होता. २७ जेसीबीच्या सहाय्याने आचार्यश्रींवर



पुष्पवृष्टी करण्यात आली. आचार्यश्रींचे पादप्रक्षालन राखी-कोमल लोहाडे व डॉ. तुषार लोहाडे परिवारांनी केले. संदिप कासलीवाल परिवाराच्या वतीने प्रसादी वाटप करण्यात आले.

या वेळी महावीर ठोळे, यतीन ठोळे, अरुण पाटणी, जितेंद्र पाटणी, किरण पाहाडे, संतोष सेठी, चंदा कासलीवाल, निता ठोळे, मनोज काला, संजय पहाडे, संदीप कासलीवाल, संजय पापडीवाल, शैलेश रावका, मनोज लोहाडे, अमोल गोधा, विपीन पांडे, सचिन लोहाडे, सचिन पाटणी, अभिजित कासलीवाल, अमित कासलीवाल, जयश्रीदीदी, प्रमोद पांडे, सुमित पाटणी,नरेंद्र अजमेरा, पियुष कासलीवाल, अर्पण ग्रुपसह हजारो भाविक उपस्थित होते.

आचार्य कुंथुसागर महाराज यांनी समाजाची एकता, श्रद्धा व तरुण पिढीला एकत्र आणण्याचा संदेश दिला.




## रस्ता सुरक्षा अभियानांतर्गत विद्यार्थ्यांमध्ये जनजागृती

**तभा वृत्तसेवा,**

**अहिल्यानगर, दि. १० :** केंद्र शासनाच्या सडक परिवहन मंत्रालयाच्या मार्गदर्शक सूचनांनुसार सडक सुरक्षा-जीवन रक्षा ही संकल्पना घेऊन शहर वाहतूक नियंत्रण शाखेच्या वतीने एमआयडीसी नागापूर येथील सन फार्मा माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालयांमध्ये रस्ता सुरक्षा अभियानांतर्गत जनजागृती उपक्रम राबविण्यात आला. राष्ट्रीय सेवा योजनेतील सुमारे १५० विद्यार्थी व शिक्षक या उपक्रमात सहभागी झाले होते. रस्ता सुरक्षा चिन्ह असलेले फलक हातात घेऊन यावेळी रॅली काढण्यात आली. यावेळी पोलीस उपनिरीक्षक शमुवेल गायकवाड, मन्सूर सय्यद, शहर वाहतूक नियंत्रण शाखेचे कर्मचारी, सनफार्मा विद्यालयाचे प्राचार्य रावसाहेब सातपुते, शिक्षक व विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## नगराध्यक्षा कावसनकरांसमोर जटील प्रश्न मार्गी लावण्याचे आव्हान

**तभा वृत्तसेवा,**

**पैठण, दि. १० :** पैठण नगर परिषद निवडणुकीत निवडून आलेल्या नगराध्यक्षा तसेच समस्त नगरसेवक यांच्या पदाचा पदग्रहण सोहळा व उपनगराध्यक्ष पदाची निवड सोमवार दिनांक १२ जानेवारी सकाळी १० वाजता खासदार संदीपान भूमरे, आमदार विलास बाप्पू भूमरे यांच्या प्रमुख उपस्थित नगर परिषद सभागृहात पार पडणार असून नगराध्यक्षा विद्याताई भूषण कावसनकर यांच्या समोर आगामी काळात स्वच्छता, पाणी, हद्दवाड, अतिक्रमण सारखे जटील प्रश्न मार्गी लावण्याचे आव्हान राहणार आहे.

नगर परिषद निवडणुकीत नुकताच नगराध्यक्षा पदी शिवसेना पक्षाच्या सौ. विद्या भूषण कावसनकर यांचा दणदणीत विजय झाला असून एकूण २५ नगरसेवक पैकी शिवसेना १७ + राष्ट्रवादी २ = १९, भाजपा १, उ.बा.ठा १, काँग्रेस ४ असे नगरसेवक निवडून आले आहेत. सोमवारी शिवसेना पक्षाकडून उप नगराध्यक्ष पदासाठी उमेदवार दिला जाणार असल्याने पक्षीय बळ



पाहिले असता या पक्षाचा उप नगराध्यक्ष होणे आता औपचारिक राहिले आहे.

यात उपनगराध्यक्ष पदासाठी नगरसेविका, कविता शिंदे, वैशाली परदेशी, संगीता मापारी, नगरसेवक तुषार पाटील, रफिक कादरी, ईश्वर दगडे, यांचे नाव आघाडीवर आहे. पदग्रहण सोहळा पार पडल्यानंतर नगराध्यक्षा विद्याताई भूषण कावसनकर यांच्यासमोर पैठण शहराची जटील समस्या बनलेल्या स्वच्छता, पाणी, हद्दवाड, गोदावरी प्रदूषण, पूरग्रस्तांना शासकीय मदत, वाढीव वीज पुरवठा आणि अतिक्रमण प्रश्र्न मार्गी लावण्याचे आव्हान राहणार आहे.

## श्री भैरवनाथ भगवान यात्रेची तयारी अंतिम टप्प्यात

**तभा वृत्तसेवा,**

**लासूर स्टेशन, , दि. १० :** गंगापूर तालुक्यातील लासूर स्टेशन बाजारपेठेचे श्रद्धास्थान असलेल्या सावंगी येथील श्री भैरवनाथ भगवान यात्रा महोत्सव दरवर्षीप्रमाणे याही वर्षी रविवार (दि. ११ जानेवारी) रोजी सुरू होणार असून यावर्षीपासून हा यात्रा महोत्सव तीन दिवस चालणार आहे. यात्रेच्या पार्श्वभूमीवर सर्व तयारी अंतिम टप्प्यात आली असून सुमारे एक लाखांहुन अधिक भाविक दर्शनासाठी येण्याची शक्यता आहे.

लासूर स्टेशनपासून अवघ्या एक किलोमीटर अंतरावर असलेल्या सावंगी (ता. गंगापूर) या छोट्याशा गावात सुमारे साठ वर्षांपूर्वी धोडीबा पांडुरंग इंगळे यांच्या मार्गदर्शनाखाली महादेवाच्या आठ अवतारांपैकी काल भैरवनाथ व लाल स्वामी भैरवनाथ या दोन अवतारांची मूर्ती सोनेरी जोगेश्र्वरी (जि. अहमदनगर) येथून आणून विधीवत स्थापना करण्यात




आली. भाविकांमध्ये अशी श्रद्धा आहे की, भैरवनाथ भगवान दर्शनाने सर्पदंश झालेल्या व्यक्तीस त्वरित आराम मिळतो. तसेच मंदिर परिसरातील वाळू श्रद्धेने घरी नेऊन देव्हाऱ्यात व घराभोवती फिरवल्यास नागदेवतेपासून संरक्षण होते, अशी लोकांची धारणा आहे. अनेक भाविकांना याचा प्रत्यय आल्याचे सांगितले जाते. त्यामुळे दूरदूरच्या भागातून भाविक मोठ्या श्रद्धेने येथे दर्शनासाठी येतात.

नवसाला पावणारे व लाखो भाविकांचे श्रद्धास्थान अशी या मंदिराची ओळख आहे. यात्रेच्या आठ दिवस आधीपासून तसेच नंतर जवळपास एक महिना भाविक येथे येऊन रोडग्याचा महाप्रसाद करतात. ग्रामस्थांच्या सहकार्याने व पंचक्रोशीतील लोकवर्गणीतून मंदिराचा सुमारे दोन कोटी रुपये खर्चाचा जिर्णोद्धार पूर्ण झाला आहे.

नवसाला पावणारे देवस्थान म्हणून ओळख असलेल्या या मंदिरात दरवर्षी भाविक नवस फेडण्यासाठी कुटुंबासह उपस्थित राहतात. दाल-बट्टीचा नैवेद्य, भंडाऱ्याची पंगत घालून आपले मनोरथ पूर्ण झाल्याचा आनंद व्यक्त करतात.

यावर्षी तीन दिवस चालणाऱ्या यात्रेदरम्यान भाविकांच्या सोयीसाठी विविध सामाजिक व धार्मिक संस्थांच्या वतीने मंदिर परिसरात लवकरच अन्नछत्र सुरू करण्यात येणार असल्याचे माहिती संस्थानचे संजय पांडव यांनी दिली आहे.

यात्रेनिमित्त तीनही दिवस मंदिर परिसरात लहान मुलांसाठी पाळणे,पान-फुलांची दुकाने तसेच महिलांसाठी संसारोपयोगी वस्तूंची दुकाने थाटली जातात.यात्रेच्या पहिल्या दिवशी रात्री यात्रेकरूंच्या मनोरंजनासाठी लोकनाट्य तमाशाचा फड रंगणार असून, दुसऱ्या दिवशी कुस्तीचा आखाडा भरवण्यात येणार आहे. तसेच दर रविवारी भरणारा लासूर स्टेशनचा आठवडी बाजार या काळात मंदिर परिसरातच भरवण्यात येतो.

## अग्रलेख...

# विनाशकाले विपरीत बुद्धी

तृणमूल काँग्रेसच्या सर्वेसर्वा आणि पश्चिम बंगालच्या मुख्यमंत्री ममता बॅनर्जी या अतिशय वाचाळ आणि आक्रमक नेत्या म्हणून ओळखल्या जातात. आपल्या या आक्रमकतेच्या आधारावरच त्यांनी राज्यातील डाव्या आघाडीच्या ३४ वर्षांच्या राजवटीचा शेवट करीत सत्ता बळकावली, एवढेच नाही तर सलग तीन विधानसभा निवडणुकीत तृणमूल काँग्रेसला निर्विवाद बहुमत मिळवून देत मुख्यमंत्रिपदाची हॅट्ट्रिकही केली. कोणत्याही कारणाने चर्चेत राहण्याची आणि वादळ उठवीत त्याचा राजकीय फायदा उचलण्याची हातोटी त्यांना साधली आहे. डाव्या पक्षांची काही दशकांची गुंडगिरी मोडून काढत निवडणूक सलग तीनदा जिंकणे, ही काही मामुली गोष्ट नाही. शेराला सव्वाशेर असल्याशिवाय ते शक्य होत नाही. डाव्यांच्या गुंडगिरीचा सामना करताना ममता बॅनर्जी आणि त्यांच्या पक्षाचे नेते आणि कार्यकर्ते कधी गुंडगिरीच्या मार्गावर गेले, हे कोणाला कळलेच नाही. खुद्द ममतादीदींनाही नाही.

अनेकवेळा आक्रमकता आणि आक्रस्ताळेपणा यांच्यातील सीमारेषा अतिशय पुसट असते. आक्रमकता कधी संपते आणि आक्रस्ताळेपणा कधी आणि कसा सुरू होतो, हे समजतच नाही. ममता बॅनर्जी यांची सध्याची स्थिती तशीच झाली आहे. कोलकाता येथे आय-पॅक कंपनीचे प्रतीक जैन यांच्या कार्यालयावर आणि निवासस्थानावर अंमलबजावणी संचालनालयाने (ईडी) घातलेल्या छाप्यानंतर ममता बॅनर्जी यांनी जो तमाशा केला, तो तृणमूल काँग्रेसच्या नेत्या म्हणून त्यांना शोभणारा असला तरी राज्याच्या मुख्यमंत्री म्हणून पूर्णपणे अशोभनीय. आपल्या कृतीने ममता बॅनर्जी यांनी कारण नसताना संवैधानिक संकट निर्माण केले आणि आपल्याच हातांनी आपल्या पायावर कुऱ्हाड मारून घेतली आहे, असे म्हणावे लागेल. प्रत्येक घटनेचा राजकीय फायदा उचलण्याचे अफलातून कसब ममता बॅनर्जी यांच्यात आहे हे खरेच. त्यानुसार ईडीच्या छाप्याचेही राजकारण करण्याचा त्यांनी प्रयत्न केला. असे करीत असताना त्यांनी ममता बॅनर्जी म्हणून स्वत:चे नाही तर मुख्यमंत्रिपदाचे अवमूल्यन करून टाकले. कोलकाता पोलिसांच्या भूमिकेवरही यामुळे प्रश्नचिन्ह उपस्थित झाले. म्हातारी मेल्याचे दु:ख नाही, काळ सोकावतो, याचे दु:ख व्हावे अशी ही घटना. ममता बॅनर्जी यांची आणखी एक मोठी घोडचूक म्हणजे त्यांनी ईडीच्या छाप्याच्या कारवाईत अडथळा आणला. काही कागदपत्रे तेथून जबरदस्तीने आपल्या ताब्यात घेतली. एवढेच नाही तर केंद्राच्या यंत्रणेसमोर आपल्या राज्याची यंत्रणा उभी करत दोघांमध्ये संघर्षाची परिस्थिती निर्माण करण्याचा प्रयत्न केला. केंद्र आणि राज्य असा संघर्ष पश्चिम बंगालला नवा नाही, पण यावेळी त्यांनी याला थेट युद्धाचे स्वरूप देण्याचा प्रयत्न केला, असे नाईलाजाने म्हणावेसे वाटते. मुळात ईडीने जो छापा घातला, तो ममता बॅनर्जी यांच्या, त्याच्या निकटवर्तीयांच्या तसेच तृणमूल काँग्रेसच्या कोणत्याही नेत्याच्या निवासस्थानावर घातला नव्हता. तर हा छापा घालण्यात आला, तो इंडियन पॉलिटिकल ॲक्शन कमेटी (आय-पॅक) कंपनीचे सहसंस्थापक प्रतीक जैन यांच्या निवासस्थानावर आणि कार्यालयावर. प्रतीक जैन हे जसे आय-पॅकचे सहसंस्थापक आहेत, तसेच ते तृणमूल काँग्रेसच्या आयटी विभागाचे प्रमुखही आहेत, म्हणजे त्यांच्याकडे दुहेरी जबाबदारी आहे. तरीही त्यांचा थेट संबंध राजकारणाशी आहे असे म्हणता येत नाही. आय-पॅक ही तशी प्रशांत किशोर यांची कंपनी. देशातील राजकीय पक्षांच्या आणि नेत्यांच्या निवडणुकीचे व्यवस्थापन करताना प्रशांत किशोर यांनाही राजकीय पक्ष स्थापन करण्याची तसेच बिहार विधानसभेची निवडणूक लढवण्याची अवदसा आठवली होती. त्यात त्यांचा दारुण पराभव झाला. म्हणजे प्रशांत किशोर यांची निवडणूक लढवण्याची हिंमत झाली नाही, पण त्यांच्या पक्षाच्या जेवढ्या उमेदवारांनी निवडणूक लढवली, त्या सर्वांची जमानत जप्त झाली. यावरून निवडणूक व्यवस्थापन करणे, व्यूहरचना ठरवत दुसऱ्या पक्षाला निवडणूक जिंकण्यात हातभार लावणे सोपे असते. पण स्वत: निवडणूक जिंकणे, आपला पक्ष जिंकवून देणे कठीण असते, याचा अनुभव त्यांना नक्कीच आला असेल. तर अशा या आय-पॅककडे ममता बॅनर्जी यांनी निवडणूक जिंकवून देण्याची सुपारी दिली. आय-पॅक साम, दाम, दंड, भेद अशा सर्व मार्गांचा अवलंब निवडणूक जिंकण्यासाठी करून देत असते, असा आरोप आहेच. ईडीचे छापे हे त्यांच्या एका जुन्या प्रकरणाशी संबंधित आहेत. कोळसा घोटाळा प्रकरणात ईडीने गुरुवारी सकाळी कोलकात्यात सहा ठिकाणी आणि राजधानी दिल्लीत चार ठिकाणी छापे घातले. २०२० च्या या प्रकरणात सीबीआयने तृणमूल काँग्रेसचे खासदार आणि ममता बॅनर्जी यांचे भाचे अभिषेक बॅनर्जी यांच्या पत्नीचीही चौकशी केली आहे. कोळसा घोटाळ्यातील मोठ्या प्रमाणातील पैसा आय-पॅक कंपनीला मिळाल्याचा आरोप आहे. या पैशाचा उपयोग तृणमूल काँग्रेसने आय-पॅकच्या माध्यमातून गोवा विधानसभा निवडणुकीत केला, असे म्हणतात. ईडीच्या छाप्याच्या कारवाईला विधानसभा निवडणुकीचा मुद्दा बनवण्याचे ममता बॅनर्जी यांनी ठरवलेले दिसते. मोदी सरकारच्या इशाऱ्यावर ईडी सूडबुद्धीची कारवाई करीत असल्याचा त्यांचा आरोप आहे. राजकीय कारणाने नव्हे तर कोळसा घोटाळ्यातील आय-पॅकच्या सहभागावरून ईडीला धनशोधनाच्या प्रकरणात ही कारवाई करावी लागली, ही वस्तुस्थिती आहे. पण आले ममतादीदींच्या मना तेथे कोणाचे काहीच चालेना, अशी स्थिती आहे. त्यामुळे आता काय खरे आणि काय खोटे हे पश्चिम बंगालच्या जनतेलाही कळून चुकले आहे. ममता बॅनर्जी आणि तृणमूल काँग्रेसचे नेते धुतल्या तांदळासारखे नाहीत, तर भ्रष्टाचाराच्या अनेक प्रकरणांत बरबटलेले आहेत. 'कर नाही त्याला डर कशाला' अशी एक म्हण आहे. ममता बॅनर्जी आणि त्यांच्या बगलबच्च्यांनी काही गैर केले नसेल तर त्यांना घाबरण्याचे कारण काय? पण, घाबरगुंडी उडाली हे दिसतेच आहे आणि त्यामुळेच संशयाला वाव आहे.

विशेष म्हणजे ममता बॅनर्जी यांच्या कृतीचा भाजपानेच नाही तर काँग्रेस आणि डाव्या पक्षांनीही विरोध केला आहे, त्यांच्या अटकेची मागणी केली आहे. राज्यात राष्ट्रपती राजवट लावण्याची मागणीही यानिमित्ताने जोर धरू लागली आहे. राज्यात आधी १९६८, १९७० आणि १९७१ मध्ये राष्ट्रपती राजवट लागू झाली होती. २०२१ मध्ये राज्यात उसळलेल्या हिंसाचारानंतरही राष्ट्रपती राजवटीची मागणी उठली होती. केंद्रीय तपास यंत्रणांविरुद्ध दंड थोपटण्याची ममता बॅनर्जी यांची ही पहिली वेळ नाही. २०१९ मध्ये सीबीआयच्या छाप्याच्या वेळी ममता बॅनर्जी मुख्यमंत्री असूनही धरण्यावर बसल्या होत्या. ममता बॅनर्जी यांचे आतापर्यंतचे संपूर्ण राजकारण तुष्टीकरणाचे म्हणावे लागेल. राज्यात ३० टक्के मुस्लिम मतदार आहेत. त्यामुळे मुस्लिम मतदारांचे तुष्टीकरण करताना ममता बॅनर्जी राज्यातील हिंदू मतदारांची उपेक्षा करू लागल्या होत्या. आता त्यांचे डोळे थोडे थोडे उघडू लागले होते. मात्र आता त्याला बराच उशीर झाला आहे. पाणी त्यांच्या डोक्यावरून गेले आहे. ममता बॅनर्जी यांच्या या लोकशाही तसेच संविधानविरोधी कृत्याच्या विरोधात ईडीने कोलकाता उच्च न्यायालयात धाव घेतली आहे. ईडीच्या चौकशीत आवश्यक असलेली कागदपत्रे आणि आवश्यक साहित्य ममता बॅनर्जी यांनी ईडीच्या ताब्यातून बळकावले, असे न्यायालयात सिद्ध झाले तर त्याची मोठी राजकीय किंमत यावेळी ममता बॅनर्जी यांना चुकवावी लागेल, यात शंका नाही. त्यांना अटकही होऊ शकते, तसेच राज्यातील त्यांचे सरकार बरखास्त करण्याची कारवाईही केली जाऊ शकते. विनाशकाले विपरीत बुद्धी म्हणतात तसे ममता बॅनर्जी यांचे झाले आहे. पश्चिम बंगालमधील त्यांचे दिवस भरले आहेत. त्यामुळेच ईडीच्या छाप्याच्या वेळी त्यांनी वेड्यासारखी कृती करत आपल्या राजकीय शेवटाचा पाया घातला आहे. प्रत्येकवेळी आक्रमकतेने केलेल्या कृतीचा राजकीय फायदा मिळतोच असे नाही, अनेक वेळा बूमरँगही होत असते, जसे यावेळी झाले. ममतादीदी सर्वज्ञ असल्याच्या आविर्भावात वावरतात. कधी तरी आपल्या वर्तनाकडे स्वपरीक्षणाच्या नजरेने पाहायचे असते, हे त्यांना कधी तरी कळेल? ▮

## यंगिस्तान

**जयेश शत्रुघ्न मेस्त्री**

# मुंबईकरांचे प्रश्न आणि बंगलेकरांचा जश्न

सध्या मुंबईत छान असं कौटुंबिक वातावरण आहे. कौटुंबिक मेळे होत आहेत. उद्धव ठाकरे आणि राज ठाकरे हे दोन चुलत भाऊ एकत्र आले आहेत. राजकीय मंचावर त्यांचं सबंध कुटुंब दिसत आहे. जणू राजकीय मंच नसून फॅमिली फंक्शन आहे. त्यामुळे सगळाच कसा आनंदी आनंद आहे. १५ जानेवारीला मुंबई महानगरपालिकेबरोबर इतर पालिकांचीही निवडणूक आहे. पण ठाकरे बंधूंनी आपलं सगळं लक्ष मुंबई पालिकेवर केंद्रित केलं आहे. काही ठिकाणी उद्धव ठाकरे मुलाखती देत आहेत. त्यातही मुंबई हाच विषय आहे. शक्यतो दुसऱ्या विषयावर ते बोलत नाहीत. आता संजय राऊत आणि महेश मांजरेकर यांनी उद्धव व राज ठाकरेंची मुलाखत घेतली, त्यातही केंद्रबिंदू मुंबईच होती. त्याचं कारण मुंबई ही सर्वांत श्रीमंत पालिका असून इथला नगरसेवक आमदाराच्या तोडीचा असतो. या मुलाखतीत राज ठाकरे यांनी एक मुद्दा उपस्थित केला. ते म्हणाले, ''मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्यासह बहुतांश राज्यकर्ते हे मुंबईतील नाहीत. ते मुंबईच्या बाहेरचे आहेत. त्यामुळे त्यांना मुंबईकरांचे प्रश्न कळू शकत नाहीत.'' आपलं म्हणणं पटवून देण्यासाठी त्यांनी स्वीडनचं उदाहरण दिलं. ''मी एकदा स्वीडनला गेलो होतो. तिथे मी तो देश पाहत होतो. गाड्या फिरतात, सगळ्यांकडे उत्तम नोकऱ्या आहेत, सुंदर रस्ते आहेत, उत्तम निसर्ग आहे. सगळे सगळे व्यवस्थित छान. हे सगळे पाहताना माझ्या मनात पहिला प्रश्न आला की, इथला विरोधी पक्ष काय करतो? म्हणजे निवडणुकीच्या तोंडावर काय सांगत असेल, की मी तुम्हाला हे देईन, मी तुम्हाला ते देईन.'' असं राज ठाकरे म्हणाले.

याचा अर्थ असा की बाहेरून आलेल्या माणसाला सगळं छान दिसतं. पण तिथल्या समस्या स्थानिकांनाच माहिती असतात. वरवर पाहता राज ठाकरेंचा मुद्दा योग्य वाटतो. पण याचा सखोल विचार केल्यावर आपल्याला ठाकरेंची वैचारिक व्याप्ती दिसून येते. एका चर्चेमध्ये ज्येष्ठ पत्रकार महेश म्हात्रे यांनी उद्धव ठाकरेंचा एक किस्सा सांगितला. उद्धव ठाकरे जेव्हा मुख्यमंत्री झाले, तेव्हा त्यांना आमदार व्हायचे होते. आमदारकीचा फंड वापरण्याची वेळ आली तेव्हा त्यांनी पहिलं काम केलं, ते म्हणजे शिवाजी पार्कला विद्युत दिवे बसवून घेतले. म्हणजे महाराष्ट्राच्या मुख्यमंत्र्याचं पहिलं लक्ष गडचिरोलीत राहणाऱ्या आदिवासींकडे जाण्याऐवजी किंवा धारावीतील झोपडपट्टींवासीयांकडे जाण्याऐवजी शिवाजी पार्कच्या सुशोभीकरणाकडे जातं, तेव्हा त्यांचं वैचारिक अवकाश किती मर्यादित आहे, ते आपल्याला दिसतं. असं मत म्हात्रे यांनी व्यक्त केलं. पुढे ते म्हणाले की, ''मुंबई-पुणे-नाशिक या गोल्डन ट्रँगलमध्ये ज्या महापालिका येतात, ज्यांचा अर्थसंकल्प सुमारे १ लाख कोटींपेक्षा जास्त आहे, त्या अर्थसंकल्पावर नजर ठेवून ते एकत्र आलेत.''



म्हात्रे यांनी काय टीका केली, त्याकडे आपण दुर्लक्ष करू. पण उद्धव ठाकरे यांची वैचारिक व्याप्ती ही खूपच कमी आहे. हा महत्त्वाचा मुद्दा आहे. म्हणूनच कोरोना काळात त्यांनी वर्क फ्रॉम होम केलं. कारण उद्धव ठाकरेंना तसा कामाचा अनुभव नाही. हे त्यांनी स्वतःच मान्य केलंय. मात्र काम शिकण्याची त्यांना कदाचित गरजही वाटत नसावी. आता आपण राज ठाकरे यांच्या विधानाकडे येऊया. राज म्हणाले की, मुंबईतील प्रश्न समजून घ्यायचे असतील तर नेता हा मुंबईकर असायला हवा. हा त्यांचा मुद्दा उद्धव ठाकरे यांच्याबाबत अगदी बरोबर आहे. उद्धव ठाकरे हे मुंबईकर असल्याने आणि मुंबईबाहेरच्या समस्या त्यांना माहितीच नसल्याने त्यांनी प्रथम प्राधान्य शिवाजी पार्कला दिलं. पण दुसरी गोष्ट अशी की धारावी सुद्धा मुंबईतच आहे. मग त्यांचं पहिलं लक्ष धारावीकडे का गेलं नाही? म्हणजे राजकारणात प्रदीर्घ काळ घालवल्यानंतरही त्यांना केवळ वांद्रे आणि दादर इथल्या समस्या कळल्यात का? किंवा मातोश्रीच्या आजूबाजूच्या आणि शिवसेना भवनाच्या आसपासच्याच समस्या कळल्यात का? असे काही प्रश्न महाराष्ट्राच्या जनतेला पडतात. राज ठाकरे यांच्या विधानाला फडणवीसांनी उत्तर दिलंय. पण त्या राजकीय जुगलबंदीत आपण सामान्य माणसाने पडू नये.

आपण आपल्या समस्यांना व तर्काला धरून राहूया. राज ठाकरे यांच्या तर्कानुसार प्रत्येक शहराला, प्रत्येक गावाला एक वेगळा मुख्यमंत्री असायला हवा. म्हात्रे यांनी सांगितल्यानुसार जशी उद्धव ठाकरे यांची व्याप्ती आहे, तशी ही राज ठाकरेंची व्याप्ती असावी. पण आज इतके मुख्यमंत्री झाले, पंतप्रधान झाले. मग त्यांनी मुख्यमंत्री वा पंतप्रधान होण्यासाठी कुठे जन्म घ्यावा? सयाजीराव गायकवाड यांचा जन्म मालेगावात झाला. पण पुढे ते बरोड्याचे महाराज झाले आणि त्यांनी उत्तम शासन केले. तुम्ही कुठे जन्माला येता हे महत्त्वाचं नसतं तर तुमची वैचारिक व्याप्ती किती आहे, हे जास्त महत्त्वाचं आहे. तुम्हाला लोकांच्या प्रश्नांची किती जाणीव आहे, याचा अधिक महत्त्व आहे. आज राज आणि उद्धव ठाकरे हे मराठी माणसांचा मुद्दा उपस्थित करत आहेत, पण त्यांना मराठी माणसाच्या समस्या कळल्या आहेत का? मराठी माणसाच्या हातात दगड देऊन त्याचं भलं होणार आहे का? मुंबईत मराठी माणसाची टक्केवारी का कमी झाली? कारण तो पनवेल, नालासोपारा, विरार इथे फेकला गेला. आता तर तो सफाळा, बोईसर, पालघरला चाललाय. कारण मुंबईतील घरे त्याला परवडत नाही. 'घर' हा मराठी माणसासाठी कळीचा मुद्दा आहे. मराठी माणसाला आता १० बाय १० च्या घरात राहायचं नाही. त्याला थोडं सुटसुटीत राहायचंय आणि मुंबई बिल्डरांच्या घशात गेल्यामुळे त्याला इथे घर घेणं जमत नाही. मुंबई बिल्डरांच्या घशात कशी गेली? याचं उत्तर या नेत्यांनी शोधलं पाहिजे. त्यासाठी ते एक प्रयोग करू शकतात. आरशासमोर उभे राहू शकतात. कदाचित त्यांना उत्तर सापडेल. आज बीएमसीच्या माध्यमातून अनेकांना कॉंट्रॅक्ट मिळतात. किती मराठी कॉंट्रॅक्टर आहेत, याची यादी द्यावी. मुंबई मेट्रोमुळे आज मुंबईकर मजेत प्रवास करू शकतोय. २० रुपयांत तो अशा ठिकाणी पोहोचतो, जिथे पोहचायला त्याला तासभर लागायचा. ही मेट्रो १० वर्षांपूर्वी मुंबईत यायला हवी होती. मग का नाही आली? मुंबईतले स्वच्छतागृहे का स्वच्छ नाहीत? मुंबईत पूर्वी ठिकठिकाणी स्वच्छतागृहे का उभारली जात नव्हती? पालिका तर त्यांच्याच हातात होती. सांगायचं तात्पर्य असं की राजकीय नेत्यांना आपली वैचारिक व्याप्ती बदलावी लागणार आहे. ती खऱ्या अर्थाने व्यापक करावी लागणार आहे.

आपल्या बंगल्याच्या आवारातून शिवाजी पार्कच दिसणार. उर्वरित मुंबई कशी दिसेल? बंगल्याच्या बाहेरही एक मुंबई आहे. त्या मुंबईच्या काही सकारात्मक गोष्टी आहेत, तशा काही समस्याही आहेत. त्या समस्या केवळ मुंबईत जन्मल्याने कळणार नाही. बंगल्यातून बाहेर पडून जनतेत मिसळल्याने कळणार आहेत. बाकी, शिवाजी पार्कच्या आवारात किती अमराठी लोकांनी घरे घेतली आहेत? ▮

writerjayeshmestry@gmail.com

## मुंबई वार्तापत्र

**नागेश दाचेवार**

# आश्वासनांची मिठी आणि विश्वासघात

कोहिनूर मिल म्हणजे केवळ एक गिरणी नव्हे, तर ती मराठी माणसाच्या घामाची, संघर्षाची आणि मुंबई घडवणाऱ्या श्रमिक परंपरेची ओळख होती. गिरणगावातील हजारो मराठी कुटुंबांची उपजीविका, स्वाभिमान आणि भविष्य या गिरणीशी जोडलेले होते. ती कोहिनूर मिल बंद होताना मराठी कामगारांना आणि स्थानिक रहिवाशांना एक स्वप्न दाखवण्यात आलं. तुमच्याच जागेवर, तुमच्याच हक्काचं घर तुम्हाला मिळेल. हे आश्वासन त्यावेळी स्वत: सत्तेत असलेल्यांनी दिलं, मुंबई महानगरपालिका आणि राज्यात सत्तेवर असलेल्या नेतृत्वाकडून दिलं गेलं.

पण प्रत्यक्षात घडलं काय? मराठी कामगारांना घरे मिळाली नाहीत, पण बिल्डरांना सोन्याची खाण मिळाली. मराठी माणूस 'री-डेव्हलपमेंट'च्या नावाखाली मुंबईबाहेर ढकलला गेला आणि टॉवर्समध्ये परकीय, परप्रांतीय, हिंदीभाषी संपत्तीदारांचीच घरे भरली गेली. आणि आज त्या कोहिनूर मिलच्या जागी उभे असलेले चकचकीत टॉवर पाहिले की एक प्रश्न ठसठसून समोर येतो, मराठी माणसाला घर देण्याच्या नावाखाली नेमका कोण मराठी माणसाच्या पाठीत खंजीर खुपसून गेला? कोणी आश्वासनांची मिठी मारली आणि विश्वासघाताचा वार केला?

**मराठी माणसाच्या पाठीत खंजीर कोणी खुपसला? :** मुंबई हे फक्त महानगर नाही, मराठी माणसाच्या रक्तातून, घामातून आणि संघर्षातून उभी राहिलेली राजधानी आहे. संयुक्त महाराष्ट्राच्या आंदोलनात १०६ मराठी माणसांनी आपल्या प्राणांची आहुती दिल्यानंतर ही मुंबई महाराष्ट्राच्या नशिबी आली. पण आज, याच मुंबईत मराठी माणूस दुय्यम ठरत चालला आहे. मराठी माणूस परका ठरताना दिसत आहे. हा बदल अचानक घडलेला नाही, तर तो मागील २५ वर्षांच्या सत्ताकाळाचा परिणाम आहे, याकडे डोळेझाक करून चालणार नाही. मुंबई महानगरपालिकेवर सलग अडीच दशके शिवसेनेची, पर्यायाने ठाकरे कुटुंबाची सत्ता राहिली. इतका प्रदीर्घ काळ एखाद्या कुटुंबाकडे सत्ता असताना, ज्यांच्या जिवावर ही सत्ता उपभोगता आली, तो मराठी माणूस अधिक सक्षम व्हायला हवा होता. पण प्रत्यक्षात घडलं उलट. सत्ता टिकली आणि मराठी माणूस हरत गेला. लालबाग, परळ, दादर, गिरगाव ही नावे कधीकाळी मराठी अस्मितेची ओळख होती. गिरणी कामगारांनी उभारलेल्या या मुंबईतून गिरण्या गेल्या, त्यासोबत मराठी माणूसही गेला. उरले ते फक्त गगनचुंबी टॉवर्स आणि बिल्डरांचे फलक. गिरणी कामगारांना हक्काची घरे मिळतील ही आश्वासने हवेत विरली. प्रत्यक्षात मात्र, मराठी कुटुंबांना विरार, बदलापूर, कर्जत, कसाऱ्याच्या दिशेने ढकलले गेले. मुंबई घडवणाऱ्यालाच मुंबईतून हद्दपार करणारी ही कोणती राजवट होती? आणि ती कोणाच्या आशीर्वादाने चालली होती? प्रदीर्घ काळ सत्ता भोगणाऱ्यांना या अस्वस्थतेचा स्पर्शही होत नाही, हे सर्वांत धक्कादायक आहे. इतका दीर्घ काळ सत्ता हातात असताना, जर एखाद्या समाजाची अवस्था सुधारत नसेल, तर प्रश्न अपरिहार्यपणे विचारला जातो, ही सत्ता नेमकी कुणासाठी होती आणि मराठी माणसाच्या पाठीत खंजीर कोणी खुपसला?



**७४ हजार कोटींचे बजेट, मराठी उद्योजक कुठे? :** मुंबई महानगरपालिकेचे बजेट हे अनेक राज्यांच्या नव्हे तर काही देशांच्या बजेटपेक्षा मोठे आहे. गेल्या २५ वर्षांत लाखो कोटी रुपये खर्च झाले. पण या पैशातून किती मराठी उद्योगपती, कंत्राटदार, मोठे ठेकेदार घडले? उत्तर अस्वस्थ करणारे आहे. जवळजवळ कोणीच नाही. नाले, रस्ते, पूल, कचरा व्यवस्थापन सगळी कंत्राटे ठरावीक लॉबीभोवतीच फिरत राहिली. मराठी माणसाला 'अस्मिता'च्या घोषणा देऊन समाधानी ठेवले गेले. पण आर्थिक सत्तेपासून मात्र, कायम दूर ठेवले गेले. ही चूक नव्हे, तर जाणीवपूर्वक आखलेली राजकीय नीती होती, असे म्हटले तर वावगे ठरणार नाही.

मराठी माणसाच्या भविष्यासाठी शिक्षण हा कणा असायला हवा होता. पण पालिकेच्या मराठी शाळा बंद पडल्या, पटसंख्या घटली, गुणवत्ता ढासळली. दुसरीकडे इंग्रजी शाळांचा बाजार फोफावला. निवडणुकांच्या तोंडावर मराठी भाषेचे गोडवे गायचे, पण सत्तेत असताना मराठी शिक्षण व्यवस्थेला वाऱ्यावर सोडायचे हा दुटप्पीपणा मराठी समाजाला आता स्पष्ट दिसू लागला आहे.

आजचा मराठी माणूस मुंबईत काम करतो, पण मुंबईत राहू शकत नाही. पहाटे घराबाहेर पडतो, रात्री उशिरा घरी परततो. चार-पाच तासांचा लोकल प्रवास त्याच्या नशिबी आला आहे. परवडणाऱ्या घरांची कोणती ठोस योजना राबवली गेली नाही. पुनर्विकासात मूळ रहिवाशांना न्याय मिळाला का? की बिल्डर आणि दलालांचीच भरभराट झाली? हे प्रश्न यांना अस्वस्थ करत नाहीत, यातून यांचे अपयश अधोरेखित होते.

**निवडणूक आली की मराठी माणसाची आठवण :** मराठी माणूस हा शब्द निवडणुकीत ओरडून सांगायचा, पण प्रत्यक्षात त्याला मुंबईत टिकवण्यासाठी काहीही करायचं नाही, हा दुटप्पीपणा कोहिनूर मिल प्रकरण, पत्राचाळ प्रकरणात उघड झाला. सत्ता धोक्यात आली की मराठी माणूस, मराठी अस्मिता, मराठी स्वाभिमान हे शब्द पुन्हा बाहेर काढले जातात. पण यावेळी मराठी मतदार बदललेला आहे. तो आता घोषणा नव्हे, तर हिशेब मागतो आहे. २५ वर्षांत काय दिले? घर दिले का? का दिले नाही? नोकऱ्या दिल्या का? आर्थिक ताकद दिली का? कंत्राटे दिले का? पत्राचाळीतील मराठी कुटुंबांना का फसवलं? फसवणूक करणाऱ्यावर कारवाई केली का? का नाही केली? कोहिनूर टॉवरमध्ये एकाही मराठी व्यावसायिकाला जागा का नाही? या प्रश्नांची उत्तरे नसतील, तर भावनिक आवाहनांचा आता उपयोग राहिलेला नाही. मुंबईतील मराठी लोकसंख्या घटत जाणे ही केवळ आकडेवारी नाही, तर ती एका अपयशी राजवटीची साक्ष आहे. मुंबई आपली म्हणण्याआधी, मुंबईत मराठी माणूस टिकवला का?, याचे उत्तर द्यावेच लागेल. मराठी माणूस वापरायचा, पण वसवायचा नाही... ही यांची 'चलाखी' आता मराठी माणूस चांगल्यानं ओळखून आहे. यावेळी निवडणूक केवळ सत्तेसाठी नाही, तर मराठी माणसाच्या भविष्यासाठी असल्याचं दोन्ही बंधूंकडून सांगितलं जात आहे. खरंच आहे, मात्र, आपलं भविष्य कोणाच्या हातात सुरक्षित आहे? याची पूर्ण जाणीव मागील काळात मराठी माणसाला चांगल्याने झाली आहे. आता कोणत्याही आश्वासनांची मिठी मारली तरी हा मराठी माणूस त्याला भुलणार नसून, कोणताही विश्वासघाताचा वार झेलायचा नसल्यानं, मराठी मतदार आता डोळसपणे निर्णय घेणार, हे निश्चित आहे. ▮

९२७०३३३८८६

## वेध

**नीलेश जोशी**

# तांदळात भारताची जागतिक भरारी

भारत हा सर्वांत मोठा तांदूळ उत्पादक देश म्हणून समोर आला आहे. तांदूळ उत्पादनात क्रमांक एकवर असलेल्या चीनला मागे टाकत भारताने कृषी क्षेत्रात अव्वल स्थान पटकावत हा झेंडा रोवला. देशाच्या स्वातंत्र्यानंतर अनेक वर्षे भारताने दुष्काळाचा सामना केला. अन्न टंचाईमुळे होणारे मृत्यू हे वेदनादायी होते. त्यावेळी भारताने जगातील मित्रराष्ट्राकडे गहू, तांदूळ या प्रमुख खाद्यान्नाची मागणी केली. पण तेव्हाच्या मोठ्या राष्ट्रांनी या मागणीकडे दुर्लक्षच केले. एवढेच नव्हे तर काहींनी आमच्या येथे होणाऱ्या भूकबळींचा उपहास करीत या निमित्ताने लोकसंख्या कमी होत असल्याचे म्हटले. त्या परिस्थितीतवरही भारताने मात केली आणि आता तर ऐतिहासिक कामगिरी करीत भारताने चीनला मागे टाकून जगातील सर्वाधिक तांदूळ उत्पादक देश म्हणून स्थान मिळवले.

विशेष म्हणजे ही माहिती अमेरिकेच्या यूएसडीए अर्थात युनायटेड स्टेट्स डिपार्टमेंट ऑफ ॲग्रिकल्चरच्या डिसेंबर २०२५ च्या अहवालात नमूद करण्यात आली आहे. जगभरात उत्पादित होणाऱ्या तांदळाच्या उत्पादनापैकी २८ टक्के तांदूळ भारतात होतो. चीनमध्ये १४६ दशलक्ष मेट्रिक टन, तर भारतात १५२ दशलक्ष मेट्रिक टन उत्पादन झाल्याची नोंद या अहवालात आहे. म्हणूनच भारत अव्वल ठरल्याचे अहवालात नमूद आहे. २०२४-२५ या आर्थिक वर्षात भारताची कृषी निर्यात ४,५०,८४० कोटींवर पोहोचली. ज्यात तांदळाचा वाटा २४ टक्के होता. बासमती तांदळासह विविध जातींच्या तांदूळ निर्यातीतून सुमारे १,०५,७२० कोटींचे परकीय चलन मिळाले. यावरून तांदूळ उत्पादन वाढ आणि निर्यात अर्थव्यवस्थेला बळकटी देणारी आहे हे अधोरेखित होते.

भारताने तांदूळ उत्पादनात चीनला मागे टाकत जगातील पहिला क्रमांक मिळवला, ही बाब कृषिक्षेत्रापुरती मर्यादित नाही; तर हा भारताच्या स्वातंत्र्योत्तर विकासाच्या प्रवासातील एक महत्त्वाचा टप्पा आहे. अन्नसुरक्षेच्या प्रश्नावरून आयातीवर अवलंबून असलेल्या देशाने आज जागतिक अन्नपुरवठ्यात निर्णायक भूमिका मिळवणे, हे दीर्घकालीन धोरणात्मक परिवर्तनाचे यश आहे. सर्वाधिक तांदूळ उत्पादनाचे हे यश जगाचा पोशिंदा म्हणविल्या जाणाऱ्या शेतकऱ्याच्या श्रमातून मिळाले यात दुमत असूच शकत नाही. पण या यशात संशोधकांचे भक्कम पाठबळ आणि सरकारची कृषी क्षेत्राबाबत असलेली सकारात्मक दृष्टी याचेही योगदान आहे. स्वातंत्र्यानंतर शेती उत्पादन नेहमीच निसर्गाच्या लहरीवर अवलंबून होते. सिंचनाची सोय, शेती उत्पादनाची साठवणूक, उत्पन्नाला मिळणारा बाजारभाव याची देखील चिंता शेतकऱ्याला सतत छळत असे. तत्कालीन शासनाने याबाबत उपाययोजना केल्या नाहीत असे म्हणणे योग्य नसले तरी त्या-त्या वेळच्या सरकारची भूमिका केवळ तात्पुरती मलमपट्टी करणे अशीच राहिली. दरम्यान, विकसित भारत हे ध्येय घेऊन काम करणारे सरकार स्थापन झाल्यानंतर अनेक निर्णय दूरदृष्टी ठेवून घेण्यात आले. शेतीतील उत्पादन केवळ अन्नाची गरज पूर्ण करणारेच नव्हे तर देशाची अर्थव्यवस्था बळकट करणारे ठरू शकते. ही भूमिका स्वीकारून त्याप्रमाणे सरकारने धोरणे निश्चित केले. नवनवीन वाणांचे संशोधन, रोगप्रतिबंधक उपाययोजना आणि कमी पाण्यात अधिक उत्पादन देणारे बीज यासह शेतकऱ्यांच्या लहान-लहान प्रश्नांवर उत्तरे शोधण्यासाठी प्रयोगशाळेतील संशोधन थेट शेतकऱ्यांच्या बांधापर्यंत पोहोचविण्यात आले. तर दुसरीकडे शेतकऱ्यांना मिळणाऱ्या किमान आधारभूत किंमत व्यवस्थेत पारदर्शकता, सरकारी खरेदी यंत्रणांचे सक्षमीकरण झाल्याने शेतकऱ्यांचा विश्वास वाढला. या सर्व धोरणांचा सकारात्मक परिणाम शेतकऱ्यांना मिळायला लागला. तांदूळ उत्पादक शेतकऱ्यांना देखील फायदा झाला आणि तांदूळ उत्पादनात सातत्याने वाढ झाली. म्हणूनच तांदूळ उत्पन्नाची चीनची मक्तेदारी आपल्या देशाने मोडीत काढली. वास्तविक विशाल सिंचन व्यवस्था, यांत्रिकीकरण आणि केंद्रीकृत नियोजन असलेल्या चीनपेक्षा अधिक उत्पादन घेणे हे सोपे नाहीच. पण भारताने हवामानातील वैविध्यता, लहान शेतजमिनी आणि लाखो शेतकऱ्यांच्या सहभागातूनच हे यश मिळवले. हीच भारतीय शेतीची ताकद आहे. उत्पादनाच्या बाबतीत पहिल्या क्रमांकावर येणे म्हणजे व्यवस्थापनाची परिपक्वता आहे, हेही लक्षात घ्यायला हवे. जगात सर्वाधिक लोकसंख्या असलेल्या भारताने देशांतर्गत गरजा पूर्ण करून तांदूळ निर्यातीत स्थान मिळविले. अनेक देश अन्नासाठी तांदळाच्या आयातीवर अवलंबून असताना भारत विश्वसनीय पुरवठादार म्हणून समोर येणे ही बाब परराष्ट्र धोरणाला बळकटी देणारी आहे. ▮

९४२२८६२४८४

### शिक्षकांची ओळख जपली जावी

तरुण भारतमध्ये नुकताच प्रकाशित झालेला 'शिक्षकांना 'गुरुजी'च राहू द्या' हा अग्रलेख अत्यंत समयोचित आणि विचारप्रवर्तक वाटला. एक शिक्षक म्हणून सध्या अनुभवत असलेली व्यथा आणि चिंता या अग्रलेखातून नेमक्या शब्दांत व्यक्त झालेली दिसते. आज शिक्षकांवर अध्यापनाव्यतिरिक्त अनेक प्रकारची प्रशासकीय, डिजिटल आणि सर्वेक्षणात्मक कामे लादली जात आहेत. त्यामुळे शिक्षकाचा वेळ, ऊर्जा आणि मानसिक एकाग्रता यांचा मोठ्या प्रमाणावर अपव्यय होत आहे. परिणामी, वर्गातील अध्यापनावर आणि शिक्षणाच्या गुणवत्तेवर त्याचा विपरीत परिणाम होतो आहे. हा प्रश्न केवळ शिक्षकांचा नसून तो थेट विद्यार्थ्यांच्या भवितव्याशी जोडलेला आहे, हे या अग्रलेखाने योग्य प्रकारे अधोरेखित केले आहे.

शिक्षक म्हणजे केवळ उपलब्ध मनुष्यबळ नव्हे; तो समाज घडवणारा घटक आहे. त्याची मुख्य जबाबदारी अध्यापनाची असताना, त्याला सातत्याने इतर कामांत गुंतवणे ही दीर्घकालीन दृष्टिकोनातून शिक्षणव्यवस्थेसाठी घातक बाब ठरू शकते. या वास्तवाकडे शासन आणि प्रशासनाने गांभीर्याने पाहणे आवश्यक आहे. या पृष्ठभूमीवर तरुण भारतने या संवेदनशील विषयाला अग्रलेखातून वाचा फोडली, ही बाब विशेष उल्लेखनीय आहे. कुणावरही दोषारोप न करता, समतोल आणि अभ्यासपूर्ण मांडणी करून समाजाचे लक्ष एका महत्त्वाच्या प्रश्नाकडे वेधल्याबद्दल तरुण भारतचे मनःपूर्वक आभार. अशीच जबाबदार आणि जागरूक पत्रकारिता शिक्षणव्यवस्थेला योग्य दिशा देण्यास निश्चितच उपयुक्त ठरेल.

**गणेश जोशी**/९४०३१७५६८३

●● ●●

### संक्रांतीचे हळदी-कुंकू आणि मतदान

१५ जानेवारीला महानगरपालिकेची निवडणूक आहे. सोबतच संक्रांतीचे हळदी-कुंकूही आहे. या काळात स्त्रियांचा उत्साह दांडगा असतो. संक्रांतीचे वाण, हलव्याचे दागिने, काळ्या साड्या याने बाजारपेठ सजली आहे. त्यामानाने पाच वर्षांनी येणाऱ्या महानगरपालिका निवडणुकीचे सामान्य माणसाला विशेष कौतुक नसते. कारण कुणीही निवडून येवो, पळसाला पाने तीन. त्यातच निवडणुकीच्या दिवशी सर्वांनाच सुटी नसते. हळदी-कुंकू, घरचे काम, ऑफिस यात निवडणुकीचे म्हणजे मतदान करणे चौथ्या क्रमांकावर. त्यात ज्येष्ठांची वेगळीच गडबड असते. कोणीतरी येईल व आम्हाला घेऊन जाईल ही अपेक्षा. मतदानात महिलांचा सिंहाचा वाटा असतो. यावेळी मतदान व स्त्रियांचे संक्रांतीचे हळदी-कुंकू एकाच दिवशी आहे. नव्या नवरीचा सण सासर-माहेरचे मिळून दुसऱ्या दिवशी साजरा करतात. हे सर्व सांभाळून किती भगिनी मतदानाला जाणार? मतदान स्त्रियांचा हक्क असला तरी पूर्वापार चालत आलेले सण साजरे करताना स्त्रियांना आनंद, समाधान, परंपरा सांभाळतो याचा अभिमान वाटतो. १५ तारखेला महिलांना मतदान आणि हळदी-कुंकू करताना तारेवरची कसरत करावी लागणार आहे.

**निर्मला गांधी**/९११२२७५२८४

## वाचक पत्रे

### युवांचे प्रेरणास्थान स्वामी विवेकानंद

१२ जानेवारीला स्वामी विवेकानंदांची जयंती आहे. हाच दिवस आपण राष्ट्रीय युवा दिन म्हणून साजरा करतो. स्वामींना अध्यात्माची ओढ लहानपणापासूनच होती. त्यांचे गुरू रामकृष्ण परमहंस यांच्या मार्गदर्शनानुसार त्यांनी आपली साधना सुरू केली. स्वामी विवेकानंदांनी देव, देश आणि धर्म यासाठी आपले संपूर्ण आयुष्य वाहिले. त्यांनी धर्माचा प्रसार, प्रचार करण्यासाठी भारतभर आणि जगभर भ्रमण केले. १८९३ मध्ये अमेरिकेत शिकागो येथे धर्म परिषद होती. त्याकाळी पश्चिमी देश भारताला तुच्छ लेखत असे. त्या परिषदेत स्वामी विवेकानंदांनी दिलेले प्रवचन (भाषण) जगात अजरामर झाले. भाषणाची सुरुवातच त्यांनी 'माझ्या बंधू आणि भगिनींनो' अशी केली आणि सर्वच भारावून गेले. त्यांनी हिंदू धर्म, अध्यात्म, संस्कार, साहित्य याची ओळख आपल्या ओघवत्या वाणीतून पाश्चात्य जगाला करून दिली. त्यांची आध्यात्मिक साधना असल्यामुळे, वाणीत चैतन्य होते. संपूर्ण सभागृह मंत्रमुग्ध होऊन त्यांचे विचार ऐकत होते. त्यानंतरही त्यांनी काही वर्षे पाश्चात्त्य राष्ट्रात हिंदू धर्माचा प्रसार, प्रचार केला. न्यू यॉर्कमध्ये वेदांत सिटीची स्थापना केली. तसेच कॅलिफोर्नियात शांती आश्रमाची स्थापना केली. त्यानंतर ते भारतात परतले. इथेही ते सतत भ्रमंतीवर असायचे. भारतात रामकृष्ण मठ व रामकृष्ण मिशनची स्थापना केली. तेव्हा भारतात ब्रिटिश राजवट होती. त्यांनी देशातील तरुणांमध्ये राष्ट्रभक्तीची ज्योत प्रज्वलित केली. म्हणून त्यांचा जन्मदिवस (१२ जानेवारी) राष्ट्रीय युवा दिवस म्हणून साजरा केला जातो.

आजच्या पिढीने स्वामीजींचे विचार वाचले तर त्यांना राष्ट्रधर्माविषयी लहानपणापासूनच प्रेम निर्माण होईल. भारताची सध्याची स्थिती बघता स्वामींच्या विचारांची नितांत गरज वाटते. त्यांनी आपले संपूर्ण आयुष्य राष्ट्रधर्मासाठी वाहिले. त्यांचे हे कार्य युगे युगे स्मरणात राहील. अशा या भारत मातेच्या सुपुत्राला कोटी कोटी नमन. ▮

**माधवी पत्की**/नागपूर

वाचक पत्रे पाठविण्यासाठी ईमेल ॲड्रेस
tbedit2016@gmail.com
तसेच **कुठलाही लेख** पाठवायचा असल्यास **९८५०७५३२८१** या व्हॉट्स ॲप क्रमांकावर पाठवावा.

हे पत्र मुद्रक व प्रकाशक कुलभूषणराम रामकृष्ण तारे यांनी सोलापूर तरुण भारत मीडिया लिमिटेड करिता, सोलापूर तरुण भारत कार्यालय प्लॉट नं ए –३२,छत्रपती संभाजीनगर इंडस्ट्रियल को ऑफ सोसायटी रेल्वे स्टेशन रोड छत्रपती संभाजी नगर ४३१००५ (महाराष्ट्र) येथे छापून दैनिक सोलापूर तरुण भारत कार्यालय,छत्रपती संभाजीनगर येथे प्रकाशित करून छत्रपती संभाजीनगर, जालना,परभणी,नांदेड, हिंगोली ,बीड येथील सोलापूर तरुण भारतच्या विभागीय कार्यालयातून वितरीत केले.
प्रबंध संपादक :विवेक घळसासी. मुख्य समुह संपादक : दिलीप यशवंत पेठे. मुख्य संपादक: प्रशांत वसंतराव माने, दूरध्वनी –८८८८४७२६८ RNI Reg.No 46878/87
stbaurangabad@gmail.com. www.dainiktarunbharat.com, epaper.dainiktarunbharat.com या अंकात प्रसिद्ध झालेल्या बातम्या व लेख यामधून व्यक्त झालेल्या मतांशी संपादक/संचालक सहमत असतीलच असे नाही. (पी. आर. बी. कायद्यानुसार जबाबदारी)

## संक्षिप्त वृत्त...

### दर्पण दिनानिमित्त वरपूडकर महाविद्यालयात पत्रकारांचा सन्मान

**सोनपेठ / प्रतिनिधी -** येथील कै. रमेश वरपूडकर महाविद्यालयाच्या अंतर्गत गुणवत्ता हमी कक्षाच्या वतीने दर्पण दिनानिमित्त तालुक्यातील पत्रकार बांधवांचा समाज सोहळा आयोजित करण्यात आला होता.

बाळशास्त्री जांभेकर यांनी मराठी भाषेत वृत्तपत्र सुरू करून समाजजागृतीचे मोठे कार्य केले. त्यांना मराठी वृत्तपत्रांचे जनक मानले जाते. महाराष्ट्रात दर्पण दिन हा पत्रकार दिन म्हणूनही ओळखला जातो असे मत अध्यक्षीय समोर प्रसंगी प्राचार्य वसंत सातपुते यांनी व्यक्त केले.

दर्पण दिनानिमित्त सोनपेठ येथे पत्रकारांच्या सन्मान सोहळ्याचे आयोजन महाविद्यालयात करण्यात आले होते. या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी हनुमान शिक्षण प्रसारक मंडळाचे कोषाध्यक्ष श्री रामेश्वर कदम हे होते. तर प्रमुख उपस्थितीत प्राचार्य डॉ. वसंत सातपुते व समन्वयक डॉ. मुकुंदराज पाटील हे होते. यावेळी मान्यवरांच्या हस्ते दर्पणकार बाळशास्त्री जांभेकर यांच्या प्रतिमेचे सर्वप्रथम पूजन करण्यात आले. त्यानंतर सन्मानमूर्ती सर्व पत्रकार बांधव यांचा मान्यवरांच्या हस्ते यथोचित सन्मान करण्यात आला. या कार्यक्रमासाठी पत्रकार शिवमल्हार वाघे, गणेश पाटील, गजानन चिकणे, भागवत पोपडे, सिद्धेश्वर गिरी, आशिष मुंढे, बाबासाहेब गर्जे, सोमनाथ नागुरे, महादेव नरवटे, सुभाष सावंत, कल्याण वाघमारे, किरण स्वामी, प्रशांत बिराजदार, गणेश नाईक आदी पत्रकार बांधवांची उपस्थिती होती. यावेळी पत्रकार शिवमल्हार वाघे , गणेश पाटील यांनी पत्रकाराची भूमिका व पत्रकारितेचे समाजातील महत्त्व समजावून देत सत्काराला उत्तर दिले. अध्यक्षीय समारोपात महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ वसंत सातपुते यांनी पत्रकारांच्या सकारात्मक भूमिकेचे कौतुक करत महाविद्यालयाच्या कार्यक्रम व उपक्रमांना वेळोवेळी यथोचित प्रसिद्धी दिल्याबद्दल सर्व पत्रकार बांधवांचे कौतुक केले. या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्रा.डॉ. मुक्ता सोमवंशी यांनी केले. तर आभार प्रा.डॉ. विठ्ठल जायभाये यांनी मानले.

### महानगरपालिका निवडणुकीसाठी ‘वोट फॉर परभणी’ मतदार जनजागृती उपक्रम

**परभणी / प्रतिनिधी -** महापालिका निवडणूकीसाठी १५ जानेवारी रोजी मतदान होणार असून, मतदारांनी मोठ्या संख्येने मतदान प्रक्रियेत सहभागी व्हावे, यासाठी महानगरपालिका प्रशासनाच्या वतीने ‘वोट फॉर परभणी’ हा विशेष मतदार जनजागृती उपक्रम राबविण्यात येणार आहे. हा उपक्रम १२ जानेवारी रोजी राष्ट्रमाता राजमाता जिजाऊ यांच्या जयंती व स्वामी विवेकानंद यांच्या जयंती अर्थात युवक दिनानिमित्त आयोजित करण्यात आला आहे.

या उपक्रमांतर्गत शहरातून भव्य ‘वॉक फॉर वोट’ काढण्यात येणार असून, यामध्ये शालेय विद्यार्थी, नागरिक, अधिकारी व कर्मचारी उत्स्फूर्तपणे सहभागी होणार आहेत. वॉक फॉर वोटमध्ये सहभागी होणारे विद्यार्थी आपापल्या शाळेच्या गणवेशात सहभागी होणार असून, या रॅलीत बँड पथक, घोषवाक्यांचे फलक, सैनिकी शाळेचे विद्यार्थी तसेच राष्ट्रीय सेवा योजना (एनएसएस) चे विद्यार्थी सहभागी होणार आहेत. या उपक्रमात शहरातील विविध क्रीडा संघटना, शाळा व महाविद्यालयांचा सहभाग असणार आहे.

वॉक फॉर वोटचा मार्ग शनिवार बाजार येथून सुरू होऊन गांधी पार्क, अष्टभुजा देवी मंदिर, गोल्डन बेकरी, कन्या प्रशाला, वि'यवरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर पुतळा, छत्रपती शिवाजी महाराज पुतळा मार्गे राजगोपालचारी उद्यान येथे येऊन या उपक्रमाचा समारोप होणार आहे. या ठिकाणी सर्व शालेय विद्यार्थी व नागरिक एकत्र आल्यानंतर कार्यक्रमाचा समारोप करण्यात येणार आहे.

या उपक्रमाच्या नियोजनासंदर्भात नुकतीच महानगरपालिकेत बैठक पार पडली. या बैठकीस निवडणूक अधिकारी नितीन नार्वेकर, स्वीपचे नोडल अधिकारी गणेश शिंदे, क्रीडा मार्गदर्शक रंजीत काकडे, कैलास माने तसेच मतदार जनजागृती पथकातील राजकुमार जाधव, प्रवीण वायकोस, अरविंद शहाणे, मोहन आल्हाट, प्रफुल्ल शहाणे, संजय पेडगावकर, अतुल सामाले, गोविंद कपाटे, अर्जुन झटे, त्र्यंबक वडसकर आदी उपस्थित होते.

‘वोट फॉर परभणी’ या उपक्रमामध्ये शाळेतील विद्यार्थ्यांसह अधिकारी व कर्मचारी मोठ्या संख्येने सहभागी होणार आहेत. या उपक्रमात सहभागी होणाऱ्या सर्व विद्यार्थ्यांना सहभागी प्रमाणपत्र देण्यात येणार असून, कार्यक्रमाच्या समारोपस्थळी राजगोपालचारी उद्यान येथे अल्पोपहाराची व्यवस्था करण्यात आली आहे.

### चित्रकला एक व्यक्तिमत्व विकासाचे आदर्श माध्यम - डॉ.विवेक नावंदर

**परभणी,/प्रतिनिधी :** कलेच्या क्षेत्रात होणारे वैविध्यपूर्ण बदल पाहता व एआय या आधुनिक तंत्रासह झपाट्याने होणारे जागतिक बदल लक्षात घेता चित्राच्या माध्यमातून अभिव्यक्त होण्यासाठी व्यक्तिमत्व घडवण्यासाठी महत्त्वाचे आदर्श साधन म्हणून पाहताना चित्रकलेला महत्त्वाचे स्थान प्रत्येकाने आपल्या आयुष्यात दिले पाहिजे, असे मत बाल विद्यामंदिर शिक्षण संस्थेचे सचिव तथा कार्यक्रमाचे उद्घाटक डॉ. विवेक नावंदर यांनी व्यक्त केले.

बाल विद्यामंदिर शिक्षण संस्थेचे प्रेरणास्थान स्व.डॉ. पांडुरंगजी नावंदर (बाबुजी) यांच्या जयंती निमित्त रविवार ४ जानेवारी रोजी अंबीका नगरातील बाल विद्याविहार प्रशालेत भव्य चित्रकला स्पर्धा आयोजित करण्यात आली होती. याप्रसंगी ते बोलत होते. यावेळी मान्यवरांच्या हस्ते चित्रकला स्पर्धेचे दीप प्रज्वलन व चित्रकलेच्या विषय फलकाचे अनावरण करण्यात आले.

सोलापूर तरुण भारत

कार्यालयाचा पत्ता- डॉ.लोया नेत्र रुग्णालयासमोर ढवळे यांचे निवासस्थान शिवाजी नगर, परभणी

तात्काळ प्रतिनिधी नेमणे आहे.

संपूर्ण मराठवाडयामध्ये झपाट्याने वाढणाऱ्या **दै.सोलापूर तरुण भारत** साठी परभणी जिल्हयात खालील ठिकाणी प्रतिनिधी नेमणे आहे.
**१.गंगाखेड-** तालुका प्रतिनिधी व शहर प्रतिनिधी, ०२. **पूर्णा-** तालुका प्रतिनिधी व शहर प्रतिनिधी ०३. **मानवत** - तालुका प्रतिनिधी व शहर प्रतिनिधी,
०४. **पालम** - तालुका प्रतिनिधी व शहर प्रतिनिधी ०५. **सेलू** - शहर प्रतिनिधी ताडकळस, बोरी, राणी सावरगाव, कौसडी, चारठाणा, वालूर या सर्व ठिकाणी तात्काळ प्रतिनिधीची नियुक्ती करावयाची आहे. पत्रकारितेतील अनुभव असलेल्या व दै.तरुण भारतसाठी काम करु इच्छिणाऱ्या प्रतिनिधींनी संपर्क साधावा.

**जिल्हा प्रतिनिधी- मोहन धारासूरकर**

९४ २३३२४६६५, ९२८४६६४४३०, ९२८४६९५५८३

# बॅरिस्टर असदुद्दीन ओवेसी यांची आज परभणीत होणार जाहीर सभा

**परभणी,/प्रतिनिधी :** महानगरपालिका निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर एआयएमआयएम पक्षाच्या वतीने निवडणूक लढविणाऱ्या १८ उमेदवारांच्या प्रचारासाठी पक्षाचे राष्ट्रीय अध्यक्ष बॅरिस्टर असदुद्दीन ओवेसी यांची मंगळवार ११ जानेवारी रोजी परभणी शहरात जाहीर सभा आयोजित करण्यात आली आहे.

बॅरिस्टर ओवेसी हे सकाळी ११ वाजता हेलिकॉप्टरद्वारे पोलीस मुख्यालय मैदानावर आगमन करतील. त्यानंतर ते थेट दर्गा रोडवरील तुराबुल हक मैदान येथे जाहीर सभेसाठी उपस्थित राहणार आहेत. या सभेला माजी खासदार इम्तियाज जलील तसेच हैद्राबाद येथील बहादुरपुरा विधानसभा मतदारसंघाचे आमदार मोहम्मद मुबीन



यांच्यासह पक्षाचे वरिष्ठ पदाधिकारी उपस्थित राहणार आहेत.

या भव्य प्रचार सभेस परभणी शहर व परिसरातील नागरिकांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहावे, असे आवाहन प्रसिद्ध उद्योजक तथा जिल्हा समन्वयक मोहम्मद गौस झैन यांनी केले आहे.

## कारने दिलेल्या धडकेत मोटार सायकलवरील तिघांचा दुर्दैवी मृत्यू :

### झरी जवळील दुर्दैवी घटना : वारकरी सांप्रदायातील किर्तनकारांच्या मृत्यूने शोककळा

**जिंतूर,/प्रतिनिधी :** जिंतूर ते परभणी या महामार्गावर झरीच्या अलिकडे शेख पाटी ते कालवा या दरम्यान शुक्रवारी मध्यरात्री एका कारने दिलेल्या धडकेत मोटारसायकलवरील तिघांचा मृत्यू झाला.

तालुक्यातील बोर्डी येथील वारकरी सांप्रदायातील प्रसिध्द मृदुंगाचार्य माऊली महाराज बोर्डीकर, प्रसाद महाराज बोर्डीकर व दत्ता महाराज मुडेकर हे तीघे किर्तनाचा एक कार्यक्रम आटोपून एका मोटारसायकलद्वारे बोर्डीकडे जात होते. मध्यरात्री १ ते २ वाजेच्या सुमारास शेख पाटी ते कालवा या दरम्यान एका कारने जोरदार धडक दिली. या धडकेने मोटारसायकलवरील हे तीघे मोटारसायकलसह व कार रस्ता सोडून २५ फुटापर्यंत एका शेतात जावून आदळली. त्यात मोटारसायकलवरील या तिघांचा मृत्यू झाला. दरम्यान, वारकरी सांप्रदायातील या तिघांच्या मृत्यूने जिंतूर तालुक्यात मोठी शोककळा पसरली.

## संत गाडगेबाबा नगरवासियांचा मतदानावर बहिष्काराचा निर्धार

**परभणी,/प्रतिनिधी :** महानगरपालिका हद्दीतील प्रभाग क्रमांक ५ मधील श्री संत गाडगेबाबा नगरातील नागरीकांनी रहिवाशांच्या प्रत्येकाच्या नावानिशी रजिस्ट्री व पीआरकार्ड त्वरित वितरित करावे, अन्यथा मतदानाच्या प्रक्रियेवर बहिष्कार टाकण्याचा सर्वानुमते निर्धार जाहीर केला आहे.

या भागातील या नागरीकांनी यापूर्वी सातत्याने प्रशासनाकडे प्रत्येकाच्या नावानिशी रजिस्ट्री व पीआरकार्ड वितरित करण्या संदर्भात भक्कम असा पाठपुरावा केला. परंतु, आश्वासनांपलिकडे फार काही मिळाले नाही. त्यामुळे या संतप्त नागरीकांनी महापालिका निवडणूकीचे औचित्य साधून मतदानाच्या प्रक्रियेवरच बहिष्कार टाकण्याचा निर्धार जाहीर केला. प्रशासनाने दखल घ्यावी, अन्यथा या पध्दतीची कृती केली जाईल, असा इशारा या नागरीकांनी दिला आहे.

## महानगरपालिका निवडणूकीकरीता ११ ते १४ जानेवारीदरम्यान टपाली मतदान : पाच अधिकारी-कर्मचारी यांचे स्वतंत्र पथक नियुक्त

**परभणी,/प्रतिनिधी :** महानगरपालिकेच्या सार्वत्रिक निवडणूकीच्या अनुषंगाने टपाली मतदानाची प्रक्रिया ११ ते १४ जानेवारी या कालावधीत राबविण्यात येणार आहे. या कालावधीत दररोज सकाळी १०.३० ते सायंकाळी ५.०० वाजेपर्यंत टपाली मतदान घेण्यात येणार आहे, अशी माहिती निवडणूक प्रशासनाने दिली आहे.

टपाली मतदानासाठी पाच अधिकारी-कर्मचारी यांचे स्वतंत्र पथक नियुक्त करण्यात आले असून टपाली व सुविधा मतदान केंद्र परभणी शहर महानगरपालिकेच्या मध्यवर्ती प्रशासकीय इमारतीत स्थापन करण्यात आले आहे.




टपाली मतदारांनी दिलेल्या कालावधीत संबंधित सुविधा मतदान केंद्रावर प्रत्यक्ष उपस्थित राहून आपला मतदानाचा हक्क बजावावा, असे आवाहन करण्यात आले आहे.

दरम्यान, आयुक्त तथा निवडणूक अधिकारी यांनी टपाली मतदान सुविधा केंद्रावर उमेदवारांचे अधिकृत प्रतिनिधी उपस्थित ठेवण्याबाबत सर्व उमेदवारांना लेखी पत्राद्वारे सूचना दिल्या आहेत.

## काँग्रेसचे माजी तालुकाध्यक्ष गोविंद यादव यांचा डॉ. रत्नाकर गुट्टे काका मित्र मंडळात प्रवेश : गंगाखेड विधानसभा संपर्क प्रमुख पदी नियुक्ती

**परभणी,/प्रतिनिधी :** काँग्रेसचे तालुकाध्यक्ष गोविंद यादव यांनी आज शुक्रवार ९ जानेवारी रोजी आपल्या समर्थकांसह आ. डॉ. रत्नाकर गुट्टे काका मित्र मंडळात प्रवेश केला.

आ. गुट्टे यांच्या राम सीता सदन या संपर्क कार्यालयात पक्षप्रवेश सोहळा आयोजित करण्यात आला होता. यावेळी आमदार डॉ. रत्नाकर गुट्टे, मित्र मंडळाचे जिल्हाध्यक्ष ॲड. संदिप अळनुरे, जिल्हा संपर्क प्रमुख बालाजी मुंडे, तालुकाध्यक्ष प्रल्हादराव शिंदे, उपसभापती संभाजी पोले, माजी जि. प. सदस्य शंकरराव वाघमारे, प्राचार्य मारोतराव साळवे, नगर परिषदेचे गटनेते ॲड. सय्यद अकबर, नगरसेवक सय्यद चांद, बाळासाहेब बोडखे, सुमित कामत, कासले, ऊद्धव शिंदे, संदिप राठोड, यांचेसह समता परिषदेचे तालुकाध्यक्ष बालासाहेब यादव, अक्षय मेहत्रे, व्यंकटेश यादव, सचिन यादव, प्रथम यादव आदि या प्रसंगी उपस्थित होते. याप्रसंगी गोविंद यादव यांची गंगाखेड विधानसभा संपर्क प्रमुख पदी नियुक्ती करण्यात आली.

नुकत्याच पार पडलेल्या नगर परिषद निवडणुकीत पक्ष श्रेष्ठींनी अपेक्षीत पाठबळ न दिल्याचा आरोप करत यादव यांनी काँग्रेस पक्षाचे तालुका अध्यक्ष पद आणि काँग्रेसच्या प्राथमिक सदस्यत्वाचा राजीनामा दिला होता. परिसरातील काँग्रेसचा प्रमुख चेहरा असलेले गोविंद यादव पक्षाला सोडचिठ्ठी दिल्यानंतर कोणत्या पक्षात प्रवेश करणार, या बाबत विविध तर्क लावले जात होते. या तर्कवितर्कांना आजच्या प्रवेशाने पुर्णविराम मिळाला आहे.

माजी तालुका उपाध्यक्ष दत्तराव भीसे, नाभीक सेनेचे माऊली डमरे, सुपा ग्रामपंचायतचे उपसरपंच लक्ष्मण घोलप, ग्रा. पं. सदस्य गंगाधर घोलप, सावता शिंदे यांनीही या प्रसंगी मित्र मंडळात प्रवेश केला. सर्व क्षेत्रात क्रियाशील असलेल्या गोविंद यादव यांच्या प्रवेशामुळे मित्रमंडळाचे कार्य अधिक चांगल्या पद्धतीने होईल, असा विश्वास आ. डॉ. रत्नाकर गुट्टे यांनी याप्रसंगी आयोजित पत्रकार परिषदेत व्यक्त केला. तर आ. गुट्टे यांच्या सहकार्यातून गंगाखेड शहरासह विधानसभा मतदार संघातील विविध विकासकामे करून घेणे आता अधिक सुलभ झाल्याच्या भावना गोविंद यादव यांनी बोलून दाखवल्या.

### मनपा निवडणूक प्रचार सुरु परंतू उमेदवारच संभ्रमात

**परभणी,/प्रतिनिधी :** परभणी महापालिकेच्या निवडणूकीचा प्रचार आता मोठया प्रमाणात सुरु असून या प्रचारात त्यांना कोणास काय बोलावे व कोणास काय द्यावे असा मोठा प्रश्न समोर पडला असून त्यांचे उत्तम उदाहरण म्हणजे परभणी शहरातील प्रभाग क्रं. ९ मधील सर्वच पक्षांत उमेदवार संभ्रमात असून याचा परिणाम त्यांच्या निवडणूकीच्या मतदानावर होणार असून त्यांचे या प्रकारामुळे निवडूण येणे देखील आता मुश्कील होणार आहे.

## जांभूळबेटावरील महोत्सवाला सहभागी व्हावे - कृषिभूषण देशमुख



पालम (प्रतिनिधि ) तालुक्यातील सोमेश्वर येथिल आसलेल्या गोदावरी नदी पात्रातील निसर्गरम्य जांभूळ बेटावर दरवर्षी प्रमाणे याही वर्षी जांभूळबेट महोत्सवाचे दि.११ जानेवारी रोजी आयोजन करण्यात आले आहे. मागील पाच वर्षापासून जांभूळ बेटावर लोकसहभागातून विविध उपक्रम राबवून संवर्धन केले जात आहे.जांभूळ बेट संवर्धन समितीद्वारे तसेच नांदेड येथिल वृक्षमित्र फाऊंडेशनच्या सक्रीय सहभागाने लोक सहभागातून विकसित होत असलेल्या अंतर्गत बेटावर निसर्ग वृक्ष लागवड, सहल,फुलझाडे बाग निर्मिती,वृक्षांच्या माहितीच्या फलकांचे अनावरण,सामूहिक वनभोजन व योग साधना आसे कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले आहे. या अंतर्गत आत्ता पर्यंत बेटावरती चार हजार पेक्षा अधिक औषधी व पर्यावरणपूरक वृक्षांची लागवड करण्यात आल्याचे कळते

तसेच वृक्षांचे संगोपन केले जात आहे. निसर्गप्रेमी पर्यटकांसाठी स्वच्छता उपक्रम व बोटीची सुविधा,महिलां साठी प्रसाधनगृह, सेल्फी पॉईंट अशा विविध उपक्रमातून दुर्लक्षित असलेले निसर्गरम्य बेट एक पर्यटनस्थळ म्हणून नावारूपास येत आहे. जांभूळबेट महोत्सवात नांदेड येथील वृक्षमित्र फाऊंडेशन व नित्ययोग समिती भक्ती लॉन्स येथील सदस्यांची उपस्थिती राहणार आहे. जांभूळबेट संवर्धन समितीतर्फे महोत्सवात सहभागी होण्याचे आवाहन कृषिभूषण कांतरावजी देशमुख झरीकर, वृक्षमित्र संतोष मुगटकर, प्रा.आत्माराम आरसुळे,रामजी कदम, सतीश कुलकर्णी,संदीप गोळेगावकर,गोविंद दुधाटे,संभाजी दुधाटे, प्रीतम भराडीया,कैलास अमिलकंठवार व नित्ययोग समितीचे योगगुरु सीताराम सोनटक्के,पंकज अयनले, मकरंद पांगरकर, बाळकृष्ण पसलवाड व पर्यावरणप्रेमी,वृक्षमित्र तसेच गावकऱ्यानी केले आहे.

कृषि उत्पन्न बाजार समिती, सेलू, ता.सेलू.जि.परभणी

**फेरनिविदा**

कृषी उत्पन्न बाजार समिती सेलूच्या कायक्षेत्रातील व्यापारी व अन्य इच्छुकांना सुचित करण्यात येते की, कृषी उत्पन्न बाजार समिती सेलूच्या मुख्य कापसू यार्डमध्ये बाजार समितीच्या स्वमालकिच्या ४० टन मी इलेक्ट्रॉनिक्स भईजबन काटा व धान्य चाळणी यंत्र ११ महिन्याच्या कालावधीकरिता भाडेत्त्वावर द्यावयाचे आहे. तरी आपली सीलबांद निविदा सदरील जाहिरात प्रसिद्ध झाल्यापासनू सात (७) दिवसाच्या आत (सुट्टीचे दिवस वगळता) कार्यालयात सादर करावे. प्राप्त झालेल्या सीलबांद निविदा दिनांक १९/०१/२०२६ वार सोमवार रोजी दुपारी १२:०० वाजता उपस्तिासक्षक्ष उघडण्यात येतील. याबाबतच्या अटी व शर्ती सेलू बाजार समिती कार्यालयाच्या नोटीस बोर्डावर दाखवण्यात आलेली असून कार्यालयीन वेळेत (सुट्टीचे दिवस वगळता) पहावयास मिळेल.

स्वाक्षरीत /- सचिव | स्वाक्षरीत/- उपसभापती | स्वाक्षरीत /- सभापती

कृषि उत्पन्न बाजार समिती, सेलू, ता.सेलू.जि.परभणी

**जहिर निविदा**

कृषी उत्पन्न बाजार समिती, सेलू येथून सन २०२५-२६ या हगांमासाठी सीसीआय (कॉटन कॉपरेशन ऑफ इंडिया) अंर्तगत कापसू खरेदी या राबिवण्यात येणार आहे.
`सदर कापूस खरेदीची ऑनलाईन प्रक्रिया सुरळीतपणे राबविण्याकरिता खालील प्रमाणे साहित्य खरेदी करण्यासाठी इच्छुक, नोंदणीकृत व पात्र पुरवठादार / विक्रेत्यांकडून सीलबंद दरपत्रके (निविदा) मागिवण्यात येत आहेत.
खरेदी करावयाचा साहित्य तपशील : सगंणक (Desktop Computer ) ५ नग व प्रिंटर २ नग.
प्राप्त. झालेल्या सीलबंद निविदा दिनांक १९/०१/२०२६ वार सोमवार रोजी दुपारी १२:०० वाजता उपस्थिता समक्ष उघडण्यात येतील.
याबाबतच्या अटी व शर्ती सेलू बाजार समिती कार्यालयाच्या नोटीस बोर्डावर दाखविण्यात आलेली असून कार्यालयीन वेळेत (सुट्टीची दिवस वगळता) पहावयास मिळेल.

स्वाक्षरीत /- सचिव | स्वाक्षरीत/- उपसभापती | स्वाक्षरीत /- सभापती

सोलापूर तरुण भारत

www.dainiktarunbharat.com, epaper.dainiktarunbharat.com

# संत वामनभाऊ महाराजांचे विचार पिढ्यान्‌पिढ्या मार्गदर्शक–मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस

## संत वामनभाऊ महाराज यांच्या सुवर्णमहोत्सवी पुण्यतिथी सोहळ्यानिमित्त कळशारोपण कार्यक्रम

**तभा वृत्तसेवा**
**बीड दि.१० जानेवारी**

समाजाला अध्यात्म, सदाचार आणि एकोप्याचा मार्ग दाखवणारे नाथ परंपरेतील महान संत वामनभाऊ महाराज यांचे विचार काळाच्या ओघातही अधिकच सुसंगत ठरत असून, त्यांचे कीर्तन, नामस्मरण आणि उपदेश पिढ्यान्पिढ्या समाजाला मार्गदर्शन करत राहतील, असे प्रतिपादन मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी केले.

संत वामनभाऊ महाराजांच्या ५० व्या, सुवर्णमहोत्सवी पुण्यतिथी सोहळ्यानिमित्त आयोजित कार्यक्रमात मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस बोलत होते. यावेळी पर्यावरण मंत्री पंकजा मुंडे, गडाचे महंत विठ्ठल महाराज, आमदार धनंजय मुंडे, सुरेश धस, मोनिका राजळे, तसेच योगेश क्षीरसागर, माजी आमदार जयदत्त क्षीरसागर, भीमराव धोंडे, विक्रमानंद शास्त्री, स्वामी विश्वेश्वरानंदजी महाराज आदी मान्यवर उपस्थित होते.

मुख्यमंत्री फडणवीस म्हणाले की, संत वामनभाऊ महाराजांच्या पुण्यतिथीनिमित्त त्यांच्या चरणी नतमस्तक होण्यासाठी आणि आशीर्वाद घेण्यासाठी मी येथे आलो आहे. हे निमंत्रण मुख्यमंत्र्याला नसून, संत वामनभाऊ महाराजांच्या एका भक्ताला आणि गहिनीनाथ गडाच्या सेवकाला विठ्ठल महाराजांनी दिलेले आहे, या भावनेतून मी येथे उपस्थित आहे.

नाथ परंपरेतील महान संत आणि शंकराचा अवतार मानले जाणारे संत वामनभाऊ महाराज हे समाजाला दिशा देणारे सद्‌ गुरु होते. दऱ्या–खोऱ्यांतून प्रवास करत त्यांनी भागवत पंथाचा प्रचार केला आणि समाजात एकोप्याचा संदेश दिला. मन शुद्ध असेल तर आचरण शुद्ध होते हा विचार त्यांनी समाजमनात रुजवला. त्यांच्या उपदेशामुळे चोरसुद्धा चोरी सोडून माळकरी झाले, ही त्यांची अलौकिक किमया होती, असे त्यांनी सांगितले.

संत वामनभाऊ महाराजांना वाचासिद्धी होती, असे सांगितले जाते. त्यांच्या कीर्तनातून आणि विचारातून समाजातील शेवटच्या व्यक्तीपर्यंत




अध्यात्म पोहोचले. कितीही पिढ्या बदलल्या तरी त्यांचे कीर्तन, नामस्मरण आणि उपदेश आजही तितकेच महत्त्वाचे आहेत, असे मुख्यमंत्री फडणवीस यांनी नमूद केले.

प्रसाद वितरणाची परंपरा हे संत वामनभाऊ महाराजांचे मोठे वैशिष्ट्य असून, जिथे–जिथे सप्ताह होतो तिथे भाविकांसाठी पोटभर जेवणाची व्यवस्था केली जाते. पुढील सप्ताहासाठी विविध गावांतून मोठ्या प्रमाणावर मागणी असणे ही संत वामनभाऊ महाराजांच्या कृपेची साक्ष असल्याचेही मुख्यमंत्री म्हणाले.गहिनीनाथ गडाच्या विकासासाठी शासनाच्या योजनेअंतर्गत विविध कामे हाती घेण्यात आली असून ती टप्प्याटप्प्याने पूर्ण होत आहेत.पंढरपूर येथे आवश्यक जागा उपलब्ध करून देण्यात आली असून, पालखी मार्गाच्या विकासासाठीही लवकरच काम करण्यात येईल, असे आश्वासन देत मुख्यमंत्री फडणवीस यांनी स्पष्ट केले की, मुख्यमंत्री म्हणून नव्हे तर गहिनीनाथ गडाचा एक अनुयायी म्हणून येथील सर्व विकासकामांची जबाबदारी लोकप्रतिनिधींसह मिळून पार पाडली जाईल. दरवर्षी संधी मिळेल तेव्हा गहिनीनाथ गडावर येऊन संत वामनभाऊ महाराजांचा आशीर्वाद घेत राहीन, असे मुख्यमंत्री म्हणाले.यावेळी पर्यावरण मंत्री पंकजा मुंडे म्हणाल्या, संत वामनभाऊ महाराजांनी कठीण काळात माणसाला माणूस बनवण्याचे संस्कार समाजाला दिले. सत्य, एकोपे आणि सेवाभावाचे हे संस्कार आजही महाराष्ट्रभर जिवंत आहेत. कष्टकरी, गरीब आणि वंचित समाज वामनभाऊ महाराजांचे विचार विसरलेला नाही.

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या माध्यमातून गहिनीनाथ गडाच्या विकासाला भव्य स्वरूप मिळत असून, हे कार्य भाविकांच्या श्रद्धेला साजेसे ठरत आहे. सामान्य माणसाच्या श्रद्धास्थानांच्या विकासासाठी केलेले हे कार्य निश्चितच लोकांचा आशीर्वाद मिळवून देणारे आहे असा उल्लेख त्यांनी केला.यावेळी भाविक मोठया संख्येने उपस्थित होते.

### गहिनीनाथगडाचा भव्य विकास ही आपली मनोमन इच्छा; यासाठी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी दुधात साखर टाकली – ना. पंकजाताई मुंडे

मी पालकमंत्री असताना मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या माध्यमातून गहिनीनाथगडाच्या विकासासाठी निधी आणून विकास कामांना सुरुवात केली होती. एक लेक म्हणून अधिकाधिक भव्य दिव्य अशा गडाच्या विकासाची मनोमन इच्छा होती. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी दुधात साखर टाकली असून आज जो गहिनीनाथ गडाचा विकास सुरू आहे तो एकमेव देवेंद्र फडणवीस यांच्या मुळेच शक्य झाला आहे. त्याबद्दल आपण त्यांचे आभार मानते. त्याचबरोबर लोकांचे हे प्रेम, आशीर्वाद आणि डोळ्यातील आदर कायम



राहण्याजोगे काम आपल्या हातून घडावे हीच संत वामनभाऊ चरणी आपण प्रार्थना करत असल्याची भावना राज्याच्या पर्यावरण व पशुसंवर्धन मंत्री ना. पंकजाताई मुंडे यांनी गहिनीनाथगडावर बोलताना व्यक्त केली.

# नमो श्रीराम नामाचा अखंड जयघोष

## महाजनवाडी ते अयोध्याधाम ७५ दिवसीय पायी रथयात्रेचा आज होणार प्रारंभ-विष्णुदास महाराज सुरवसे

**तभा वृत्तसेवा**
**बीड दि.१० जानेवारी**

श्रीराम नवमीच्या पावन पर्वनिमित्त श्रीक्षेत्र महाजनवाडी,ता.जि.बीड येथून श्रीक्षेत्र अयोध्याधाम येथे जाणारी ७५ दिवसीय, सुमारे २००० किलोमीटर अंतराची पायी 'नमो श्रीराम नाम रथयात्रा दिंडी सोहळा' भक्तिभाव, त्याग, सेवा व संकल्पशक्तीचे जिवंत प्रतीक ठरत आहे. ही ऐतिहासिक व अध्यात्मिक रथयात्रा रविवार, दिनांक ११ जानेवारी २०२६ रोजी श्री हनुमान मंदिर, श्रीक्षेत्र महाजनवाडी येथून सकाळी ९ वा. मंगल प्रारंभ होणार आहे. या रथयात्रेची गुरुवार, दिनांक २६ मार्च २०२६ रोजी, श्रीराम नवमीच्या पावन दिवशी श्रीक्षेत्र अयोध्याधाम येथे सांगता होणार आहे. ही यात्रा म्हणजे केवळ पायांची चाल नव्हे, ही अंत:करणाची ओढ, ही यात्रा म्हणजे केवळ रथाचा प्रवास नव्हे ही आहे श्रीराम नामाची अखंड धारा अशी माहिती भाजपा अध्यात्मिक आघाडीचे बीड जिल्हा संयोजक विष्णुदासजी महाराज यांनी प्रसिध्दी पत्रकाद्वारे दिली आहे.



ही दिंडी व रथयात्रा श्रीरामभक्त विष्णुदासजी महाराज सुरवसे यांच्या पावन आयोजनातून व दृढ संकल्पनेतून साकार होत आहे. केवळ प्रवास नव्हे, तर ही ७५ दिवसांची चालती तपश्चर्या, चालता यज्ञ, चालता नामसंकीर्तन महोत्सव आहे. पायी चालताना प्रत्येक पाऊल रामनामात न्हाऊन निघणार आहे. रथयात्रेच्या वाटेवरील गावोगावी श्रीराम भक्तिरसाचा सुगंध दरवळणार आहे. या नमो श्रीराम नाम रथयात्रेमध्ये श्रीराम नामाचा अखंड नामजप, सायंकाळी मुक्कामाच्या ठिकाणी हनुमान मंदिरामध्ये भावार्थ रामायण कथा संपन्न होणार आहे. सामाजिक एकोपा, व्यसनमुक्ती, सदाचार, राष्ट्रप्रेम, संस्कृती संवर्धन व सनातन मूल्यांचा संदेश या यात्रेच्या माध्यमातून जनमानसात रुजवला जाणार आहे.

महाराष्ट्रासह मध्यप्रदेश, उत्तर प्रदेश या तीन राज्यांमधून पायी प्रवास करत, ही रथायात्रा दिंडी अनेक संतभूमी, तीर्थक्षेत्रे व ग्रामदेवता यांच्या चरणी नतमस्तक होत अयोध्येकडे मार्गस्थ होणार आहे. या ७५ दिवसीय कालावधीत श्रीराम भक्त प्रत्यक्ष सहभाग घेणार असून, लाखो श्रीराम भक्त व भाविकांचे आशीर्वाद व शुभेच्छा रथयात्रेस लाभणार आहेत. तसेच गुरुवार, दिनांक २६ मार्च २०२६ रोजी म्हणजेच श्रीराम नवमी दिवशी श्रीक्षेत्र अयोध्याधाम येथे भव्यदिव्य व ऐतिहासिक 'लक्ष्मण शक्ती मुक्तोत्सव सोहळा संपन्न होणार आहे. या वेळी श्रीराम रामलल्ला दर्शन, भव्य श्रीराम नाम शोभायात्रा, संत–महंतांचे प्रवचन व विशेष धार्मिक कार्यक्रम संपन्न होणार आहेत. अशी माहिती भाजपा अध्यात्मिक आघाडीचे बीड जिल्हा संयोजक विष्णुदास महाराज सुरवसे यांनी प्रसिध्दी पत्रकाद्वारे दिली आहे.

# शरीर, मन आणि आत्मा निरोगी राहण्यासाठी नैसर्गिक जीवनशैलीचा वापर करणे आवश्यक. प्रा.संजय काळे

**तभा वृत्तसेवा**
**बीड दि.१० जानेवारी**

बीड येथील स्वातंत्र्यवीर सावरकर महाविद्यालयाच्या राष्ट्रीय सेवा योजना विभागाचे मौजे आदर्श गाव वंजारवाडी येथे युवक युवती निवासी श्रमसंस्कार शिबिर चालू आहे. या शिबिरामध्ये विविध विषयावर बौद्धिक सत्रे तसेच समाज उपयोगी विविध उपक्रम होत आहेत. दिनांक १० जानेवारी २०२६ रोजी नैसर्गिक जीवन पद्धती निरोगी आरोग्याची गुरुकिल्ली या विषयावर मार्गदर्शन करताना प्रा. संजय काळे म्हणाले की, शरीर, मन आणि आत्मा निरोगी राहण्यासाठी नैसर्गिक जीवनशैलीचा वापर केला पाहिजे. नैसर्गिक जीवनशैलीत संतुलित आहार, पुरेसे पाणी पिणे, नियमित व्यायाम करणे, हे महत्त्वाचे घटक आहेत. नैसर्गिक जीवनशैली आरोग्याची गुरुकिल्ली आहे कारण ती ताजे अन्न, भरपूर पाणी, शारीरिक हालचाल, पुरेशी झोप, सूर्यप्रकाश आणि शुद्ध हवा यांसारख्या नैसर्गिक तत्त्वांचा वापर करते, ज्यामुळे शरीर आणि मनाचे संतुलन राखले जाते,



तणाव कमी होतो आणि दीर्घायुष्य व चैतन्य प्राप्त होते. यामध्ये प्रक्रिया केलेले अन्न टाळावे, निसर्गाशी जोडलेले राहणे आणि शरीराच्या नैसर्गिक लयीनुसार जगणे महत्त्वाचे आहे, ज्यामुळे रोग टाळता येतात आणि आरोग्य सुधारते. याप्रसंगी अध्यक्षीय समारोप करताना प्रा.विशाल नाईकनवरे म्हणाले सकाळचा सूर्यप्रकाश घेतल्याने व ताज्या हवेत फिरल्याने मानसिक आरोग्य चांगले राहते. या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन राष्ट्रीय सेवा योजनेचे स्वयंसेवक चिरंजीव ज्ञानेश्वर बनसोडे यांनी केले. याप्रसंगी राष्ट्रीय सेवा योजनेचे कार्यक्रमाधिकारी प्रा.राजपाल जाधव, प्रा.राम गव्हाणे तसेच दिनप्रमुख प्रमुख डॉ. जे. के. भालेराव, प्रसाद पांडे स्वयंसेवक हिमेश ठोकळ, रितेश जोगदंड, प्रेम मोतुळे, पंकज तरटे, शुभम पांचाळ आधी स्वयंसेवक यांची उपस्थिती होती.

# गुणवत्ता टिकवून ठेवण्यासाठी नवीन तंत्रज्ञानाचा उपयोग करा - माजी मंत्री जयदत्त क्षीरसागर

**तभा वृत्तसेवा**
**बीड दि.१० जानेवारी**

विद्यार्थ्यांनी भविष्यात स्पर्धेचा काळ ओळखून आधुनिक तंत्रज्ञानाचा उपयोग करत उज्वल भविष्य घडविण्याचे प्रयत्न करावेत असे प्रतिपादन माजी मंत्री जयदत्त क्षीरसागर यांनी व्यक्त केले.

सौ.के.एस.के. अन्नतंत्र व कृषि महाविद्यालयाच्या गुणवंत विद्यार्थ्यांच्या सत्कार समारंभाचे आयोजन करण्यात आले होते. यावेळी माजी मंत्री जयदत्त क्षीरसागर, युवा नेते हर्षद क्षीरसागर, सहसचिव गोविंद साळूंके, कृषि महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ.एस.पी. मोरे, अन्नतंत्र महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ.झेड.एच. सय्यद, प्रा.डॉ.एस.टी. शिंदे, प्रा. डॉ. व्ही.बी. तागड, प्रा.पी.जी. पौळ, डॉ.जी.पी. राऊत, प्रा.के.डी. नागरगोजे, प्रा.डॉ.जी.एम.बोडखे, प्रा.डी.ए.मुटकुळे, प्रा.बी.आर. चादर, प्रा.एस.आर.मस्के, प्रा.ए.सी. गार्डी, एल.एम. बोंद्रे आदिंसह सर्व प्राध्यापक व कर्मचारी उपस्थित होते.हैद्राबाद येथील राष्ट्रीय नृत्य स्पर्धेत प्रथम क्रमांक मिळविलेल्या स्नेहा दुधाळ हिचा सन्मान करण्यात आला तर आंतरविद्यापीठ महोत्सवात यश प्राप्त केलेल्या वेदांत स्वामी आणि अमित दळवी तसेच अभिजीत निकम या विद्यार्थ्यांचाही सत्कार करण्यात आला.



या महाविद्यालयाच्या विद्यार्थ्यांची हैद्राबाद येथील राष्ट्रीय एकात्मता शिबीरासाठी निवड झाली. तसेच गिता परजने, वैष्णवी भोंडवे, श्रेया लांब, घोडके सुरेश, मळेकर आशिष आदि विद्यार्थ्यांचाही माजी मंत्री क्षीरसागरांच्या हस्ते सत्कार करण्यात आला.

या वेळी बोलताना माजी मंत्री क्षीरसागर म्हणाले की, अन्नतंत्र व कृषि महाविद्यालयातील विद्यार्थ्यांनी घवघवीत यश मिळवले ही अभिमानाची बाब आहे. आपल्या संस्थेचे नाव उज्वल करणार्या विद्यार्थ्यांना आपण प्रोत्साहन देत असतो. याच विद्यार्थ्यांची प्रेरणा घेऊन यश मिळवावे. विद्यार्थ्यांना भविष्य काळात स्पर्धेच्या युगात टिकवून रहायचे असेल तर गुणवत्तेला प्राधान्य द्यावे लागेल.

# पोटविकार व लिव्हर आजारांवरील उपचारासाठी प्रसिध्द डॉ.अक्षय कुलकर्णी यांची बीडमध्ये विशेष सेवा

**तभा वृत्तसेवा**
**बीड दि.१० जानेवारी**

वाढत्या पोटविकारांच्या पार्श्वभूमीवर बीडमधील एक्सिस ऑर्थोपेडिक हॉस्पिटलने नागरिकांच्या आरोग्यासाठी एक महत्त्वपूर्ण उपक्रम राबविला आहे. या उपक्रमांतर्गत प्रसिद्ध पोटविकार तज्ञ डॉ. अक्षय कुलकर्णी हे मंगळवार,१३ जानेवारी २०२६ रोजी दुपारी २ ते ४ वाजेपर्यंत रुग्ण तपासणीसाठी हॉस्पिटलमध्ये उपस्थित राहणार आहेत.

या विशेष उपक्रमाचा उद्देश पोटविकारांचे लवकर निदान,पोटात किंवा छातीत जळजळ होणे, उलटी आणि संडासमध्ये रक्त पडणे कावीळ असल्यास, लिव्हर सिरोसीस किंवा लिव्हर संबंधी इतर कुठलाही आजार असल्यास ,हिपेटाईटीस बी किंवा हिपेटाईटीस सी चे संक्रमण झाले असल्यास, पित्ताशय किंवा पित्ताशयाच्या नलिकेमध्ये खडे असल्यास, गिळन्यास त्रास होत असल्यास तात्काळ उपचार आणि प्रतिबंधात्मक उपाययोजना याबाबत नागरिकांना प्रभावी मार्गदर्शन करणे हा आहे. रुग्णांनी तपासणीसाठी पूर्वनोंदणी करणे आवश्यक असून यात तज्ञांकडून सल्ला, तपासणी आणि योग्य उपचार पद्धतींबाबत मार्गदर्शन मिळणार आहे.

या संदर्भात, सय्यद हसीब सर यांनी एक्सिस ऑर्थोपेडिक हॉस्पिटल(माने पेट्रोल पंपाच्या मागे, नर्सरी रोड, बीड) तर्फे सर्व नागरिकांना आवाहन केले आहे की, आपल्या आरोग्याची काळजी घ्या आणि या संधीचा अवश्य लाभ घ्या.अधिक माहितीसाठी व पूर्वनोंदणीसाठी ९९२३०१०२०२ या क्रमांकावर संपर्क साधावा.

# नवजीवन ट्रस्ट माजलगाव चा नवीन वर्षाच्या सुरुवातीला अनोखा उपक्रम, एक घास गरजवंतासाठी



**तभा वृत्तसेवा**
**बीड दि.१० जानेवारी**

माजलगाव शहराजवळ असलेल्या नवीन भाटवडगाव येथे नवजीवन ट्रस्ट स्थित आहे या नवजीवन ट्रस्ट च्या माध्यमातून अनेक सामाजिक उपक्रम राबविले जातात जसे की जे लोक गरजवंत आहेत त्यांना मदत करणे असेल अशा अनेक प्रकारच्या कामामध्ये नवजीवन ट्रस्ट महाराष्ट्र भर अग्रेसर आहे मागील तीन वर्षापासून या ट्रस्टने अनेक सामाजिक उपक्रम राबविले आहेत या ट्रस्ट चा मुख्य उद्देश आहे तो म्हणजे गरजवंतासाठी धाऊन जाणे आणि त्यांना होईल तेवढी मदत करणे आजपर्यंत हे काम वेगवेगळ्या ठिकाणी करण्यात आले आहे.

सोलापूर तरुण भारत
www.dainiktarunbharat.com, epaper.dainiktarunbharat.com

# पाणंद रस्ते योजनेचा लाभ घ्यावा– जिल्हाधिकारी गुप्ता

## अठ्ठरवाडी ते जांभरूण आंध या गावांना जोडणाऱ्या कठीण पाणंद रस्त्याची जिल्हाधिकाऱ्यांनी केली पाहणी





**तभा वृत्तसेवा**
**हिंगोली, १० जानेवारी**

शासनाने मुख्यमंत्री बळीराजा शेतकरी पाणंद रस्ते योजना सुरु केली असून या योजनेतून ग्रामीण भागातील शेतरस्ते व पाणंद रस्ते यंत्रसामग्रीच्या सहाय्याने पक्के, बारमाही व १५ फुट रुंदीचे करण्यात येणार आहेत. या योजनेमुळे शेतमाल वाहतूक सुलभ होणार असून शेता–तील अतिक्रमणांचे प्रश्नही मार्गी लागणार आहेत. त्यामुळे शेतकऱ्यांनी मुख्यमंत्री बळीराजा शेतकरी पाणंद रस्ते योजनेचा लाभ घ्यावा, असे आवाहन जिल्हाधिकारी राहुल गुप्ता यांनी जनता दरबार कार्यक्रमात केले.

हिंगोली तालुक्यातील वैजापूर, अठ्ठरवाडी, जांभरुण (आंध), जांभरुण तांडा व पहेनी या गावांमध्ये आयोजित जनता दरबार व मुख्यमंत्री समृद्ध ग्रामपंचायत अभियान कार्यक्रमात ते बोलत होते. यावेळी अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी, सहायक जिल्हाधिकारी तथा गटविकास अधिकारी योगेशकुमार मीना, जिल्हा ग्रामीण विकास यंत्रणेचे प्रकल्प संचालक नामदेव केंद्रे, उप मुख्य कार्यकारी अधिकारी (पंचायत) केशव गड्डापोड, उप मुख्य कार्यकारी अधिकारी (महिला व बालकल्याण) विजय बोराटे, उप मुख्य कार्यकारी अधिकारी (पाणीपुरवठा व स्वच्छता) संजय कुलकर्णी, जिल्हा आरोग्य अधिकारी डॉ. कैलाश शेळके, शिक्षणाधिकारी (मा.) संदीपकुमार सोनटक्के, तह–सीलदार श्रीकांत भुजबळ, वनसंरक्षक मिनाक्षी पवार यांच्यासह तालुकास्तरीय अधिकारी व कर्मचारी उपस्थित होते.

नागरिकांशी संवाद साधताना जिल्हाधिकारी श्री. गुप्ता म्हणाले की, शेतकऱ्यांनी ॲग्रीस्टॅक नोंदणी करून फार्मर आयडी तातडीने तयार करून घ्यावी. शेतीसंबंधी सर्व योजनांचा लाभ घेण्यासाठी फार्मर आयडी बंधनकारक असून सर्व लाभ थेट डीबीटीद्वारे घरपोच मिळणार आहेत. त्यामुळे कार्यालयात हेलपाटे मारण्याची गरज भासणार नाही. तसेच रेशन धान्यासाठी ई–केवायसी, अतिवृष्टी व विविध योजनांचे अनुदान मिळण्यासाठीही ई–केवायसी पूर्ण करावी, असे त्यांनी सांगितले.




यावेळी मागेल त्याला सौर पंप, जलजीवन मिशन, पाणंद रस्ते, जलतारा, बचत गट लखपती दीदी, विविध योजनांची बँक कर्ज प्रकरणे, वन्य प्राण्यांचा बंदोबस्त आदी बाबींचा आढावा घेण्यात आला. संबंधित गावातील नागरिकांच्या समस्या व तक्रारी जाणून घेऊन त्यांची निवेदने स्वीकारण्यात आली तसेच त्या त्वरित निकाली काढण्याच्या सूचना संबंधित अधिकाऱ्यांना देण्यात आल्या. दौऱ्यादरम्यान जिल्हाधिकारी राहुल गुप्ता यांनी अठ्ठरवाडी व जांभरुण (आंध) येथील जिल्हा परिषद शाळांना भेट देऊन विद्यार्थ्यांची गुणवत्ता तपासली. विद्यार्थ्यांच्या गणित, मराठी व इंग्रजी विषयातील अध्ययनाचा आढावा घेतला. तसेच जांभरुण (आंध) तांडा येथील संत नामदेव निवासी आदिवासी आश्रम शाळेला भेट देऊन विद्यार्थ्यांची गुणवत्ता व निवास व्यवस्थेची माहिती घेतली. याशिवाय पुसेगाव येथील सर्वज्ञतीर्थ भगवान बाहुबली यांच्या सर्वात उंच पुतळ्याच्या कामाची पाहणी करण्यात आली. जांभरुण तांडा येथील आयुष्यमान भारत आरोग्य वर्धिनी केंद्रास भेट देवून तेथील कामकाजाची व अभिलेख्याची, आरोग्य सुविधेची तपासणी केली. तसेच अठ्ठरवाडी ते जांभरुण (आंध) या गावांना जोडणाऱ्या कठीण पाणंद रस्त्याची तहसीलदारांच्या वाहनातून प्रत्यक्ष पाहणीही जिल्हाधिकाऱ्यांनी केली.

वरील सर्व गावांमध्ये आयोजित जनता दरबार कार्यक्रमात नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## काँग्रेस पक्षाचे जिल्हाधिकारी कार्यालयासमोर निदर्शने

**तभा वृत्तसेवा**
**हिंगोली, १० जानेवारी**




महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजना पूर्वीप्रमाणे चालू ठेवण्यात यावी तसेच योजनेचे महात्मा गांधी यांचे नाव बदलण्यात येऊ नये या मागणीसाठी दि १० जानेवारी रोजी काँग्रेस पक्षाच्यावतीने जिल्हाधिकारी कार्यालयासमोर निदर्शने करीत जिल्हाधिकारी राहुल गुप्ता यांना मागण्यांचे निवेदन सादर करण्यात आले.

येथील जिल्हाधिकारी कार्यालयासमोर शनिवारी काँग्रेस पक्षाच्या पक्ष निरीक्षक, प्रभारी यांच्यासह पदाधिकाऱ्यांनी केंद्र सरकार विरोधात जोरदार निदर्शने केली. यावेळी पदाधिकाऱ्यांनी केंद्र सरकारवर सडकून टीका केली.

त्यानंतर सादर केलेल्या निवेदनात केंद्र सरकारच्यावतीने मनरेगा योजनेचे नाव बदलून योजनेचे निकष बदलण्यात आले आहे. यामुळे राज्य शासनावर मोठ्या प्रमाणात आर्थिक भार पडणार आहे. परिणामी योजनेची पूर्णपणे अंमलबजावणी होणार नाही. तसेच रोजगार निर्माण न होता बेरोजगारी वाढणार आहे. सदरील योजना गोरगरीब, कष्टकरी, रोजंदारी व मजूर यांच्यासाठी राबविण्यात येत असून या योजनेच्या नावात बदल करण्यात येऊ नये अशी मागणी निवेदनात करण्यात आली आहे. यावेळी जिल्हा प्रभारी साहेबराव कांबळे, नागसेन बिरजे, सचिव रेहाना चिस्ती, जिल्हाध्यक्ष सुरेशअप्पा सराफ, डॉ सतीश पाचपूते, जक्की कुरेशी, गजानन देशमुख, विनायकराव देशमुख, शामराव जगताप, डॉ रमेश शिंदे, डॉ नीळकंठ गडदे, मिलींद उबाळे, बापूराव पाटील, साईनाथ जाधव आदींसह पदाधिकारी व कार्यकर्ते उपस्थित होते.




**हिंगोली– हिंगोली येथे अखिल भारतीय विद्यार्थी परिषदेचे ६० वे प्रांत अधिवेशन दि २३ ते २५ जानेवारी या कालावधीत होणार असून या अधिवेशासाठी विविध समित्यांची स्थापना करण्यात आली असून अधिवेशनासंदर्भात माहीती देतांना विद्यार्थी परिषदेचे पदाधिकारी तसेच आ तान्हाजीराव मुटकुळे, भाजपचे जिल्हाध्यक्ष गजाननराव घुगे, पंकज जोशी, प्रद्युम्न गिरीकर आदींची उपस्थिती होती. छाया– विजय गुंडेकर**

## संक्षिप्त वृत्त

### सावित्रीबाई फुले जयंती साजरी



हिंगोली– येथील ॲड. ग्यानबारावजी शिरसाट संस्थेच्या अंतर्गत असणाऱ्या राष्ट्रमाता जिजाऊ विद्यानिकेतन मध्ये समाजसुधारिका व पहिल्या महिला शिक्षिका क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले यांची जयंती मोठ्या उत्साहात साजरी करण्यात आली. कार्यक्रमाच्या सुरुवातीस सावित्रीबाई फुले यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले. या कार्यक्रमात प्रसंगी शाळेच्या मुख्याध्यापक बल्लाळ सावित्रीबाई फुले यांच्या कार्याचा आढावा घेत विद्यार्थ्यांना शिक्षणाचे महत्त्व सांगितले. तसेच स्त्री सक्षमीकरणाचा संदेश देत उपस्थितांनी सावित्रीबाई फुले यांच्या विचारांची अंगीकार करण्याचा संकल्प केला. विद्यार्थ्यांनी भाषणे कविता व नाट्यप्रसंग सादर करून सावित्रीबाई फुले यांच्या संघर्षमय जीवनावर प्रकाश टाकला. हा कार्यक्रम प्रेरणादायी वातावरणात पार पडला. कार्यक्रम साठी शाळेतील शाळेचे मुख्याध्यापक बल्लाळ, कान्हेड, चाटसे, वाबळे, पडघन, कान्हेड, सोळंके, ठोके, टेकाळे कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी इमरान भैया व नरवाडे ताईंनी पुढाकार घेतला.

### टाकळी येथे कबड्डी स्पर्धाचे आयोजन

हिंगोली– टाकळी ता. जि. हिंगोली येथे टाकळी(शेवंता देवी) ग्रामस्थांच्या वतीने अखंडितपणे कबड्डी स्पर्धांचे आयोजन करण्यात येत आहे. हिंगोली जिल्हा कबड्डी असोसिएशनच्या मान्यतेने पुरूष कबड्डीचे सामने आयोजित करण्यात आले आहेत. पुरुष गट कबड्डी स्पर्धा दिनांक १८ जानेवारी २०२६ रोजी संपन्न होणार आहेत. एक गाव एक संघ या अटीवर प्रथम प्राधान्याने घेण्यात येतील. प्रथम सहभागी होणाऱ्या १६पुरूष संघांनाच प्रवेश दिला जाईल. पुरुष गट कबड्डी स्पर्धा या दि १८ जानेवारी २०२६ रोज रविवारला असून सकाळी दहा वाजता स्पर्धेचा उद्घाटन सोहळा संपन्न होणार आहे. या स्पर्धेत प्रथम बक्षिस रू. २१००० के. आबाराव देशमुख यांच्या स्मरणार्थ अँड सतीश देशमुख वतीने, द्वितीय बक्षिस रु. १५००० के. दगडुजी इंगळे माली पाटील यांच्या स्मरणार्थ डॉ. शेखर उत्तमराव इंगळे वतीने, तृतीय बक्षिस रु. ११००० कै. दुलाजी कुहाडे यांच्या स्मरणार्थ डॉ. किरण कुहाडे, च्यावतीने , चतुर्थ बक्षिस ११,००० कै. चंपतराव बेंगाल यांच्या स्मरणार्थ श्री भगवान वेंगाळ यांच्या वतीने विजेत्या संघाला दिले जाणार आहेत. स्पर्धा प्रवेश फिस रू. ५०० स्पर्धेच्या दिवशी सकाळी ११ वाजेपर्यंत तर ७०० दु.१वाजेपर्यंत स्विकारल्या जाईल. कबड्डी स्पर्धा महाराष्ट्र राज्य असोसिएशनच्या नियमानुसार खेळविण्यात येतील. स्पर्धा यशस्वी करण्यासाठी टाकळी ग्रामस्थ व हिंगोली जिल्हा कबड्डी असोसिएशन यांचे पदाधिकारी परिश्रम घेत आहेत.

## लोकसंघच्यावतीने सावित्रीबाई फुले जयंती साजरी




**तभा वृत्तसेवा**
**हिंगोली, १० जानेवारी**

लोकसंघ– सोशल एज्युकेशन मुव्हमेंट जिल्हा युनिटच्यावतीने सावित्रीमाई फुले यांच्या १९५ व्या जयंतीनिमित्त स्वयंदीप प्रकल्प, अशोका पार्क हिंगोली येथे पुरस्कार वितरण, व्याख्यान व विविध कार्यक्रमाचे आयोजन केले होते. अध्यक्षस्थानी वर्षाताई पाटील तर उद्घाटिका म्हणून ॲड.संगीता चाटसे यांची उपस्थिती होती. प्रमुख पाहुणे म्हणून मधुकर मस्के व्याख्याते ॲड .सुरेश भोसले हे उपस्थित होते.

यावेळी ज्योतीबा फुले व सावित्रीमाई फुले यची शैक्षणिक–सामाजिक क्रांती आणि भारतीय संविधान या विषयावर ते प्रमुख व्याख्याते म्हणून संवादात्मक व्याख्यान देताना म्हणाले की, देशातील लोकांना केवळ शिक्षण असून चालत नाही, संविधान साक्षरता चळवळ सुद्धा राबविली गेली पाहिजे देशामध्ये दिवसेंदिवस अज्ञान, अंधश्रद्धा, जातीयतेचा आणि विषमतेचा अंधकार वाढत चालला आहे परंतु देशातील लोकांना मात्र याविषयी प्रश्न पडत नाहीत आणि ज्या लोकांना प्रश्न पडत नाहीत त्या लोकांची गुलामीकडे वाटचाल चालू झालेली असते भारत देश पूर्वीपासून वेगवेगळ्या प्रकारच्या गुलामीत राहिलेला आहे, असे प्रतिपादन सुरेश भोसले यांनी केले. या प्रसंगी बबनराव गायकवाड, विजय मानकर, यादव गायकवाड, सुनिता गवई, भास्कर लांडगे, बाबुराव नरवाडे यांना सावित्रीबाई फुले आदर्श शिक्षक पुरस्काराने डॉ. रामदास धांडे बबनराव मोरे, सुनीताताई जमधाडे, सरस्वतीताई साबळे, प्रदीप इंगोले तलाठी, सुरेशआप्पा येस्के, सदानंद कांबळे, प्रणाली खिल्लारे यांना राष्ट्रपिता ज्योतिबा फुले समाजरत्न पुरस्काराने सन्मानित करण्यात आले. याप्रसंगी रतन सपकाळ, हिरामण शृंगारे, प्रकाश धाबे यांनी सर्वधर्मीय बहुउद्देशीय सेवाभावी स्वयंदीप' महाप्रकल्पाला सर्वसुविधायुक्त दालन स्वखर्चाने बांधून देण्याचा संकल्प केल्याने त्यांच्या सपत्नीक सन्मान करण्यात आला.

कार्यक्रमाचे सूत्रसंचालन सदाशिव चाटसे यांनी केले तर संतोष सदावर्ते यांनी आभार मानले. कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी लोकसंघच्या पदाधिकाऱ्यांनी परिश्रम घेतले.

## काँग्रेस कार्यकारणीची आढावा बैठक



**तभा वृत्तसेवा**
**हिंगोली, १० जानेवारी**

येथील सराफ लॉज येथे शनिवार दि १० जानेवारी रोजी काँग्रेस पक्षाच्या कार्यकारणीची आढावा बैठक घेण्यात आली.

यावेळी माजी मंत्री तथा मराठवाडा सहप्रभारी रेहाना चिस्ती यांची प्रमुख उपस्थिती होती. जिल्ह्यात काँग्रेसचे संघटन मजबुत करणे तसेच आगामी जिल्हा परिषद व पंचायत समिती निवडणुकांबाबत बैठकीत आढावा घेण्यात आला. यावेळी जिल्हा प्रभारी कल्याण दळे, सह प्रभारी साहेबराव कांबळे, जिल्हाध्यक्ष सुरेशअप्पा सराफ, नागसेन बिरजे, डॉ सतीश पाचपूते, विनायकराव देशमुख, गजानन देशमुख, शामराव जगताप, शहराध्यक्ष मिलींद उबाळे, नगरसेवक आरीफ लाला, डॉ रमेश शिंदे यांच्यासह पदाधिकारी व कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## रासेयोच्या वार्षिक विशेष शिबीरामध्ये रक्तक्षय तपासणी




**तभा वृत्तसेवा**
**हिंगोली, १० जानेवारी**

खानापूर चित्ता येथे स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ नांदेड, यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठ केंद्र नाशिक व शिवाजी महाविद्यालय हिंगोली येथील राष्ट्रीय सेवा योजनेच्या विशेष वार्षिक निवासी युवक शिबिरामध्ये युवक, युवती, शाळेतील शिक्षकवृंद, विद्यार्थी, विद्यार्थिनी व ग्रामस्थांच्या रक्ताची तपासणी करण्यात आली. यावेळी रक्तक्षय तपासणी जिल्हा रुग्णालय हिंगोली येथील वरिष्ठ जिल्हा व्यवस्थापक डॉ. शुभम घुगे, लॅब टेक्निशियन निलेश देवकर, योगेश सावळे यांनी उपस्थित असलेल्या सर्वांची सीबीसी, एलएफटी, केएफटी, टीएफटी आदी रक्ताची तपासणी केली आहे. डॉ. घुगे यांनी यावेळी विद्यार्थ्यांना रक्त तपासणी किती आवश्यक आहे यावर सविस्तर सखोल मार्गदर्शन केले. राष्ट्रीय सेवा योजना कार्यक्रमाधिकारी डॉ. किशोर इंगोले, डॉ. श्रीराम कऱ्हाळे, डॉ. राम भाकरे, प्रा. आशिष इंगळे, प्रा. संजय चव्हाण, महिला प्रतिनिधी डॉ. मनीषा गवळी, डॉ. सुनंदा भुसारे, प्रा. नीलम काळे, प्रा. प्रियंका पवार, सुनील राठोड आदी उपस्थित होते.

## जिल्ह्यात दोन ठिकाणी जुगार अड्डयावर धाडी, गुन्हे दाखल



**तभा वृत्तसेवा**
**हिंगोली, १० जानेवारी**

जिल्ह्यात रेडगाव आणि वाखारी या दोन ठिकाणी जुगार अड्ड्यावर पोलिसांनी धाडी टाकल्या असून ६ दुचाकी, २ मोबाईलसह ३ लाख ९४ हजारांचा मुद्देमाल जप्त केला आहे. याप्रकरणी १८ जणांवर गुन्हे दाखल करण्यात आले आहेत.

पोलिस अधीक्षक नीलभ रोहन यांनी जिल्ह्यातील अवैध धंद्याविरोधात जोरदार मोहीम उघडली असून आखाडा बाळापूर पोलिस ठाण्यांतर्गत रेडगाव येथे झन्नामन्ना नावाचा जुगार सुरू असल्याची माहीती मिळताच पोलिस निरीक्षक विष्णुकांत गुठ्ठे यांच्या पथकाने धाड टाकली. यावेळी सहाजण जुगार खेळत असल्याचे आढळून आले त्यापैकी दोघे फरार झाले. घटनास्थळावरून रोख रक्कम, तीन दुचाकी, दोन मोबाईल असा २.२६ लाखांचा मुद्देमाल जप्त केला आहे तसेच वसमत ग्रामीण पोलिस ठाण्याचे सपोनि विजय बोराटे यांच्या पथकाने वाखारी शिवारात जुगार अड्डयावर छापा टाकला. पोलिसांनी घटनास्थळावरून तीन दुचाकी व रोख रक्कम असा १.६० लाखांचा मुद्देमाल जप्त केला आहे. याप्रकरणी १८ जणांवर गुन्हे दाखल करण्यात आले आहेत.

# काँग्रेसचा जाहीरनामा कॉपी- पेस्ट तर राष्ट्रवादीच्या जाहीरनाम्यात भुलथापा



**तभा वृतसेवा**
**नांदेड, दि. १० जानेवारी-**

जाहीरनाच्या माध्यमातून पक्षाची भूमिका मांडायची असते परंतु नांदेडमध्ये मात्र काँग्रेसच्या जाहीरनाम्यात भाजपाची कॉपी पेस्ट करण्यात आली तर राष्ट्रवादीच्या जाहीरनाम्यातुन केवळ भुलथापा देण्यात आल्याचा आरोप माजी मंत्री डी. पी. सावंत यांनी पत्रकार परिषदेत केला.

भारतीय जनता पार्टीने १ जानेवारी रोजी जाहीरनामा प्रकाशित केल्यानंतर या जाहीरनाम्यावरून वैयक्तिकरित्या खासदार अशोक चव्हाण यांच्यावर टीका करण्यात आली. राजकीय स्तर घसरला असल्याचे दिसून आले. भाजपाच्या जाहीरनाम्यात केलेली कामे आणि करायची कामांचा लेखाजोखा आहे. विकासाबाबत पक्षाची भूमिका मांडण्यात आली आहे. हा जाहीरनामा राज्यात एक क्रमांकावर जात असताना यावरच टीका करण्यात येत आहे. दुसरीकडे काँग्रेस पार्टीने भाजपाच्या जाहीरनाम्याची कॉपी केली आहे. मनोगततला एक ना एक शब्द कॉपी केला आहे. त्यामुळे या काँग्रेसच्या जाहीरनामावर विश्वास किती ठेवायचा असा प्रश्न शहरातील जनतेला पडला आहे. तर दुसरीकडे राष्ट्रवादी काँग्रेसच्या जाहीरनामा कमी आणि शिमगा जास्त अशी परिस्थिती आहे. १६ पैकी सहा पानावर माजी मुख्यमंत्री अशोक चव्हाण यांच्यावर टीका करण्यात आली तर अनेक चुका देखील यात करण्यात आल्या आहेत. पिंपरी चिंचवड व्हिजन असे दाखवून त्या ठिकाणी शांघायचा फोटो लावण्यात आला आहे. जाहीरनाम्याच्या माध्यमातून खासदार अशोक चव्हाण यांच्यावर टीका करण्यात आली असून विकासाचे कुठलेही विजन नाही. राष्ट्रवादीच्या जाहीरनामामध्ये केवळ भुलथापा असून या जाहीरनामावर संक्रात येणार असल्याचे यावेळी माजी मंत्री डी. पी. सावंत म्हणाले.

या पत्रकार परिषदेस भाजपाचे उत्तर ग्रामीण जिल्हाध्यक्ष किशोर देशमुख, प्रदेश सदस्य चेतन्यबापू देशमुख, अभिजीत देशमुख संतोष पंडागळे, निलेश देशमुख, शितल खांडील आदींची उपस्थिती होती.

# मुदखेडच्या उपनगराध्यक्षपदाची लॉटरी कोणाला ?

**तभा वृतसेवा**
**मुदखेड, दि. १० जानेवारी-**



नगराध्यक्षपदी विश्रांती माधव कदम विराजमान झाले असून आता उपनगराध्यक्षपदी कोणाची वर्णी लागणार याची उत्सुकता शीगेला पोहोचली आहे . या पदासाठी शहराध्यक्ष रामसिंग चव्हाण, नवनिर्वाचित नगरसेवक इम्रान मच्छीवाले ,संजय आऊलवार, श्याम चंद्रे इच्छुक असून लॉटरी कोणाला लागणार याकडे लक्ष लागले आहे. राज्यसभा खासदार तथा भाजपा नेते अशोक चव्हाण , आमदार श्रीजया चव्हाण तुमच्या शिक्का मोर्तब नंतर बंद पॅकेट मध्ये कोणाचे नाव येणार हेच पहावे लागणार आहे .

नगरपरिषद निवडणुकीत २० पैकी भाजपचे १४ नगरसेवक व नगराध्यक्ष निवडून आले असून स्पष्ट बहुमत मिळाले आहे. भाजपा गटनेतेपदी सुनील शेट्टे यांची नुकतीच निवड करण्यात आली आहे. उपनगराध्यक्ष पदाची निवड दि.१३ जानेवारी रोजी करण्याचा मुहूर्त ठरला आहे. उपनगराध्यक्ष पदासाठी शहराध्यक्ष रामसिंग चव्हाण इच्छुक असून माजी आमदार अमर राजूरकर यांचे ते विश्वासू म्हणून ओळखले जातात. पक्ष संघटनेची जबाबदारी त्यांच्यावर असून उपनगराध्यक्ष पदाची जबाबदारी सोपवून शहर विकासाला प्राधान्य देण्यासाठी पक्षश्रेष्ठी यांच्या नावाचा विचार करू शकते. या निवडणुकीत मुस्लिम मतदारांनी भाजप चेहऱ्याला पसंदी दिली असून गेल्या पंधरा वर्षापासून सातत्याने इम्रान मच्छीवाले नगरसेवक पदाच्या माध्यमातून लोकसेवेचे कार्य करत आहेत. याशिवाय अशोकराव चव्हाण यांचे कट्टर समर्थक म्हणून त्यांची ओळख असून मुस्लिम समाजाला प्रतिनिधित्व देण्याचा विचार झाल्यास इम्रान मच्छीवाले यांची लॉटरी लागू शकते. नवनिर्वाचित नगरसेवक संजय आऊलवार उपनगराध्यक्ष पदाच्या शर्यतीत असून व्यापारी चेहरा म्हणून समोर आल्यास खासदार अशोक चव्हाण यांच्या बंद पाकीट मधून यांचे नाव येऊ शकते. समाजकार्यात अग्रेसर असलेले नवनिर्वाचित नगरसेवक श्याम चंद्रे यांनी पंधरा वर्षाच्या कार्यकाळात स्वतःच्या प्रभागात स्वखर्चातून सार्वजनिक उपक्रम राबवून एक वेगळीच छवी निर्माण केली आहे. गेल्या पंचवार्षिक निवडणुकीतही त्यांची उपनगराध्यक्ष पदाची संधी हुकली असून खासदार अशोक चव्हाण यांचे विश्वासू असल्याने त्यांना उपनगराध्यक्ष पदाची संधी मिळू शकते.

नगरपरिषदेत दोन भाजप कार्यकर्त्यांना स्वीकृत सदस्य पदाची संधी मिळणार आहे. भाजप पक्षाकडून अनेक जणांना निवडणूक काळात स्वीकृत सदस्य पदाचे आश्वासन देण्यात आले आहे. या पदासाठी राम आबादार, ईश्वर पिनलवार,किशोर पारवेकर,ऋषिकेश पारवेकर, कुणाल चौदंते,कपील लोखंडे,

यांच्यासह अनेक जण इच्छुक आहेत. भाजप नेत्यांचे उंबरवटे झिजवत असून स्वीकृत सदस्य पदी वर्णी लागावी यासाठी फिल्डिंग लावत आहेत. या पदासाठी ईश्वर पिनलवार,पारवेकर बंधू, राम आबादार यांच्या नावाची चर्चा ऐकाव्यास मिळत आहे. उपनगराध्यक्ष पदाची तसेच स्वीकृत सदस्याची निवड राज्यसभा खासदार अशोक चव्हाण आमदार श्रीजया चव्हाण यांच्या सिक्का मोर्तब नंतर होणार असल्याने नेमकी लॉटरी कोणाची लागणार याची उत्सुकता सर्वांना लागली आहे.



**नांदेड - प्रभाग क्रमांक १२ मधील अपक्ष उमेदवार रुकसाना बेगम यांच्या प्रचारार्थ खुदबईनगर चौरस्ता येथून रॅली काढण्यात आली. देगलूर नाका, उमर कॉलनी या ठिकाणी अनेक लोकांनी आशीर्वाद दिला व कामासाठी असंच माणूस पाहिजे म्हणून आश्वासनही दिला या लोकांची चांगली साथ मिळाली.**

## भाजपाच्या तालुका अल्पसंख्यांक कार्याध्यक्षपदी प्रा. सय्यद समदानी

**नरसी** -भारतीय जनता पार्टीच्या नायगाव तालुका अल्पसंख्यांक विभागाच्या कार्याध्यक्षपदी प्रा. सय्यद समदानी रबानी शेळगावकर यांची नियुक्ती करण्यात आली आहे. या नियुक्तीचे अधिकृत पत्र तालुका अध्यक्ष श्रीहरी देशमुख यांनी त्यांना दिले. या प्रसंगी आमदार राजेश पवार, माजी जिल्हा परिषद सदस्य पुनम पवार, प्रा.डॉ. मनोहर तोटरे , बाबासाहेब हंबर्डे, परमेश्वर पाटील धानोरकर, साहेबराव हेंडगे, माधव घाटोळे,गणेश कंदुरके, श्रीराम पाटील सुगावे, मारोती कदम खंडगावकर,अनिल गिरी बोरगाव, राजू जाधव कांमरसपळीकर यांच्यासह पदाधिकारी, कार्यकर्ते उपस्थित होते. प्रा. समदानी सय्यद शेळगावकर यांच्या सामाजिक व शैक्षणिक कार्याची दखल घेऊन ही जबाबदारी देण्यात आल्याचे पक्षाकडून सांगण्यात आले. नवीन जबाबदारी स्वीकारताना प्रा. समदानी सय्यद शेळगावकर यांनी पक्षाच्या ध्येय-धोरणांना सर्वसामान्यांपर्यंत पोहोचवण्यासाठी व संघटन मजबूत करण्यासाठी सक्रिय योगदान देण्याचा विश्वास व्यक्त केला. त्यांच्या निवडीचे नायगाव तालुक्यात सर्वत्र अभिनंदन होत आहे.



## प्रभाग २० मध्ये कमळाची चर्चा

**नवीन नांदेड**-नांदेड महानगरपालिका सार्वत्रिक निवडणुकांची रणधुमाळणी आता चांगलीच रंगली असून प्रभाग २० मध्ये कमळाची चर्चा कमळफुलनार तर अनुसूचित जाती महिला प्रवर्गातून अटीतटीच्या प्रचारात शक्ती प्रदर्शन चालू असून यामध्ये तिरंगी लढतील कमळच फुलनार असे चित्र दिसून येते. सिडको हडको प्रभाग २० मध्ये रणधुमाळी जोरात चालु आसुन विकासाच्या मुद्यावर जोरादार प्रचार चालू आसुन सर्वच उमेदवार आपापले नशीब आजमावत आहेत.यामध्ये अनुसूचित जाती महिला या प्रवर्गातून भारतीय जनता पार्टी कडून निरंजना लांडगे, वंचित बहुजन आघाडी युती काँग्रेस कडून दीपमाला गायकवाड व राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी कडून संघमित्रा कांबळे यांच्या सह अन्य काही महिला आपले नशीब आजमावत आहेत. तेव्हा यामध्ये मतांचे विभाजन होऊन तिरंगी लढत होईल व त्यातच भारतीय जनता पार्टीचे उमेदवार निरंजना लांडगे या महिला बाजी मारतील असे चित्र दिसून येत आहे. या अटीतटीच्या निवडणुकीत वंचित बहुजन आघाडी, राष्ट्रवादी काँग्रेस व भारतीय जनता पार्टी यांच्या तिरंगी लढत होऊन समाज बांधवांच्या मतांची विभाजन झाल्याने याचा फायदा भारतीय जनता पार्टीस होईल आसे दिसुन येते. समाजाचे मतदान अधिक पक्षाचे मतदान असा फायदा भाजपाला होईल तर वंचित बहुजन आघाडीला पक्ष आणि समाज बांधव यांच्या मतामध्ये अधिक इतर मतदान होत नसल्याने व काही बाकीचे मतदान विभाजन करून राष्ट्रवादी काँग्रेसला जाईल व परिणामी याचा फायदा भारतीय जनता पार्टी होऊन या प्रभागात कमळ फुले असे चित्र दिसून येते. याठिकाणी प्रतिस्पर्धी पक्षांचे उमेदवार सक्षम व कार्यक्षम नसल्याने भारतीय जनता पार्टी बाजी मारेल व पॅनलचे पाचही उमेदवारांचे कमळ फुलण्याची दाट शक्यता मतदारातून वर्तविले जात आहे.



**नांदेड- प्रभाग क्र. १६ वजीराबाद हनुमानपेठ गाडीपुरा मधील शिवसेना अधिकृत उमेदवार अक्षय भानुसिंह रावत ,मीना गंगाबिशन कांकर, योगिता गजेंद्रसिंह ठाकूर, स. दिलीपसिंघ सोडी यांच्या प्रचाराला नागरिकांचा सकारात्मक व उत्स्फूर्त प्रतिसाद मिळत आहे.**

## नरसीत डे-नाईट क्रिकेट स्पर्धा

**तभा वृतसेवा**
**नरसी, दि. १० जानेवारी-**

गतवर्षीप्रमाणे यंदाही नरसी येथे डे-नाईट क्रिकेट सामन्यांची उत्साहपूर्ण मेजवानी क्रिकेटप्रेमींसाठी सज्ज झाली आहे. हजरत सय्यद खाकीसाब वली ऊरसा निमित्ताने आयोजित करण्यात आलेली भव्य डे-नाईट क्रिकेट स्पर्धा येत्या १२ जानेवारीपासून नायगाव रोडवरील गांधी नगर येथील भव्य मैदानावर सुरू होत आहे.

या स्पर्धेत प्रथम पारितोषिक ३३,३३३ रुपये (हाजी मैनोद्दिन कुरेशी), द्वितीय पारितोषिक २२,२२२ रुपये (ग्रीन स्टार मोबाईल शॉप), तृतीय पारितोषिक ११,१११ रुपये (लाला कुरेशी) तर चतुर्थ पारितोषिक ५,५५५ रुपये (भारत मेडिकल) ठेवण्यात आले आहे. याशिवाय बेस्ट हॅट्रिक, मॅन ऑफ द सिरीज, फायनल मॅन ऑफ द मॅच यांसह उत्कृष्ट कामगिरी करणाऱ्या खेळाडूंना आकर्षक बक्षिसे देण्यात येणार आहेत. ही स्पर्धा एम. के. फायटर्स क्लब यांच्या वतीने आयोजित करण्यात आली आहे.

## माहूरला आज सहजयोग ध्यान कार्यक्रमाचे आयोजन

**तभा वृतसेवा**
**माहूर, दि. १० जानेवारी-**

निर्मला देवी यांनी सुरू केलेल्या सहजयोग नामक ध्यान पद्धतीचा सराव शिकवला जातो, अशा सुख समाधान शांतीचा आजचा महान योग या कार्यक्रमाचे निःशुल्क आयोजन सहजयोग ध्यान केंद्र, माहूरच्या वतीने आज रविवार दि. ११ जानेवारी रोजी सायंकाळी ०६:३० वाजता शहरातील जिनीयस इंग्लिश मिडीयम स्कूलच्या भव्य मैदानावर करण्यात आले आहे.

सहजयोग ध्यान कार्यक्रमात कुंडलिनी जागरण आणि आत्मसाक्षात्कार यावर भर दिला जातो, ज्यामुळे मानसिक शांती, भावनिक संतुलन आणि आध्यात्मिक विकास साधता येतो. या वर्गाचे आयोजन मोफत असून, स्वयंसेवकांच्या वतीने करण्यात आले आहे. जे लोकांना त्यांच्या आंतरिक ऊर्जेचा अनुभव घेण्यासाठी मदत करतात.

सहजयोग ध्यान केंद्रांची वैशिष्ट्ये म्हणजे या ध्यानात शरीरातील सुप्त कुंडलिनी शक्ती जागृत करून ती मुख्य ऊर्जा चॅनेलमधून (सुषुम्ना नाडी) वर नेली जाते.या प्रक्रियेतून व्यक्तीला स्वतःच्या खऱ्या स्वरूपाची जाणीव होते, ज्याला आत्मसाक्षात्कार म्हणतात.मनात कोणतेही विचार नसतानाची शांत अवस्था प्राप्त करणे हे सहज योगाचे उद्दिष्ट आहे, ज्यामुळे गहन विश्रांती मिळते. सहजयोग केंद्रे जगभरात मोफत ध्यान वर्ग चालवतात, कारण सत्य विकता येत नाही, असे ते मानतात.

या ध्यान पद्धतीमुळे मानवाचे तणाव कमी होतो, भावनिक समस्या दूर होतात आणि मानसिक व शारीरिक आरोग्य सुधारते.

थोडक्यात, सहजयोग ध्यान केंद्र हे आत्म-शोधासाठी आणि आंतरिक शांती मिळवण्यासाठी एक व्यासपीठ आहे, जिथे प्राचीन योग आणि ध्यान तंत्रांचा वापर करून आध्यात्मिक जागृती साधता येते. या कार्यक्रमाचा लाभ घ्यावा असे आवाहन आयोजकांनी केले आहे.

## उपनगराध्यक्षपदी अनुप अंकुशकर तर उमेश बिलोलीकर, अखिल सिद्दीकी स्वीकृत सदस्य

**तभा वृतसेवा**
**बिलोली, दि. १० जानेवारी-**



नगरपरिषदेच्या उपाध्यक्ष व दोन स्विकृत सदस्यांची आज निवड करण्यात आली. उपाध्यक्षपदी मराठवाडा जनहित पार्टीचे अनुप यांची अंकुशकर बिनविरोध तर स्विकृत सदस्य म्हणून उमेश उर्फ भाऊ बिलोलीकर व मोहमद अखिल सिद्धीकी मोहमद खलील या दोघांची निवडून करण्यात आली. बिलोली नगरपरिषदेचे ९ जानेवारी रोजी नगरपरिषदेच्या सभागृहात उपाध्यक्ष व दोन स्विकृत सदस्यांची निवड प्रक्रिया पार पडली. यात मराठवाडा जनहित पार्टीचे नगराध्यक्ष व १४ नगरसेवकांसह १ अपक्ष असे १६ तर विरोधी पक्षाचे ५ असे पक्षीय बलाबल होते. यामुळे मराठवाडा जनहित पार्टी कडून अनुप अंकुशकर यांचा उपाध्यक्ष पदासाठी एकमेव अर्ज आल्यामुळे त्यांची बिनविरोध निवड घोषित करण्यात आली तर नगरपरिषदेतील एकूण सदस्य संख्याच्या १०% या शासनाच्या निकषाप्रमाणे दोन स्विकृत सदस्यांची निवड करण्यात आली. यामध्ये उमेश वसंतराव बिलोलीकर व मोहमद अखिल सिद्धीकी मोहमद खलील यांची बिनविरोध निवड करण्यात आली.

### अनुभवी सदस्य

स्विकृत सदस्य निवडलेल्या उमेश बिलोलीकरांची ही या पदावर निवड होण्याची तिसरी वेळ आहे. यापूर्वी १९९७, २०१० मध्ये ही त्यांची निवड झाली होती दुसऱ्या स्विकृत सदस्य पदासाठी अनेक इच्छुकांची स्पर्धा होती, परंतु नगराध्यक्ष संतोष कुलकर्णी यांचे वर्गमित्र तथा त्यांच्या राजकीय कारकिर्दीच्या प्रारंभापासून सोबत असलेल्या मोहंमद अखिल सिद्धीकी याची निवड करत १५ वर्षानी न्याय दिला. आजच्या निवड प्रक्रियेत पिठासन अधिकारी म्हणून नगराध्यक्ष संतोष कुलकर्णी यांनी काम पहिले तर प्रशासकीय कामकाज प्रभारी मुखयाधिकारी बालाजी मिठेवाड यांनी काम पहिले.

## लोहा उपनगराध्यक्षपदी करीम मुजावर शेख यांची बिनविरोध निवड

**तभा वृतसेवा**
**लोहा, दि. १० जानेवारी-**



नगर परिषदेच्या निवडणुकीत शेख करीम मुजावर यांची उपनगराध्यक्षपदी बिनविरोध निवड करण्यात आली. करीम शेख यांच्या रूपाने मुस्लिम समाजास प्रतिनिधीत्व मिळाल्याने मुस्लिम समुदायतुन आनंद व्यक्त करण्यात येत आहे.

नगराध्यक्ष शरद पवार यांचा पदग्रहण सोहळा पार पडल्यानंतर अवघ्या तीन दिवसानंतर उपनगराध्यक्ष पदाची निवड झाल्याने करीम मुजावर यांच्या राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष व करीम मुजावर यांच्या समर्थकांनी फटाक्यांची आतिषबाजी करून आनंद साजरा केला. उपनगराध्यक्ष पदासाठी निवडणूक निर्णय अधिकारी तथा मुख्याधिकारी श्रीकांत लाळगे यांच्या कडे केवळ शेख करीम यांचा एकमेव अर्ज प्राप्त झाल्याने त्यांची बिनविरीध निवड करण्यात आली. यावेळी माजी जि.प. सदस्य प्रवीण पाटील चिखलीकर, चिखलीचे माजी सरपंच सचिन पाटील चिखलीकर, नगराध्यक्ष शरद पवार, गटनेता भास्कर पाटील पवार, माजी उपनगराध्यक्ष छत्रपती धुतमल, माजी उपनगराध्यक्ष दत्ता वाले, अविनाश पाटील, सतीश निखाते, श्याम पवार आदींसह नगरसेवक, कर्मचारी व राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे कार्यकर्ते उपस्थित होते.

# हिवाळ्याच्या थंडीत निवडणूकाही थंडच

**तभा वृतसेवा**
**हाणेगाव, दि. १० जानेवारी-**

राज्यात महानगरपालिकेचे निवडणुकीचे वारे थंडीच्या महीण्यामध्ये गरम वाहत असतानां जिल्हा परिषद व पंचायत समीतीचे निवडणूका हिवाळ्याच्या गुलाबी थंडीत थंडच पडल्याचे दिसते आहे.

निवडणुक आयोग निवडणुकीचा कार्यकम जाहीर केला असतानाच मध्येच आरक्षणाच्या मर्यादित वाढ झाल्यामुळें जिल्हा परिषद निवडणुकांचे कार्यक्रम पुढे ढकलण्यात आले आहे .वेगवेगळ्या पक्षाचे इच्छुक उमेदवार मागील महीण्यात परीसरातील गावात भेटीगाठी सोशल मीडियावर पोस्ट घेण्याचं सपाटा लावले असताना हिवाळ्याच्या महीण्यात थंडीत निवडणुक आयोगाने निवडणुकीचा कार्यक्रम पुढे ढकलल्यामुळे ऐन थंडीत इच्छुक उमेदवार ही थंड पडले असल्याचे दिसतात १३ आक्टोंबर रोजी जिल्हा परिषद व पंचायत समीती सदस्यांसाठी आरक्षणाची सोडत झाली होती कोणत्याही क्षणी आचारसंहिता लागण्याची शक्यता असतानाच मध्येच आरक्षणाच्या मर्यादेच्या मुद्यावरुन स्थगिती देण्यात आल्यामुळे इच्छुक उमेदवारांचा जोश थंडावला आहे थंडीत जागोजागी खेड्यापाड्यांत थंडीत मतदार शेकोटी लाऊन निवडणुकीचे चर्चा करीत वातावरण तापवायचा प्रयत्न करत असताना मध्येच आरक्षणाच्या मर्यादित वाढ झाल्यामुळें निवडणुक आयोगाने निवडणुकीचा कार्यक्रम पुढे वाढवल्याने निवडणुक थंडच पडल्याचे दिसते आहे.जवळपास आठ वर्षाच्या




विश्रांतीनंतर निवडणुकीचा कार्यक्रम जाहीर झाल्यामुळे वेगवेगळ्या पक्षाचे इच्छुक उमेदवार कार्यकर्ते मतदारांत आनंद संचारला होता की आता निवडणुका होतील आणि आपले विकासाचे कामे पुर्ण होतील पण तसा काही होण्याचे सध्यातरी संकेत नाहीत उलट मतदार भावी उमेदवार पक्षाचे पदाधिकारी ही थंडीत थंडच पडल्याचे दिसते आहे. जो जोश निवडणुक आयोगाने निवडणुकीचा कार्यक्रम जाहीर केल्यावेळेस होता तो आज राहीला नसल्याचे आनेक इच्छुक उमेदवार सांगताना दिसतात म्हणुन ऐन हिवाळयाच्या महीण्यात निवडणुका थंडीत थंडच पडल्याचे सुशिक्षीत नागरीकातुन चर्चा होत असल्याचे ऐकावयास मिळते आहे.

# नवनिर्वाचित नगराध्यक्षा सुजाता येंड्रलवार 'ॲक्शन मोड'वर

**तभा वृतसेवा**
**किनवट, दि. १० जानेवारी-**



किनवट नगर परिषदेच्या नवनिर्वाचित नगराध्यक्षा सौ. सुजाता येंड्रलवार यांनी पदभार स्वीकारल्यानंतर तात्काळ प्रशासन आणि नवनियुक्त नगरसेवकांची संयुक्त बैठक घेऊन शहरातील मूलभूत समस्या सोडविण्यासाठी समन्वयाने काम करण्याच्या स्पष्ट सूचना दिल्या. या बैठकीत नगराध्यक्षा सौ. सुजाता येंड्रलवार 'ॲक्शन मोड'मध्ये दिसून आल्या.

या बैठकीत शहरातील प्रत्येक प्रभागातील स्वच्छता व्यवस्था, नियमित व सुरळीत पाणीपुरवठा, सार्वजनिक दिवाबत्ती, रस्ते, नाल्यांची साफसफाई तसेच नागरिकांना मिळणाऱ्या प्रशासकीय सेवांमध्ये सुधारणा करण्यावर भर देण्यात आला. नगर परिषद प्रशासन, नगरसेवक व त्यांचे प्रतिनिधी यांच्यात योग्य समन्वय राहिल्यासच नागरिकांच्या समस्या वेळेत सुटू शकतात, असे प्रतिपादन नगराध्यक्षा सौ. येंड्रलवार यांनी केले.

प्रत्येक प्रभागातील समस्या थेट प्रशासनापर्यंत त्वरित पोहोचाव्यात यासाठी नगर परिषदच्या सर्व विभागांचे दूरध्वनी क्रमांक नगरसेवक, त्यांचे प्रतिनिधी तसेच संबंधित कर्मचाऱ्यांकडे उपलब्ध असणे आवश्यक असल्याचे निर्देश त्यांनी दिले. यामुळे तक्रारींचे निराकरण जलदगतीने होऊन नागरिकांना दिलासा मिळेल, असा विश्वास त्यांनी व्यक्त केला.

तसेच, स्वच्छता कर्मचाऱ्यांची उपस्थिती, पाणीपुरवठ्यातील अनियमितता, बंद असलेली दिवाबत्ती, तसेच कार्यालयीन कामकाजातील विलंब यावर कोणतीही तडजोड केली जाणार नाही, असे स्पष्ट करत त्यांनी संबंधित विभागप्रमुखांना जबाबदारीने काम करण्याचे आदेश दिले.

या बैठकीस मुख्याधिकारी मुंगाजी काकडे, कार्यालयीन अधीक्षक अशोक भालेराव, नगर परिषदचे विविध विभागप्रमुख, अधिकारी व कर्मचारी उपस्थित होते. बैठकीदरम्यान नगरसेवकांनीही आपापल्या प्रभागातील समस्या मांडल्या, त्यावर नगराध्यक्षा व प्रशासनाने सकारात्मक चर्चा करत तातडीने उपाययोजना करण्याचे आश्वासन दिले. नागरिकाभिमुख, पारदर्शक व गतिमान प्रशासन देण्याचा निर्धार करत सौ. सुजाता येंड्रलवार यांनी किनवट शहराचा सर्वांगीण विकास हेच आमचे ध्येय आहे, असे ठामपणे सांगितले.

शुक्रवार नमाज खुदबईनगर चौरस्ता येथून भव्य रॅली काढण्यात आली देगलूर नाका उमर का कॉलनी या ठिकाणी अनेक लोकांची भेटीगाठी घेतल्याने लोकांनी आशीर्वाद दिला व कामासाठी असंच माणूस पाहिजे म्हणून आश्वासनही दिला या लोकांची चांगली साथ मिळाली तसेच प्रभागातील कब्रस्तान हैदराबाद दवाखाना मुलांना खेळण्यासाठी प्लेग्राउंड हायस्कूल कॉलेज साठी देखील मी काम करणार असाही सांगितलं.

जिल्हा कार्यालय - पहिला माळा, जनता मार्केट, शिवाजीनगर, नांदेड.
Mail : tbnanded@gmail.com, Mob. No.: 9850952439